शनिवार
२४
ऑक्टोबर २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : २०
अंक : २०१
स्वागत मूल्य ३ रुपये

Postal Regn. No.
AKL Dn./315/2026-2028

अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग



रेणूका सिंग ठाकूर वनडे मालिकेतून बाहेर
(पान ७ वर)

थोडक्यात

कॅमेरावाल्या चष्म्याने स्टिंग ऑपरेशनचा प्रयत्न-डीके शिवकुमार

नवी दिल्ली :कर्नाटकचे मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी खळबळजनक आरोप केला आहे. डीके शिवकुमार यांनी सांगितले की, त्यांचे आणि केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांचे स्टिंग ऑपरेशन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दोन्ही काँग्रेस मुख्यमंत्र्यांचे स्टिंग ऑपरेशन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, भारतीय जनता पक्ष किंवा त्यांच्या एनडीएतील कोणत्याही मित्रपक्षाच्या मुख्यमंत्र्यांचे स्टिंग ऑपरेशन करण्याचा प्रयत्न झाला नाही, असे त्यांनी सांगितले. कन्नड वृत्तवाहिनीला दिलेल्या या मुलाखतीमुळे कर्नाटकातील स्टिंग ऑपरेशनवरून सुरू असलेल्या राजकीय वादाला नवे वळण मिळाले आहे.डीके शिवकुमार यांनी दावा केला की, त्यांना भेटण्यासाठी आलेल्या एका उद्योगपतीने मेटा स्मार्ट चष्मा घातला होता. त्यामुळे त्यांना त्या व्यक्तीचा संशय आला. त्यानंतर त्यांनी त्या व्यक्तीच्या हालचाली आणि इतर राजकीय नेत्यांसोबत झालेल्या भेटींची माहिती घेण्याचा निर्णय घेतला. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी आरोप केला की, ही घटना त्यांना आणि काँग्रेसच्या इतर नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी आखण्यात आलेल्या व्यापक स्टिंग ऑपरेशनच्या तयारीचा एक भाग होती.कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याशी संबंधित कथित स्टिंग ऑपरेशनच्या व्हिडिओवरून वाद वाढत असतानाच डीके शिवकुमार यांनी हे आरोप केले.

१ नोव्हेंबरपासून आता दिल्लीमध्ये नो पीयूसी नो फ्लूएल

नवी दिल्ली : दिल्लीमध्ये प्रदुषण प्रचंड वाढलं आहे. त्याच्यावर नियंत्रण मिळवणं हे सध्या सरकारपुढील मोठं आव्हान आहे. त्यासाठी विविध उपाययोजना काढण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. त्याचपार्श्वभूमिवर आता सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. १ नोव्हेंबरपासून आता दिल्लीमध्ये नो पीयूसी नो फ्लूएल म्हणजेच पीयूसी नसेल तर पेट्रोल-डिझेल मिळणार नाही, असं धोरण राबवलं जाणार आहे. त्यामुळे जर आता तुमच्या वाहनाचंही प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र हे कालबाह्य झालं असेल किंवा वैध नसेल तर तुम्हाला पेट्रोल किंवा डिझेल मिळू शकणार नाही. पेट्रोप पंपचालक तुम्हाला स्पष्टपणे नकार देतील. एवढच नाही तर, जर तुम्ही वैध पीयूसीशिवाय वाहन चालवत असाल तर त्यासाठी तुम्हाला मोठा दंडही ठोठावला जाऊ शकतो.१ नोव्हेंबरपासून दिल्लीमध्ये नॉन बीएस ६ वाहनांच्या प्रवेशावरही निर्बंध लागू केले जात आहेत, पेट्रोल पंपांवरील वाहनांच्या रांगा आणि होणारा त्रास टाळण्यासाठी सर्व वाहन मालकांनी घरातून निघतानाच त्यांच्या वाहनांची पीयूसी तापासावी असा सल्ला देण्यात आला आहे.

देशाच्या विकासासाठी एकत्र या-नरेंद्र मोदी

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आपण जो अमृत महोत्सव साजरा केला, तो केवळ एक सोहळा नव्हता. तर तो आपल्या जुन्या मूल्यांची ओळख करून देत, २०४७ पर्यंत भारताला एक विकसित देश बनवण्याचा भक्कम पाया आहे, असे विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केले. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे चिन्मय अमृत महोत्सव ग्लोबल संमेलन पार पडले. या भव्य कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान म्हणाले की, देशातील प्रत्येक नागरिकाचा सहभाग, स्वावलंबन आणि तरुण पिढीच्या ताकदीवरच भारत आपल्या स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षी (२०४७ मध्ये) संपूर्ण जगभरात एक महान विकसित देश म्हणून ओळखला जाईल.आपल्या भाषणामध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी आजच्या काळातील काही नवीन आव्हानांवर आणि सामाजिक समस्यांवर चिंता व्यक्त केली. देशात आणि समाजात फूट पाडणाऱ्या लोकांपासून किंवा शक्तींपासून सर्वांनी दूर राहिले पाहिजे आणि त्यांच्याविरोधात एकत्र येऊन उभे राहिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, देशातील प्रत्येक व्यक्तीला स्वावलंबी बनवण्याची आज नितांत गरज



आहे. विशेष योगायोग म्हणजे, २०४७ मध्ये भारत जेव्हा स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, त्याच वेळी चिन्मय मिशनची स्थापना होऊनही १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे देशाच्या या मोठ्या प्रवासात सर्वांनी मिळून उत्साहाने योगदान दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे, आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन पूज्य स्वामी चिन्मयानंद यांची हॅलोग्राफिक प्रतिमा (हवेमध्ये जिवंत भासणारी आकृती) तयार करण्यात आली होती. या डिजिटल रूपात समोर असलेल्या स्वामीजींशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी काही क्षण भावुक झाले आणि त्यांनी ३३ वर्षांपूर्वीच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. १९९३ मध्ये वडोदरा येथे स्वामीजींची झालेली भेट, त्यांच्याशी झालेली चर्चा आणि त्यांचा आशीर्वाद याची आठवण काढत पंतप्रधान म्हणाले की, त्या भेटीदरम्यान तरुण पिढीला (युवाशक्तीला) सक्षम बनवून एक मजबूत भारत (पान २ वर)

देशात आणलेली नवीन राष्ट्रीय शिक्षण नीती ही आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरा, मातृभाषेतील शिक्षण आणि आजचे आधुनिक तंत्रज्ञान या सर्वांचा अगदी अचूक मेळ घालणारी आहे, असेही नरेंद्र मोदी सांगितले.चिन्मय मिशन ही केवळ एक सामान्य संस्था नाही, तर ती वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रचार करणाऱ्या स्वामी चिन्मयानंद यांच्या महान विचारांचे एक जिवंत प्रतीक आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी या आध्यात्मिक संस्थेचा गौरव केला. या सुंदर महोत्सवात सहभागी होणे हा आपल्यासाठी एक अतिशय आनंददायी आणि आध्यात्मिक अनुभव होता, असे सांगत त्यांनी देशातील सर्व सामाजिक आणि धार्मिक संस्थांना अमृत संकल्पांच्या माध्यमातून देशसेवेच्या कामात एकत्र येण्याचे आवाहन केले.

अरुणाचल सीमेवर भारत-चीन गतिरोध कायम

आयटीबीपी प्रमुखांचा मोठा खुलासा

सप्टेंबर महिन्यात चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग नवी दिल्लीत झालेल्या ब्रिक्स परिषदेसाठी भारतात आले होते. तसेच, दोन्ही देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये वचा-दमाई येथे कोअर कमांडर पातळीवरील चर्चाही पार पडली होती. असे असले तरी, प्रत्यक्ष सीमेवरील वास्तव अद्याप पूर्णपणे पूर्वपदावर आलेले नाही. सुदैवाने, या ताज्या संघर्षाच्या घटनांमध्ये कोणत्याही प्रकारची हिंसा किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. स्थानिक पातळीवर संघर्ष अधिक वाढू नये म्हणून दोन्ही देश लष्करी आणि राजनैतिक मार्गांचा प्रभावी वापर करत परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत.



नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

भारत आणि चीनच्या सीमेवर अद्यापही तणावाचे वातावरण कायम असल्याची महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. इंडो-तिबेटन बॉर्डर पोलिसांचे महासंचालक शत्रुजीत कपूर यांनी एका कार्यक्रमात बोलताना अरुणाचल प्रदेशमधील विविध भागांत भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये फेस-ऑफ (आमनेसामने येणे) सुरूच असची अधिकृत पुष्टी दिली आहे. विशेष म्हणजे, सुरक्षा दलाच्या एखाद्या वरिष्ठ प्रमुखाने सीमावर्ती तणावाबाबत उघडपणे आणि थेट वक्तव्य करण्याची ही पहिलीच वेळ आहे.राजस्थानमधील अलवर येथे पार पडलेल्या आयटीबीपीच्या वार्षिक हिमवीर सम्मान समारोह सोहळ्यात महासंचालक शत्रुजीत कपूर यांनी हा गौप्यस्फोट केला. गेल्या काही दिवसांत अरुणाचल प्रदेशमधील अनेक ठिकाणी दोन्ही देशांचे सैन्य समोरासमोर आले असून, हा सीमावाद अजूनही पूर्णपणे सुटलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या विधानामुळे सीमेवरील प्रत्यक्ष परिस्थितीची गंभीरता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, अरुणाचल प्रदेशच्या अप्परसुबनसिरी जिल्ह्यातील टाक्सिंग भागात गेल्या काही महिन्यांपासून हा तिढा सुरू आहे. चिनी पीएलए सैनिकांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या जवळ असलेल्या आसाफिला परिसराजवळ आपले तंबू ठोकल्याची माहिती समोर आली आहे. भारतीय हद्दीतील मजा कंपनी ऑपरेटिंग बेसपासून अंदाजे ६ ते ७ किलोमीटर आत हा वाद निर्माण झाला आहे. नियमित गस्तीदरम्यान हा प्रकार उघडकीस आल्यानंतर भारतीय लष्करानेही संबंधित भागात तातडीने मोठी कुमक तैनात केली आहे.या अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक सीमावर्ती भागात अत्यंत धैर्याने परिस्थिती हाताळणाऱ्या आयटीबीपीच्या नवीन शौर्य कमांडो प्लॅटोन्सच्या कामगिरीची मुत्सद्दीपणे प्रशंसा करण्यात आली. अतिदुर्गम आणि उच्च पर्वतीय प्रदेशात जवानांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जात असून, त्यांना अत्याधुनिक प्रशिक्षण, नवीन ड्रोन युनिट्स आणि पायाभूत सुविधा पुरवल्या जात आहेत. तसेच, कठीण भूप्रदेशाचा सामना करण्यासाठी भूमिगत निवारा केंद्रे उभारण्यावरही विशेष भर दिला जात असल्याचे सांगण्यात आले.विशेष बाब म्हणजे, एका बाजूला दोन्ही देशांमध्ये उच्चस्तरीय राजकीय आणि लष्करी पातळीवर वाटाघाटी सुरू असताना, दुसरीकडे हा सीमातणाव कायम असल्याचे दिसून येत आहे.

तुकाराम मुंढेंची औषध विक्रेत्यांवर धडक कारवाई; ७१ परवाने निलंबित

मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था

राज्यात औषध विक्रेते आणि खाद्यपदार्थ उत्पादकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

औषध विक्रीतील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली असून, नाशिकमध्ये एका मसाला उत्पादकाच्या आस्थापनेवर छापा टाकून २ हजार २३० किलो मसाला जप्त करण्यात आला आहे. या मसाल्याची किंमत ११ लाख ६४ हजार रुपये असल्याची माहिती आहे.५ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभरात औषध विभागाकडून ९३७ तपासण्या करण्यात आल्याचे दिलेल्या माहितीत नमूद आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आणि विविध त्रुटी आढळल्याने ४५० नोटिसा बजावण्यात आल्या. तसेच ७१ औषध विक्रेत्यांचे परवाने निलंबित, तर २९ परवाने रद्द करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.औषधांची गुणवत्ता, साठवणूक आणि विक्रीसंदर्भातील नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी या मोहिमेदरम्यान करण्यात आली. औषध विक्रीतील अनियमितता रोखण्यासाठी कडून राज्यभरात तपासणी मोहीम राबवली जात आहे. दिवाळीच्या काळात मिठाई, मसाले, तेल, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर खाद्यपदार्थांची मागणी वाढते.

भाजपने मला ऑफर दिली होती, काँग्रेसच्या बड्या नेत्याचा मोठा गौप्यस्फोट

मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था

काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी गौप्यस्फोट केला की भाजपने त्यांना पक्षप्रवेशाची ऑफर दिली होती, जी त्यांनी नाकारली. पंतप्रधान मोदींशी त्यांचे आणि शरद पवारांचे चांगले संबंध असल्याचे त्यांनी सांगितले, तसेच मोदींच्या कामाचे कौतुक केले. भाजपमध्ये नव्याने आलेल्यांचे काय हाल होतात यावरही त्यांनी भाष्य केले.काँग्रेसचे नेते, माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांनी एक धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे. भाजपने मलाही काँग्रेस सोडून भाजपमध्ये येण्याची ऑफर दिली



होती, असा गौप्यस्फोट सुशील कुमार शिंदे यांनी केला आहे. मी आजही पंतप्रधानांसोबत बोलत असतो. शरद पवारही पंतप्रधानांसोबत बोलत असतात. इतकेच काय त्यांना बारामतीलाही घेऊन जातात, असंही सुशील कुमार शिंदे यांनी म्हटलं आहे. यावेळी शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुकही केलं आहे. सुशील कुमार शिंदे यांनी मीडियाशी संवाद साधताना हा गौप्यस्फोट केला. शिंदे यांचे नातू शिखर पहारिया यांनी पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांना शुभेच्छा देणारे बॅनर लावले होते. त्यावर बोलताना शिंदे यांनी थेट मोदी यांचंच कौकुतक केलं. मोदींकडून कितीतरी चांगल्या गोष्टी होतात, काही वाईटही होतात, असं शिंदे म्हणाले.मला भाजपने ऑफर दिली होती. पण काँग्रेसमध्ये आहे तर भाजपत येऊन काय करू? असा सवाल मी त्यांना केला होता. मी जिथे आहे तिथलंच काम करणार, (पान २ वर)

थेट बड्या नेत्यांना घरचा रस्ता

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी भाजप भाकरी फिरवणार?

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि प्रदेश प्रभारी विनोद तावडे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने रणनीती आखली आहे. १२५ जागांवर सर्व्हे करत संभाव्य उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. जिंकण्याची क्षमता असलेल्या चेहऱ्यांनाच संधी देण्यासाठी विद्यमान आमदारांना बदलण्याचा भाजपचा मोठा प्लान समोर आला आहे.भाजपने उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीची रणनीती तयार केली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सातत्याने जिल्ह्यांचे दौरे करत आहेत. तर पक्षाचे प्रदेश प्रभारी विनोद तावडेही विविध जिल्ह्यातील संघटनेच्या स्थितीचा आढावा घेत असून संभाव्य उमेदवारांचा फिडबॅक घेत आहेत. विनोद तावडे यांनी आतापर्यंत १२५ जागांचा सर्व्हे केल्याची चर्चा आहे. निवडणुकीच्या मैदानात विजय मिळवेल अशा चेहऱ्यावरच पक्षाने फोकस ठेवला आहे. त्यामुळेच सर्व्हेच्या आधारे भाजप काही विद्यमान आमदारांचे पंख कापणार असल्याचं सांगितलं जात आहे. म्हणजे या बड्या नेत्यांना घरी (पान २ वर)

सरकार देशातील ४ सरकारी बँकेमधील हिस्सेदारी करणार कमी

मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था

केंद्र सरकार चार सरकारी बँकांमधील आपली हिस्सेदारी कमी करून ७५ टक्के करण्याच्या तयारीत आहे. या चार बँकांमध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युको बँक, पंजाब अँड सिंध बँक आणि इंडियन ओवरसीज बँक या बँकांचा समावेश आहे. सरकारच्या या निर्णयामुळे या बँकातील २५ टक्के शेअर्स हे सामान्य गुंतवणूकदारांसाठी आणि दुसऱ्या शेअर धारकांसाठी उपलब्ध असणार आहेत.सेबीच्या नव्या नियमानुसार शेअर बाजारात लिस्टेड कंपन्यांना त्यांचे कमीत कमी २५ टक्के शेअर्स हे सामान्य गुंतवणूकदारांकडे असले पाहिजेत. या नियमाचे पालन करण्यासाठी सरकार



या बँकांमध्ये आपली हिस्सेदारी कमी करण्याची योजाना आखली आहे.

चार बँकांमध्ये सामान्य गुंतवणूकदारांची हिस्सेदारी वाढणार आहे. बँका स्वतः बाजारातून पैसे गोळा करू शकतात. सरकार देखील बाजाराची स्थिती पाहून ऑफर फॉर सेलसाठी काही शेअर्सची विक्री करू शकते. बँकांनी यासाठी अर्थ मंत्रालयाकडे एक वर्षाचा अजून वेळ मागितला आहे. बँकांचे म्हणणे आहे की सध्याच्या स्थितीत द्वारे १० टक्क्यांपेक्षा जास्त हिस्सेदारी विकणे सोपी गोष्ट नाहीयेसरकार ज्या चार बँकात आपली हिस्सेदारी कमी करण्याची तयारी करत आहे. त्यात सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युको बँक, पंजाब अँड सिंध बँक आणि इंजियन ओवरसीज बँकेचा (पान २ वर)

लोकशाहीचा खून आणि बलात्कारच!

कथित ५०० कोटी रुपये ऑडिओ क्लिपवरून राज ठाकरेंचा घणाघात

मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था

'राज्यात सध्या एक फ्रेंडशिप फाईल व्हायरल झाली आहे. सत्ताधारी पक्षांशी निगडीत मंडळीशी या क्लिपमधलं हे बोलणं म्हणजे लोकशाहीचा खून आणि बलात्कारच आहे', अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली आहे. राज यांनी यासंदर्भात सविस्तर पोस्टच लिहिली आहे.

राज लिहितात, 'सध्या महाराष्ट्रात एक 'फ्रेंडशिप फाईल' ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. तुम्ही सगळ्यांनी ऐकली असेल. भारतीय जनता पक्षाचे काही पदाधिकारी, या पक्षाच्या सोशल मीडियात महत्वाची



भूमिका बजावणारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक ज्येष्ठ पदाधिकारी आणि स्वतःला निष्पक्ष राजकीय विश्लेषक म्हणवणारे पण खरंतर भारतीय जनता पक्षाच्या चिखलफेक सैन्याचं चिलखत घालून फिरणारे काही युट्युब प्रभावक यांच्यातल्या मैत्रीची 'फ्रेंडशिप फाईल' ऑडिओ क्लिप. यांत कोणी कोणाला ५०० कोटी दिले इथपासून ते थेट माध्यमांना आम्ही कशी जरब दाखवू शकतो, ते एखादा भावनिक मुद्दा सरकारच्या अंगाशी आला तर लगेच त्या मुद्द्यापासून लोकांचं लक्ष कसं भरकटवायचं यासाठी नवीन धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दा कसा रेटला पाहिजे यासाठी काय केलं पाहिजे याचीही चर्चा करताना ऐकायला येत आहे. ही क्लिप खरंतर २९ मिनिटांची आहे. त्यातल्या ५०० कोटींचा मुद्दा गाजतोय. त्यावर खुलासे येतील आणि यायलाच पाहिजेत. पण भारतीय जनता पक्ष काय पद्धतीने समाज माध्यमं, माध्यमं यांच्यावर दडपशाही आणत आहे यावर पण चर्चा व्हायला हवी'.ते पुढे लिहितात, 'मुख्यमंत्र्यांनी मी ऑडिओ क्लिपचा फॉरेन्सिक रिपोर्ट मागवला आहे असं म्हणून वेळ मारून न्यायचा प्रयत्न केला आहे.

फॉरेन्सिक अहवाल हा (पान २ वर)

कच्च्या तेलाच्या किंमतीचा भडका, पेट्रोल डिझेलचे भाव ११४ डॉलरच्या पुढे

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

इराण आणि अमेरिका युद्ध पेटले आहे. पुन्हा होर्मुज खाडीत भडका उडाला. एकाच वेळी ४ तेलवाहू जहाजांवर हल्ला करण्यात आला. इराण आणि अमेरिका युद्ध थांबण्याचे संकेत असतानाच पुन्हा होर्मुज खाडी भडका उडाला. होर्मुज खाडी आपल्या नियंत्रणात घेण्यासाठी मोठे प्रयत्न अमेरिकेने केले पण त्यांना अपयश मिळाले. होर्मुज खाडी सुरक्षित असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून केला जात आहे. पण होर्मुज खाडीत मोठे तांडव बघायला मिळातंय. त्यातच भारताला ज्याची भीती तेच घडताना दिसत आहे. होर्मुज खाडीत उडालेला भडका यामुळे कच्च्या तेलाच्या दरात मोठी वाढ झाली. प्रति बॅरल किंमत थेट ११४ डॉलरच्या पार गेली. ज्यामुळे देशात लवकरच पेट्रोल आणि डिझेलच्या



किंमतीमध्ये वाढ होऊ शकते. जागतिक बाजारातील अशांतता यामुळे भारतीय तेल कंपन्यांवरील दबाव प्रचंड वाढला आहे.पुढील दोन दिवसात कच्च्या तेलाच्या किंमतीमध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी वाढ होतंय. ब्रेंट क्रूडचा दर प्रति बॅरल ११४ डॉलरच्या पुढे पोहोचला. पश्चिम आशियातील वाढता संघर्ष, सौदी अरेबियातील तेल पायाभूत सुविधांवरील हल्ले आणि यासोबतच जागतिक तेलपुरवठा विस्कळीत होण्याच्या भीतीमुळे दरात वाढ झाली आहे.या दरवाढीचा भारताच्या इंधन आयातीचा खर्च आणि महागाईवर दबाव येण्याची शक्यता आहे. हुथी इराणी समर्थकांकडून सौदी अरेबियाच्या तेल पायाभूत सुविधांवर हल्ले केले जात आहेत. ज्यामुळे तेल प्रकल्पांचे मोठे नुकसान होत आहे. तेल प्रकल्प आणि विमानतळांवर हल्ले होत आहेत.मागील काही दिवसांत हे हल्ले थांबले होते. (पान २ वर)

आदेश

मुंबई उच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निरीक्षण

केवळ विवाहासाठी धर्मांतराला परवानगी देता येणार नाही!

मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था

प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा धर्म बदलण्याचे स्वातंत्र्य आहे मात्र केवळ विवाह करण्याच्या उद्देशाने धर्मांतर करण्यास परवानगी देता येणार नाही असे महत्त्वाचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. महाराष्ट्राच्या नव्या धर्मांतरविरोधी कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. दरम्यान, याचिकेत आवश्यक तथ्ये आणि ठोस तपशील नसल्याने याचिकाकर्त्याने ती मागे घेतली.महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ अंतर्गत बळजबरी, फसवणूक, दबाव, प्रलोभन किंवा विवाहाच्या माध्यमातून घडवून आणलेल्या



धर्मांतराला गुन्हा ठरवण्यात आले आहे. या कायद्यातील कलम ६ नुसार, धर्मांतर करण्यापूर्वी ६० दिवस आधी प्रशासनाला सूचना देण्याची तरतूद आहे. याचिकाकर्त्याने कायद्यातील 'प्रलोभन' या शब्दाच्या व्याख्येला तसेच कलम ६ आणि ७ अंतर्गत धर्मांतरासाठी निश्चित केलेल्या प्रक्रियांना आव्हान दिले होते.मुख्य न्यायमूर्ती महेश सी. त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर प्रकरणात सुनावणी झाली. समाजातील धर्मनिरपक्षेता टिकवण्यासाठी कायद्याची गरज असल्याचे यावेळी न्यायालयाने मत नोंदवले. बळजबरीने आणि दबावाखाली होत असलेल्या धर्मांतराबाबत राज्य सरकारची भूमिका आणि घटनेवर चिंता व्यक्त केली. विवाहाच्या अगदी एक दिवस आधी अथवा केवळ लग्नासाठी होणाऱ्या धर्मांतरावर न्यायालयाने तीव्र आक्षेप नोंदवला. सदर याचिकेत महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियमातंर्गत बळजबरीने, फसवणूक, दबाव अथवा प्रलोभन दाखवून घडवून आणण्यात येणाऱ्या विवाह धर्मांतराला बेकायदेशीर ठरवण्यात आले आहे. तर त्यातंर्गत गुन्हा नोंदवण्याची सुद्धा तरतूद आहे. धर्मांतर करण्यापूर्वी प्रशासनाला या कायद्यान्वये लेखी सूचना देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. याचिककर्त्याने कायद्यातील 'प्रलोभन' या शब्दाच्या व्याख्येला तसेच कलम ६ आणि ७ अंतर्गत धर्मांतरासाठी निश्चित केलेल्या प्रक्रियांना आव्हान दिले होते.

आवश्यक कागदपत्रे आणि तथ्यांचा अभावामुळे न्यायालयाने सध्यस्थितीत ही याचिका फेटाळली. तर पुरेशा कागदपत्रांसह नव्याने याचिका दाखल करण्याची मुभा न्यायालयाने याचिकाकर्त्याला दिली आहे. त्यानंतर याचिकाकर्त्याने सुधारित याचिका दाखल करण्यासाठी सदर याचिका मागे घेतली. यावेळी न्यायालयाने धर्मांतर प्रथेवरही प्रश्नचिन्हं उपस्थित केले आहे.

पान 1 वरून...

देशाच्या विकासासाठी एकत्र...

कसा घडवता येईल, यावर मुख्य चर्चा झाली होती. त्यानंतर काही वर्षांतच जनतेच्या आशीर्वादामुळे मला गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून देशसेवा करण्याची संधी मिळाली, अशी भावनिक आठवण त्यांनी सांगितली.गेल्या २५ वर्षांपासून सरकारमध्ये प्रमुख पदावर काम करताना आपल्या प्रत्येक निर्णयाच्या केंद्रस्थानी नेहमी तरुण पिढी (युवाशक्ती) राहिली आहे, असे पंतप्रधानांनी आवर्जून सांगितले. यावेळी त्यांनी चिन्मय मिशनच्या तरुण सदस्यांचे भरभरून कौतुक केले. या संस्थेच्या तरुणांनी जवळपास ३०० दिवसांत तब्बल ४० हजार किलोमीटरचा प्रवास करून देशातील १ लाखांहून अधिक युवकांपर्यंत राष्ट्रउभारणीचा संदेश पोहोचवला आहे, हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

थेट बड्या नेत्यांना घरचा रस्ता...

बसवण्यात येणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप उत्तर प्रदेशात भाकर फिरवणार असल्याचे संकेत मिळत आहेत.उत्तर प्रदेशातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने संघटनात्मक कार्यक्रमांवर भर दिला आहे. पक्षीय पातळीवर संभाव्य उमेदवार, विद्यमान आमदारांची ताकद आणि स्थानिक राजकीय समीकरणे आदींचा आढावा घेतला जात असल्याची चर्चा आहे. उत्तर प्रदेशात भाजपमध्ये दोन स्तरावर काम सुरू आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे संपूर्ण यूपी पिंजून काढत आहेत. रोज नव्या जिल्ह्यात जाऊन परिस्थितीचा आढावा घेत आहेत. तसेच तिथल्या समस्या मार्गी लावत आहेत. दुसरीकडे विनोद तावडे हे संघटनात्मक पातळीवर आढावा घेत आहेत. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहेत. प्रत्येक मतदारसंघाचा आढावा घेत आहेत. विद्यमान आमदार आणि संभाव्य उमेदवार यांचा फिडबॅक घेत आहेत.भाजपशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे १२५ विधानसभा जागांवर सर्व्हे झालं आहे. संघटनेच्या वेगवेगळ्या पातळीवरून माहिती गोळा करण्यात आली आहे. बुथ कमिटी, शक्ती केंद्र आणि स्थानिक नेत्यांकडून संभाव्य उमेदवारांची लोकप्रियता तसेच निवडणूक जिंकण्याची क्षमता आदींची माहिती घेतली जात आहे. विद्यमान आमदारांबाबत जनतेची मते काय आहेत? कार्यकर्त्यांचं काय म्हणणं आहे? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.दरम्यान, भाजपच्या निवडणूक रणनीतीत उमेदवारांची निवड हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ज्या विद्यमान आमदारांच्या विरोधात मतदारसंघात नाराजी आहे. त्यांना अँटी इन्कम्बन्सीचा सामना करावा लागू शकतो, अशी चर्चा आहे. त्यांनी तिकीट देण्यावर पक्षाकडून पुन्हा विचार होण्याची शक्यता आहे. कोणता चेहरा येत्या निवडणुकीत चांगला रिजल्ट देऊ शकतो, हे सर्व्हेतून जाणून घेतलं जात आहे. एखाद्या मतदारसंघात विद्यमान आमदाराची स्थिती कमकुवत वाटली तर तिथे नवीन उमेदवाराला संधी देण्याचा विचार होऊ शकतो, असं सूत्रांनी सांगितलं.

लोकशाहीचा खून आणि बलात्कारच!...

ऑडिओ` किंवा व्हिडिओची तथ्यता याबरोबर खून, बलात्कार, आर्थिक घोटाळे यांच्यासारख्या गंभीर गुन्ह्यात पुराव्यांची तथ्यता तपासण्यासाठी मागवला जातो. खरंतर यातलं संभाषण ऐकलं तर समजतंच आहे की हा लोकशाहीचा खुन आणि बलात्कारच आहे ! म्हणजे जे बोललं आहे ते गंभीर आहे आणि त्याची तपासणी व्हायला पाहिजे हे मुख्यमंत्र्यांना मान्य आहे हे बरं झालं'.'पुराव्यातील तथ्य तपासाच पण यांत बोललं गेलं आहे याबद्दल तुम्ही जर अनभिज्ञ असाल तर तुमच्या पाठीमागे काय काय सुरु होतं हे पण तपासा. मुख्यमंत्री म्हणाले की ही क्लिप बहुदा २ वर्षांपूर्वीची असावी, ती आत्ताच का आली ? खरतर ही क्लिप बाहेर आली कशी आणि ती आणली कोणी हा पण महत्वाचा प्रश्न आहे. खरतर याच्यात सरकार मधलं नेहमीप्रमाणे शहा काट'शाहाचं' राजकारणच दिसतंय , आणि हो फॉरेन्सिक अहवाल, त्यातील तांत्रिकता याच्यात महाराष्ट्राला गोल गोल घुमवू नका. महाराष्ट्राला जे कळायचं आहे ते कळलं आहे. ते तुम्हाला मान्य आहे आणि मुख्यमंत्री म्हणून तुम्ही किती निष्पक्ष आहात आणि तुम्ही कारवाई केली आहेत हे महाराष्ट्राला दाखवून द्या.

सरकार देशातील ४ सरकारी...

समावेश आहे. या बँकांमध्ये सरकारची हिस्सेदारी खूप जास्त आहे. इंडियन ओवरसीज बँकेत सरकारी हिस्सेदारी जवळपास ९२.४२ टक्के असून युके बँकेत सरकारची हिस्सेदारी ९०.९५ टक्के आहेत. पंजाब अँड सिंध बँकेत ९३.८५ तर सेंट्रल बँक ऑफ इंडिया ८१.१९ टक्के शेअर्स सरकारकडे आहेत.या बँकांमधील सरकारची हिस्सेदारी कमी करून ती ७५ टक्क्यांवर आणणार आहे. बाकी २५ टक्के हिस्सेदारी सामान्य गुंतवणूकदार आणि दुसऱ्या शेअरधारकांकडे असणार आहे. शेअर विकण्याची वेळ आणि पद्धत याबाबत अजून अंतिम निर्णय घेतलेला नाही.सरकारची या बँकांमधील हिस्सेदारी घटणार म्हणजे या बँकांचे खासगीकरण होणार अशी शंका निर्माण झाली आहे. मात्र हिस्सेदारी विकण्याचा अर्थ या बँकेचे खासगीकरण होणार असं नाही.

कच्च्या तेलाच्या किंमतीचा भडका...

होर्मुज खाडीतून जहाजांची ये-जा सुरू होती. जागतिक बाजारपेठ स्थिरावली होती. पण पुन्हा एकदा तणाव वाढला. या वाढलेल्या तणावाचा परिणाम जागतिक बाजारापेठेवर बघायला मिळत आहे. होर्मुज खाडीत भारतीय जहाजांवरही मोठे हल्ले झाले. होर्मुज खाडी हा जगातील तेल वाहतुकीसाठी सर्वात महत्वाच्या असलेल्या मार्गांपैकी एक आहे. भारतात जवळपास याच मार्गे कच्चे तेल दाखल होते.

भाजपने मला ऑफर दिली होती...

इकडं (भाजपमध्ये) येऊन परत तुमच्यात ढवळाढवळ नको, असं त्यांना म्हणालो होतो, असं सांगतानाच देशाचे पंतप्रधान जितकं माझ्याशी बोलतात, तितकंच शरद पवारांशीही बोलतात. शरदराव तर त्यांना बारामतीला घेऊन जातात. त्यांना कोणी विचारत नाही. उद्घाटनाला वगैरे गेले तर काही बिघडत नाही, असंही त्यांनी म्हटलं.भाजपमध्ये आलेल्या नवीन माणसांचे काय हाल होतात हे सुद्धा मी बघितलं आहे. आता नाही २५ वर्षांपूर्वी सुद्धा असंच होत होतं. एकत्रित सर्वजण भाजपमध्ये गेले आणि चार पाच वर्षात परतले हे मी पाहिलं आहे, असं सांगतानाच राजकारणात देखील चुका होत असतात. त्यामुळे पत्रकारांनी त्या चुकांचे विश्लेषण केले पाहिजे. नकळत एखाद्याकडून जर चूक झाली असेल तर ती समजून घेतली पाहिजे. आपली लोकशाही वर चढत जाणारी आहे, त्याला काळिमा लागता कामा नये, असं ते म्हणाले.

धाराशिवमध्ये भगर खाल्ल्याने २५ जणांना विषबाधा

बेंबळीतील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य न केल्याचा अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांचा आरोप

धाराशिव : दि.२३ वृत्तसंस्था



उपवासासाठी भगर खाल्ल्यानंतर २५ जणांची प्रकृती बिघडल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बेंबळी येथे गेलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाला संबंधित भगर विक्रीच्या दुकानाचा शोध घेता आला नाही. त्यामुळे दुकानाची तपासणी आणि भगरचे नमुने संकलित न करताच पथकाला परतावे लागले. दरम्यान, स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले नसल्याचा आरोप अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी केला आहे.

धाराशिव तालुक्यात दोन दिवसांपूर्वी उपवासाच्या फराळासाठी भगर खाल्ल्यानंतर २५ जणांची प्रकृती बिघडली होती. त्यांना पोटाचा त्रास आणि विषबाधेसदृश लक्षणे जाणवू लागल्याने काही जणांना धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात, तर काहींना बेंबळी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. या घटनेनंतर संबंधित भगरची गुणवत्ता आणि सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले. घटनेची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाचे पथक गुरुवारी बेंबळी येथे दाखल झाले. संबंधित भगर कुठून खरेदी करण्यात आली, याचा शोध घेऊन दुकानाची तपासणी करणे, नमुने गोळा करणे आणि अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले आहे का, हे तपासणे अपेक्षित होते. मात्र, भगर विक्रीच्या दुकानाची माहिती मिळू न शकल्याने तपासणीची कारवाई होऊ शकली नाही.

आरोग्य कर्मचाऱ्यांच्या असहकार्याचा आरोप

तपासादरम्यान बेंबळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आणि अन्य कर्मचाऱ्यांनी आवश्यक सहकार्य केले नसल्याचा आरोप अन्न सुरक्षा विभागाने केला आहे. रुग्णांशी संबंधित माहिती आणि भगर खरेदीच्या ठिकाणाचा तपशील मिळवण्यासाठी स्थानिक आरोग्य यंत्रणेचे सहकार्य महत्त्वाचे होते. मात्र, अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्याने तपासात अडथळे निर्माण झाल्याचे अन्न सुरक्षा अधिकारी गणेश दत्तू यांनी सांगितले.

दरम्यान, २५ जणांची प्रकृती बिघडण्यामागे भगरच कारणीभूत होती का, त्यात दूषित घटक होते का आणि तिची साठवणूक योग्य पद्धतीने झाली होती का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यासाठी संबंधित भगरचे नमुने तपासणे आणि विक्रेत्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर घटना घडूनही संबंधित खाद्यपदार्थाचा स्रोत शोधण्यात प्रशासनाला यश न आल्याने तपासाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता अन्न व औषध प्रशासन विक्रेत्याचा शोध घेऊन नमुने तपासणार का आणि कथित असहकार्याच्या आरोपांची चौकशी करणार का, याकडे लक्ष लागले आहे.

मोस्ट वॉन्टेड माओवादी दाम्पत्याचे कोलकात्यात आत्मसमर्पण

कोलकाता : दि.२३ वृत्तसंस्था

पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये सक्रिय असलेल्या मोस्ट वॉन्टेड माओवादी दाम्पत्याने शुक्रवारी कोलकाता पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. मंगल आणि मालती अशी त्यांची नावे असून, त्यांनी कोलकाता येथील लालबाजारस्थित पोलीस मुख्यालयात पोलीस आयुक्त अजय के. नंद यांच्यासमोर शस्त्रे जमा केली. यावेळी त्यांनी एके-४७ आणि इन्सास रायफल पोलिसांकडे सुपूर्द केली. या दोघांवर मिळून सात लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

पोलिसांच्या माहितीनुसार, मंगल हा पश्चिम मेदिनीपूर जिल्ह्यातील सालबोनी येथील, तर मालती ही झारग्राम जिल्ह्यातील गोपीबल्लभपूर परिसरातील रहिवासी आहे. या दाम्पत्याच्या माओवादी कारवाया प्रामुख्याने झारखंडमध्ये सुरू होत्या. मंगल सुरुवातीला झारखंडमधील दमला आणि त्यानंतर सारंडा वन परिसरात माओवादी कारवायांमध्ये सहभागी झाला. त्याच्यानंतर मालतीही माओवादी संघटनेत सक्रिय झाली.

सुरक्षा दलांकडून सातत्याने सुरू असलेल्या कारवायांमुळे माओवाद्यांवरील दबाव वाढला होता. परिणामी, या वर्षाच्या सुरुवातीपासून अनेक माओवाद्यांनी सारंडा वन परिसर सोडण्यास सुरुवात केली. पश्चिम बंगालमधील माओवादी संघटनेशी संबंधित अनेक जणांना यापूर्वी विविध मोहिमांमध्ये अटक करण्यात आली आहे.

मंगलवर पाच लाख, तर मालतीवर दोन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. कोलकाता पोलीस आयुक्त अजय के. नंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगल २०१० च्या सुमारास माओवादी आंदोलनात सहभागी झाला होता. २०११-१२ नंतर तो झारखंडमध्ये सक्रिय झाला. तो दिवंगत माओवादी नेता कोटेश्वर राव ऊर्फ किशनजी याच्या निकटवर्तीयांपैकी एक मानला जात होता. किशनजीचा नोव्हेंबर २०११ मध्ये सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत मृत्यू झाला होता.

आत्मसमर्पणाच्या निर्णयाबाबत मंगलने सांगितले की, सशस्त्र संघर्षातून सामाजिक बदल घडवून आणता येत नाही, याची जाणीव त्याला झाली होती. त्यामुळे दोघांनीही हिंसेचा मार्ग सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात परतण्याचा निर्णय घेतला.

राहुल नार्वेकर यांची निवड

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या (सीपीए) आंतरराष्ट्रीय कार्यकारी समितीवर भारत विभागाचे प्रतिनिधी म्हणून निवड झाली आहे. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या लंडन येथील मुख्यालयाचे उपमहासचिव जार्विस मातिया यांनी २० ऑक्टोबर २०२६ रोजी पत्राद्वारे या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. या निवडीमुळे महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. गेल्या महिन्यात दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन येथे झालेल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेदरम्यान राहुल नार्वेकर यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. राष्ट्रकुल संसदीय मंडळ ही राष्ट्रकुलातील देशांच्या विधिमंडळांमध्ये सहकार्य वाढविणे, लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणे आणि सुशासनाला प्रोत्साहन देणे यासाठी कार्यरत असलेली आंतरराष्ट्रीय संस्था आहे. या समितीवर भारत विभागाचे प्रतिनिधी म्हणून काम करताना नार्वेकर यांना विविध देशांच्या विधिमंडळांशी संवाद साधण्याची, संसदीय कामकाजातील उत्तम पद्धतींची देवाणघेवाण करण्याची आणि लोकशाही संस्था अधिक सक्षम करण्यासाठी योगदान देण्याची संधी मिळणार आहे.

पुण्यात डेंग्यूचा उद्रेक; १० महिन्यांत २,४१३ रुग्णांची नोंद

बालिका आणि वृद्ध महिलेच्या मृत्यूने चिंता वाढली

पुणे : दि.२३ वृत्तसंस्था

पुणे शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढत असून, जानेवारी ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत डेंग्यूच्या २ हजार ४१३ रुग्णांची नोंद झाली आहे. ऑगस्टमध्ये ५६८, सप्टेंबरमध्ये ७२६, तर ऑक्टोबरच्या पहिल्या २० दिवसांत ५५३ रुग्ण आढळले. या काळात डेंग्यूशी संबंधित संशयित मृत्यूच्या दोन घटना समोर आल्याने चिंता वाढली आहे. लोहगाव येथे आठ वर्षांच्या मुलीचा, तर गोखलेनगर येथे एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. मुलीच्या तपासणीत डेंग्यूचा संसर्ग आढळला असला, तरी तिच्या मृत्यूचे नेमके कारण मृत्यू परीक्षण समितीच्या चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन डेंग्यू नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये हलगर्जी करणाऱ्या डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. महापालिकेकडून डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी सुमारे १४ लाख घरांची आणि २८.३१ लाख पाणीसाठ्याच्या भांड्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १३ हजार घरांतील १८ हजार ८८५ भांड्यांमध्ये एडीस डासांच्या अळ्या आढळल्या. याप्रकरणी २ हजार ६६४ मालमत्ताधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, ६ लाख ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

क्षेत्रीय कार्यालयांना देणार भेट

डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढत असताना प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

शहरातील कोणत्या भागात फवारणी करण्यात आली, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी पुरेशा उपाययोजना झाल्या का आणि संबंधित यंत्रणा योग्य प्रकारे काम करत आहे का, याचा आढावा घेण्यासाठी आपण स्वतः क्षेत्रीय कार्यालयांना भेट देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गेल्या दोन दिवसांत एका बालकाचा मृत्यू झाला असून, एका वृद्ध महिलेची प्रकृती गंभीर असल्याची माहितीही समोर आली आहे. वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने डेंग्यू प्रतिबंधासाठी अधिक सतर्क राहून तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

अकोल्यातील आझाद कॉलनी मशीद ठरणार आदर्श

मशिदीच्या जागेचा शैक्षणिक उपयोग करण्याचा स्तुत्य उपक्रम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीचा संदेश

» आझाद कॉलनी मशीद ट्रस्ट, अकोला यांच्या वतीने आयोजित हा उपक्रम शिक्षण, सामाजिक जागृती आणि सामुदायिक सहभागाला प्रोत्साहन देणारा ठरणार आहे. मशिदीच्या परिसरात स्टडी रूम आणि लायब्ररी सुरू करण्याच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सुविधा उपलब्ध होण्यासोबतच शिक्षणाला प्राधान्य देण्याचा सकारात्मक संदेश समाजात पोहोचणार आहे. धार्मिक श्रद्धा आणि शैक्षणिक प्रगती यांचा समन्वय साधणारा हा उपक्रम अकोल्यातील इतर धार्मिक संस्था आणि सामाजिक संघटनांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतो. नव्या पिढीला शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम बनविण्याच्या दिशेने आझाद कॉलनी मशिदीचा हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

अकोला, दि. २३ : मशिदींच्या जागेचा उपयोग केवळ इबादतीसाठीच नव्हे, तर समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठीही करता येऊ शकतो. हीच संकल्पना पुढे नेत अकोल्यातील आझाद हाउसिंग सोसायटी परिसरातील आझाद कॉलनी मशिदीमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्टडी रूम आणि लायब्ररी सुरू करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत आणि पोषक वातावरण उपलब्ध करून देणे तसेच समाजात शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमाला प्रत्यक्षात आणण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे अकोला शहराध्यक्ष तथा नगरसेवक रफीक सिद्दीकी यांची प्रमुख भूमिका आहे.

त्यांच्या प्रयत्नांतून मशिदीच्या परिसरात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम साकार होत आहे. धार्मिक स्थळाच्या जागेचा उपयोग नव्या पिढीच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करणे, ही दूरदृष्टीची आणि समाजहिताची संकल्पना मानली जात आहे. स्टडी रूम आणि लायब्ररीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शांत वातावरणात अभ्यास करता येईल. तसेच सामान्य ज्ञान वाढविणे, स्पर्धा परीक्षांची तयारी करणे आणि शैक्षणिक प्रगती साधणे यासाठीही या सुविधेचा लाभ होणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य जागा आणि आवश्यक सुविधा मिळणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरण्याची अपेक्षा आहे.

मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा

आझाद कॉलनी मशिदीतील स्टडी रूम आणि स्टुडंट्स लायब्ररीचे उद्घाटन शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याचे प्रमुख उद्घाटक म्हणून निखिल मेश्राम (आयआरएस), आयुक्त, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग (सीजीएसटी), कोलकाता उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून अनिता ताई मेश्राम (आयएएस), आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र शासन, नागपूर उपस्थित राहणार आहेत.

तसेच मंजूर नदीम साहेब, माजी सत्र न्यायाधीश, हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. मिर्झे साहेब, अकोल्याचे माजी उपपोलीस अधीक्षक, हे विशेष अतिथी म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय रफीक सिद्दीकी, नगरसेवक तथा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, अकोला शहर, यांची उपस्थिती राहणार आहे. धार्मिक क्षेत्रातील मौलवी जब्बार साहेब आणि मुफ्ती वसीम साहेब यांचीही कार्यक्रमाला उपस्थिती असणार आहे.

बिहारमध्ये बेकायदेशीर फटाक्यांच्या साठ्याला भीषण आग; सात जणांचा मृत्यू

सिवान : दि.२३ वृत्तसंस्था

बिहारच्या सिवान जिल्ह्यातील बरहरिया प्रखंडातील आलमपूर गावात घरात बेकायदेशीररीत्या साठवून ठेवलेल्या फटाक्यांना भीषण आग लागून झालेल्या स्फोटांत सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत अनेक जण जखमी झाले असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आलमपूर गावातील एका घरात मोठ्या प्रमाणात फटाके साठवून ठेवण्यात आले होते. या फटाक्यांना अचानक आग लागल्यानंतर जोरदार स्फोट झाले. घटनेच्या वेळी घरात अनेक जण उपस्थित असल्याने दुर्घटनेची तीव्रता वाढली. मृतांपैकी मोहम्मद अमीरूद्दीन मियाँ यांची ओळख पटली असून, ते घरमालक आणि फटाक्यांचे व्यापारी होते. घटनेची माहिती मिळताच मदत पथके आणि रुग्णवाहिका घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मृतांचा आणि जखमींचा नेमका आकडा अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेला नाही.

दरम्यान, यापूर्वी ऑगस्ट महिन्यात उत्तर प्रदेशातील कौशांबी जिल्ह्यातील पिपरी आणि पुरामुफ्ती पोलीस ठाण्यांच्या हद्दीच्या सीमेवरील फटाक्यांच्या गोदामात भीषण स्फोट झाला होता. या दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता, तर परिसरातील अनेक घरांचे नुकसान झाले होते. 'आदित्य' नावाने चालवल्या जाणाऱ्या या गोदामातील स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. फटाक्यांचा बेकायदेशीर साठा आणि सुरक्षेच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे अशा दुर्घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जाहीर नोटीस

विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्र.२६३/२०२५ प्रोसेस क्र.४६०८/२०२६

चौ. ता.०७/१२/२०२६ दिनांक २२/१०/२०२६

अर्जदार : सविता अशोक उर्फ अशोकराव थोरात, वय ५३ वर्ष, रा. नरहरी नगर, पोपटखेड रोड, कोर्टाजवळ, अकोट, ता. अकोट जि. अकोला

.... विरूद्ध ....

गैरअर्जदार : कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हि मयत अशोक उर्फ अशोकराव नाना थोरात यांची विधवा आहे. मयत अशोक उर्फ अशोकराव नाना थोरात हे दि. ११/०८/२०२६ रोजी नरहरी नगर, पोपटखेड रोड, कोर्टाजवळ, अकोट ता. अकोट जि. अकोला येथे आजारपणामुळे मरण पावले. अर्जदार मयत अशोक उर्फ अशोकराव नाना थोरात यांच्या नरहरी नगर, पोपटखेड रोड, कोर्टाजवळ, अकोट ता. अकोट जि. अकोला येथील कायम रहिवाशी आहेत. मयत अशोक उर्फ अशोकराव नाना थोरात व अर्जदार यांना कोणतेही मुलबाळ नव्हते. मयत अशोक उर्फ अशोकराव नाना थोरात यांची आई नामे सत्यभामा नाना थोरात हया दि. ०२/०७/२००८ रोजी अकोट येथे मरण पावल्या. म्हणून अर्जदार हेच मयत अशोक उर्फ अशोकराव नाना थोरात यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानीशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट

'महाराष्ट्र पक्षिमित्र'च्या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा

निफाडचे दत्ताकाका उगावकर ठरले जीवनगौरवाचे मानकरी; अकोल्याचे विलास देशमुख यांना पत्रकारिता पुरस्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी







अकोला , दि. २३ : महाराष्ट्रात पक्षीविषयक कार्य करणारी संस्था महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे देण्यात येणा-या २०२६ च्या पक्षिमित्र पुरस्कारांची घोषणा झाली असून, यंदाचा पक्षिमित्र जीवनगौरव पुरस्कार नाशिक जिल्ह्यातील निफाडचे दत्ताकाका उगावकर यांना जाहीर झाला. तर पुरस्कारांमध्ये पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार ताडदेव, मुंबईच्या मेघना दुर्वे (मिश्रा), पक्षी जनजागृती ताडोबा चंद्रपूरचे पक्ष्यांचे आवाज काढून पक्षी संवर्धनाची जनजागृती करणारे सुमेध वाघमारे, पेठ वडगावचे निसर्गप्रेमी मित्रमंडळ, पक्षी संशोधन पुरस्कार सोलापूरचे राहुल वंजारी, यंदा प्रथमच दिला जाणारा पहिला पक्षी पत्रकारिता पुरस्कार अकोल्याचे विलास देशमुख व नाशिचे आनंद बोरा यांना जाहीर झाला आहे. पक्ष्यांबाबत विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-यांचा गौरव व्हावा म्हणून महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे २०१९ पासून या पुरस्कारांची सुरुवात झाली. सुरुवातीला दरवर्षी चार पुरस्कार देण्यात येत असत. आता ही संख्या सहावर पोचली आहे. पुरस्कारांची घोषणा महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे अमरावतीत संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी केली.

पुरस्कारांचे वितरण २६ व २७ डिसेंबर दरम्यान नाशिकच्या ३९ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात होईल. यंदाचा स्व. रमेश लाडखेडकर स्मृती पक्षिमित्र जीवनगौरव पुरस्कार हा दीर्घकाळ पक्षिमित्र चळवळीत राहून, पक्षी संवर्धन व जनजागृतीसाठी जेष्ठ मार्गदर्शक, नांदूर मध्यमेश्वर पक्षी अभयारण्याचे अभ्यासक नाशिकमधील निफाडचे दत्ताकाका उगावकर यांना जाहीर केला आहे. रोख रक्कम, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून पुरस्कार विदर्भ पक्षिमित्र मंचद्वारे डॉ. अनिल पिंपळापुरे यांनी प्रायोजित केला आहे.

यंदा प्रथमच पत्रकारिता पुरस्कार

» पक्षी संवर्धनासाठी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्याने लिखाण करणारे जागृत व अभ्यासू पत्रकार यांचेसाठी यावर्षी प्रथमच दिला जाणारा पहिला स्व. प्रकाशसिंह नारायणसिंह मोरे स्मृती पक्षिमित्र पत्रकारिता पुरस्कार विविध वृत्तपत्रांमधून पर्यावरण, पक्षी, वन्यजीव आदींवर विपुल लिखाण करणारे अकोला येथील विलास देशमुख आणि नाशिक येथील प्रा. आनंद बोरा या दोन पत्रकारांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार पक्षिमित्र अंकाचे संपादक किरण मोरे यांनी प्रायोजित केला आहे. पुरस्कारांचे वितरण २६ व २७ डिसेंबर दरम्यान नाशिकला होणा-या ३९ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात होईल. पुरस्कारांचे वितरण संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी दिली आहे.

पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, संशोधन व त्यातून संवर्धनाचे कार्य करणा-या तरुणास दिला जाणारा स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती पक्षी संशोधन पुरस्कार सोलापूरचे राहुल वंजारी यांना मिळाला आहे. स्व. नामदेवराव बहादुरे पक्षिमित्र पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार ताडदेव, मुंबईच्या मेघना दुर्वे मिश्रा यांना मिळाला असून तो नागपूर येथील महाराष्ट्र पक्षिमित्रचे सदस्य अनिल बहादुरेतर्फे प्रायोजित आहे. चौथा पुरस्कार स्व. रामभाऊ शिरोडे स्मृती पक्षिमित्र जनजागृती पुरस्कार ताडोबा, चंद्रपूर येथील पक्ष्यांचे आवाज काढून पक्षी संवर्धनाची जनजागृती करणारे सुमेध वाघमारे यांना तसेच पेठ वडगाव जिल्हा कोल्हापूर येथील निसर्ग व पक्षी संवर्धनासाठी कार्यरत संस्था निसर्गप्रेमी मित्रमंडळास मिळाला आहे. रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्हे असे पुरस्काराचे स्वरूप असून हा पुरस्कार अविनाश शिरोडे, नाशिक यांचेतर्फे प्रायोजित.

राज्यात उकाड्याचा तडाखा कायम

मुंबई : राज्यातील हवामानात सध्या बदल होत असून, उष्णतेचा चटका आणि दमट वातावरणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीसही उन्हाचा तडाखा कायम असल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांसाठी उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २४ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत मुंबईतील कमाल तापमान ३६ ते ३७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दिवसा उन्हाचा चटका अधिक जाणवणार असून, दमट हवामानामुळे अस्वस्थतेतही वाढ होऊ शकते.

महत्त्वाचे

फ्रान्समध्ये शामोंडा विषाणूचा संसर्ग; एका व्यक्तीचा मृत्यू

फ्रान्स: कोरोना संकटाच्या आठवणी ताज्या असतानाच फ्रान्समध्ये शामोंडा विषाणूच्या संसर्गामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. प्राण्यांमध्ये आढळणाऱ्या या विषाणूचा मानवाला संसर्ग झाल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. मात्र, सध्या सर्वसामान्य नागरिकांना मोठा धोका नसल्याचे आरोग्य अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. शामोंडा विषाणूचा प्रसार प्रामुख्याने कीटकांच्या चाव्यामुळे होतो. गायींसह गुरांना या विषाणूची लागण होण्याचा धोका अधिक आहे. पूर्वी हा विषाणू मानवांसाठी धोकादायक मानला जात नव्हता. मात्र, फ्रान्समध्ये मानवी संसर्ग आणि मृत्यूची घटना समोर आल्यानंतर चिंता वाढली आहे. हा विषाणू १९६० च्या दशकात नायजेरियात आढळला होता. त्यानंतर आफ्रिका आणि जपानसह इतर भागांतही त्याची नोंद झाली. फ्रान्समधील मृत व्यक्तीला पूर्व भागात संसर्ग झाल्याचा आरोग्य अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. २०२६ च्या वसंत ऋतू आणि उन्हाळ्यात या भागातील गुरांमध्ये विषाणूचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याचे सांगितले जाते.

तमिळनाडूत मुसळधार पाऊस; भिंत कोसळून विद्यार्थिनीचा मृत्यू

चेन्नई : तमिळनाडूमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांत पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. विरुधुनगर जिल्ह्यातील सत्तूरजवळ भाड्याच्या घराची भिंत कोसळून मुथुचेल्वी या १७ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला, तर तिची आई सोलाईअम्मल जखमी झाली. गुरुवारी रात्री ही दुर्घटना घडली. जखमी महिलेला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.दिंडिगुल, इरोड, पेरांबलूर, अरियालूर, तिरुवरूर आणि थेनीसह अनेक जिल्ह्यांत जोरदार पाऊस झाला. दरम्यान, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राचे २६ ऑक्टोबरपर्यंत चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे. त्याचा तमिळनाडूला थेट धोका नसला, तरी राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांत २६ ऑक्टोबरपर्यंत पाऊस सुरू राहू शकतो. राज्यातील ८९ जलाशयांमध्ये २२ ऑक्टोबरपर्यंत एकूण क्षमतेच्या २७.९ टक्के पाणीसाठा होता, जो गतवर्षीच्या तुलनेत १३४.४ टीएमसीने कमी असल्याचे सूत्रांनी सांगितले.

भारत-चीन सीमावादावर आठ मुद्द्यांवर सहमती; अंतिम तोडगा अद्याप दूरच

नवी दिल्ली : भारत आणि चीन यांच्यातील सीमावादावर तोडगा काढण्यासाठी सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांना पुन्हा गती मिळाली आहे. २५ ऑगस्ट २०२६ रोजी चीनची राजधानी बीजिंग येथे भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यात विशेष प्रतिनिधींची २५ वी बैठक पार पडली. या बैठकीत सीमावर्ती भागात शांतता राखणे, सीमा व्यवस्थापन सुधारणे आणि सीमावादावर परस्परांना मान्य होईल असा तोडगा शोधणे यासह आठ मुद्द्यांवर सहमती झाली. मात्र, प्रत्यक्ष सीमेचे अंतिम सीमांकन अद्याप झालेले नसल्याने भारत-चीन सीमावाद कायम आहे.भारत आणि चीन यांच्यातील सीमावादाची पार्श्वभूमी १९६२ च्या युद्धापर्यंत जाते. भारताच्या अधिकृत भूमिकेनुसार, चीनने लडाखमधील अक्साई चीनचा सुमारे ३८ हजार चौरस किलोमीटर भूभाग बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवला आहे. तसेच, १९६३ मध्ये पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरमधील ५,१८० चौरस किलोमीटर भूभाग चीनकडे हस्तांतरित केला होता. भारताने या कराराला मान्यता दिलेली नाही. दुसरीकडे, चीन अरुणाचल प्रदेशातील सुमारे ९० हजार चौरस किलोमीटर भूभागावर दावा करतो.

दिल्लीमध्ये पुन्हा आंदोलनाची शक्यता!

गृह मंत्रालयाने घेतला मोठा निर्णय

नवी दिल्ली :दि. २३ वृत्तसंस्था



केंद्रीय गृह मंत्रालयाने दिल्लीतील सुरक्षेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे आता कॉकरोच जनता पक्षाचं टेन्शन वाढलं आहे.दिल्लीत पुन्हा आंदोलनाचं बिगूल वाजण्याची शक्यता आहे. यासाठी प्रशासन आधीच अलर्ट मोडवर आहे. याबाबत आता मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीत संभाव्य आंदोलनांची शक्यता असल्याने केंद्रीय गृह मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर सीजेपीचेही टेन्शन वाढले आहे. यामुळे आता चर्चांना उधाण आले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने राजधानीतील केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २७३ कंपन्यांची तैनाती ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या महिन्याच्या सुरुवातीला कॉकरोच जनता पक्षाने दिल्लीत आंदोलन छेडले होते. या पार्श्वभूमीवर या कंपन्यांना दिल्लीत आणण्यात आले होते. मात्र आता त्यांच्या तैनातीची मुदत आता वाढवण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने दिल्ली पोलीस आणि संबंधित केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांना २२ ऑक्टोबर रोजी या तैनातीमध्ये समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत.दिल्लीतील आंदोलनांमुळे दिल्ली पोलिसांनी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाची तैनाती २० ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याची विनंती केली होती. याला प्रतिसाद म्हणून दिल्ली पोलिसांनी गृह मंत्रालयाला एक पत्र पाठवले. या पत्राद्वारे केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २७३ कंपन्यांची तैनाती मुदतीनंतरही सुरू ठेवण्याची परवानगी मागण्यात आली होती. १० ऑक्टोबर रोजी सीजेपीने केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत सशस्त्र पोलीस दलाची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आली होती.

दिल्ली पोलिसांच्या विनंतीनंतर गृह मंत्रालयाने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या एकूण ३०१ कंपन्यांच्या तैनातीला मंजुरी दिली आहे. ६ ऑक्टोबर रोजी २२१ कंपन्या आणि ८ ऑक्टोबर रोजी ८० कंपन्या तैनात करण्याची विनंती करण्यात आली होती. सीजेपी आणि इतर संघटनांकडून होणाऱ्या संभाव्य विरोधाच्या पार्श्वभूमीवर गृह मंत्रालयाने दिल्ली पोलिसांकडून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अतिरिक्त तैनातीला मंजुरी दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आंदोलक जंतर मंतर, निवडणूक आयोग, संसद भवन आणि इंडिया गेट यांसारख्या ठिकाणी पुन्हा निदर्शने करण्याची शक्यता आहे. यामुळे दिल्ली पोलीस हाय अलर्टवर आहे. गृह मंत्रालयाला पाठवलेल्या एका पत्रात मंत्र्यांच्या कार्यालयांबाहेर आणि निवासस्थानांबाहेर होणाऱ्या आंदोलनांबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि कोणत्याही संभाव्य परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाची तैनाती वाढवण्याची विनंती दिल्ली पोलिसांनी केली आहे

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र; ओडिशा-आंध्र प्रदेश किनारपट्टीला वादळाचा धोका

नवी दिल्ली :दि. २३ वृत्तसंस्था



बंगालच्या उपसागरात शुक्रवारी कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, त्याची तीव्रता वाढून चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. ही हवामान प्रणाली २४ ऑक्टोबरपर्यंत तीव्र होऊन कमी दाबाच्या अधिक प्रभावी क्षेत्रात, तर २५ ऑक्टोबरपर्यंत तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित होऊ शकते. त्यानंतर २६ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ही प्रणाली पश्चिम-वायव्य दिशेने सरकत उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनारपट्टीच्या दिशेने पुढे जाऊ शकते. संभाव्य वादळाचा धोका लक्षात घेऊन ओडिशा सरकारने आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री सुरेश पुजारी यांनी राज्य प्रशासन सज्ज असल्याचे सांगितले. या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे २३ ते २५ ऑक्टोबरदरम्यान अंदमान बेटे, ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीसह पश्चिम बंगालच्या गंगेच्या खोऱ्यातील काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी वादळी वारे वाहण्याचाही अंदाज आहे. २७ ऑक्टोबर रोजी आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या किनारपट्टीवर वाऱ्यांचा वेग ताशी ६० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यानंतर वाऱ्यांचा वेग वाढू शकतो. संभाव्य वादळाच्या पार्श्वभूमीवर समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या मच्छीमारांनी २४ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत किनाऱ्यावर परतावे, असा सल्ला हवामान विभागाने दिला आहे. दरम्यान, वादळाची तीव्रता, दिशा आणि किनारपट्टीवरील संभाव्य परिणाम यांवर हवामान विभाग लक्ष ठेवून आहे.

कर्करोगाच्या औषधांच्या किमती कमी होण्याची शक्यता; केंद्र सरकारचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव

औषधांवरील विक्री नफ्याचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्याचा विचार

नवी दिल्ली :दि. २३ वृत्तसंस्था



कर्करोगावरील उपचारांचा वाढता खर्च रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठी आर्थिक समस्या बनला आहे. महागडी औषधे, रुग्णालयांचा खर्च आणि दीर्घकाळ चालणाऱ्या उपचारांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. या पार्श्वभूमीवर कर्करोगाच्या औषधांच्या किमती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकार पावले उचलण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. औषधांच्या विक्रीतील नफ्याचे प्रमाण म्हणजेच विक्री मार्जिन ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्याच्या प्रस्तावामुळे काही औषधांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात या प्रस्तावाबाबत भूमिका मांडल्याचे वृत्त आहे. औषध उत्पादकाकडून खरेदी केल्यानंतर वितरक आणि विक्रेत्यांना मिळणाऱ्या विक्रीतील नफ्याचे प्रमाण मर्यादित केल्यास औषधांच्या अंतिम किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते. मात्र, प्रस्तावाची व्याप्ती आणि अंतिम अटी निश्चित झाल्यानंतरच त्याचा प्रत्यक्ष परिणाम स्पष्ट होणार आहे.

उपलब्ध माहितीनुसार, या प्रस्तावामुळे काही कर्करोगाच्या औषधांच्या किमती २० ते ७० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. तथापि, सर्व औषधांच्या किमती एवढ्या प्रमाणात कमी होतील, असे निश्चितपणे सांगता येत नाही. औषधाचा प्रकार, सध्याची किंमत, वितरण व्यवस्था आणि अंतिम धोरणातील तरतुदींवर दरकपातीचे प्रमाण अवलंबून असेल.

औषधांच्या किमतींबाबत निर्णय घेण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आल्याचेही वृत्त आहे. आरोग्य सेवा महासंचालकांच्या अध्यक्षतेखालील या समितीला १० ते १५ दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाच्या ८ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीतही या प्रस्तावावर चर्चा झाल्याचे सांगितले जाते. समितीच्या अहवालानंतर पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. कर्करोगाच्या औषधांच्या किमती कमी करण्यासाठी केंद्र सरकारने यापूर्वीही उपाययोजना केल्या आहेत. २०१९ मध्ये ४२ कर्करोगविरोधी औषधांवरील विक्री मार्जिन ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आले होते. त्यानंतर ५२६ औषधांच्या ब्रँडच्या किमती कमी झाल्याचे सांगितले जाते. कर्करोगाच्या उपचारांमध्ये औषधांवर होणारा खर्च हा रुग्णांच्या एकूण खर्चातील महत्त्वाचा भाग असतो. त्यामुळे प्रस्तावाची अंमलबजावणी झाल्यास संबंधित औषधे वापरणाऱ्या रुग्णांना आर्थिक दिलासा मिळू शकतो.

एअर इंडियाच्या विमानात उड्डाणानंतर तांत्रिक बिघाड; १०९ प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले

हैदराबाद : दि. २३ वृत्तसंस्था



शमशाबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मुंबईच्या दिशेने उड्डाण केलेल्या एअर इंडियाच्या विमानात अवघ्या पाच मिनिटांत तांत्रिक बिघाड झाल्याची घटना शुक्रवारी घडली. वैमानिकाने तत्काळ हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला माहिती दिल्यानंतर विमानाचे सुरक्षितपणे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. या विमानात १०९ प्रवासी होते. वेळीच योग्य निर्णय घेतल्याने संभाव्य दुर्घटना टळली.

अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एअर इंडियाच्या 'एआय ४१७' या विमानाने हैदराबादहून मुंबईच्या दिशेने उड्डाण केले होते. मात्र, उड्डाणानंतर सुमारे पाच मिनिटांतच वैमानिकाच्या लक्षात तांत्रिक बिघाड आला. त्यांनी तातडीने हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला याबाबत कळवले. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार विमान पुन्हा शमशाबाद विमानतळावर आणण्यात आले आणि सुरक्षितपणे उतरवण्यात आले.

या घटनेमुळे विमानातील १०९ प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, वैमानिकाने वेळीच सतर्कता दाखवून विमान सुरक्षितपणे उतरवल्याने मोठा अनर्थ टळला. विमानातील तांत्रिक बिघाडाचे नेमके कारण काय, याबाबत अधिकृत तपशील समोर आलेला नाही. दरम्यान, याच महिन्याच्या सुरुवातीला शमशाबाद विमानतळावर इंडिगोच्या विमानातही सुरक्षेशी संबंधित घटना घडली होती. बोर्डिंगदरम्यान आपत्कालीन दरवाजाचा इशारा देणारी घंटा वाजल्यानंतर एका प्रवाशाला विमानातून उतरवण्यात आले होते. संबंधित प्रवाशाला आपत्कालीन दरवाजाजवळील आसनावर हलवण्यात आल्यानंतर हा प्रकार घडला.

लोकटक दिन आता राज्य महोत्सव म्हणून साजरा होणार

लोकटक तलावाच्या संवर्धनासाठी पुढाकार; सांस्कृतिक वारसा आणि जैवविविधतेच्या संरक्षणावर भर

इंफाळ : दि. २३ वृत्तसंस्था

ईशान्य भारतातील सर्वांत मोठ्या गोड्या पाण्याच्या तलावांपैकी एक असलेल्या लोकटक तलावाचे सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि आर्थिक महत्त्व अधोरेखित करण्यासाठी मणिपूर सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री युमनाम खेमचंद सिंग यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'लोकटक दिन' हा दरवर्षी अधिकृत राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे तलावाच्या संवर्धनाबाबत जनजागृती वाढण्यास आणि स्थानिक सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

मणिपूरची राजधानी इंफाळ येथील मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पारंपरिक मणिपुरी पंचांगानुसार 'मेरा' महिन्यातील पौर्णिमेला हा दिवस साजरा केला जाणार आहे. यंदाच्या महोत्सवाचे आयोजन थंगा येथील लोकटक लैरेम्बी मैदान आणि कोमलाखोंग येथे करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. लोकटक विकास प्राधिकरण, स्थानिक नागरिक, विविध संस्था आणि प्रशासन यांच्या सहभागातून महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे.

मणिपूरमधील मोइरांग परिसरात असलेला लोकटक तलाव प्रदूषण, पाण्याच्या पातळीतील बदल आणि परिसंस्थेवरील वाढता ताण यांमुळे तलावाच्या संवर्धनाचे आव्हान गंभीर बनले आहे. 'लोकटक दिन' महोत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक खेळ आणि पर्यावरण संवर्धनाशी संबंधित उपक्रम राबवून नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. या निर्णयामुळे लोकटक तलावाचे संरक्षण आणि स्थानिक समुदायांच्या उपजीविकेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आपल्या नैसर्गिक वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध आहे. या तलावाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पाण्यावर तरंगणारे 'फुम्दी' हे नैसर्गिक थर. वनस्पती, माती आणि सेंद्रिय पदार्थांपासून तयार झालेल्या या तरंगत्या रचना तलावाच्या परिसंस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. तलावातील मासेमारी, शेती आणि पर्यटनावर अनेक स्थानिक कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे.

लोकटक तलावाच्या दक्षिण भागात असलेले किबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यान हे जगातील एकमेव तरंगते राष्ट्रीय उद्यान म्हणून ओळखले जाते. मणिपूरचे राज्यप्राणी असलेल्या दुर्मिळ संगाई हरणाचा हा नैसर्गिक अधिवास आहे.

सौदी अरेबियात दोन बांगलादेशी नागरिकांना फाशी; अन्य २० कैद्यांच्या भवितव्याबाबत चिंता

दूतावासाला पूर्वसूचना न दिल्याचा आरोप; शिक्षेचा तपशील मागण्यासाठी बांगलादेशची राजनैतिक पावले

नवी दिल्ली :दि.२३ वृत्तसंस्था



दोन बांगलादेशी नागरिकांना फाशी देण्यात आल्याचे वृत्त समोर आल्यानंतर बांगलादेश आणि सौदी अरेबिया यांच्यातील राजनैतिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर सौदीतील विविध तुरुंगांमध्ये बंदिस्त असलेल्या अन्य २० बांगलादेशी कैद्यांच्या शिक्षेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. सौदी प्रशासनाने बांगलादेशच्या वाणिज्य दूतावासाला दिलेल्या कैद्यांच्या यादीत संबंधित व्यक्तींच्या नावापुढे 'दोषी' असा उल्लेख असला, तरी शिक्षेचे स्वरूप आणि न्यायालयीन निकालाचा तपशील देण्यात आलेला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

बांगलादेशातील 'प्रथम आलो' या वृत्तपत्राच्या अहवालानुसार, सौदी प्रशासनाने ३० सप्टेंबर रोजी जेद्दाहमधील बांगलादेशच्या वाणिज्य दूतावासाला २,४६१ बांगलादेशी कैद्यांची यादी दिली होती. या यादीतील २२ कैद्यांच्या नावापुढे 'दोषी' असा उल्लेख आढळला. मात्र, त्यांच्या न्यायालयीन निकालाचा सारांश आणि शिक्षेचा तपशील नमूद करण्यात आला नव्हता. या २२ कैद्यांपैकी नझरुल इस्लाम आणि स्वीटी अख्तर या दोघांना फाशी देण्यात आल्याचे वृत्त आहे. त्यामुळे उर्वरित २० कैद्यांच्या भवितव्याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

प्रारंभीच्या वृत्तांमध्ये नझरुल इस्लाम आणि स्वीटी अख्तर हे पती-पत्नी असल्याचे सांगण्यात आले होते. त्यांच्यावर मक्का येथील पवित्र मशिदीच्या परिसरात अनैतिक कृत्य केल्याचा आरोप असल्याचेही वृत्त होते. मात्र, त्यांच्या कुटुंबीयांनी हे दावे फ ेटाळले आहेत. दोघेही पती-पत्नी नव्हते, तर सौदी अरेबियातील अल-मजल या सफाई कंपनीत काम करत होते, असे त्यांच्या नातेवाइकांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत जेद्दाहमधील बांगलादेशच्या महावाणिज्य दूतावासाने सौदी अधिकाऱ्यांकडे स्पष्टीकरण मागितले आहे. १९ ऑक्टोबर रोजी सौदी अरेबियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या जेद्दाह शाखेला राजनैतिक पत्र पाठवून संबंधित कैद्यांच्या खटल्यांचा तपशील, न्यायालयीन निकालांच्या प्रती आणि शिक्षेची अचूक माहिती देण्याची मागणी करण्यात आल्याचे वृत्त आहे.

परदेशात अटक झालेल्या नागरिकांना दूतावासाशी संपर्क साधण्याचा अधिकार आणि संबंधित देशाच्या कायद्यानुसार मदत मिळणे महत्त्वाचे मानले जाते. या प्रकरणात दूतावासाला वेळेत माहिती देण्यात आली होती का, तसेच न्यायालयीन प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडली, याबाबत बांगलादेशकडून स्पष्टीकरण मागितले जात आहे. सौदी प्रशासनाच्या अधिकृत उत्तरानंतरच उर्वरित कैद्यांच्या शिक्षेबाबतची स्थिती स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

गंभीर दखल घेत जेद्दाहमधील बांगलादेशच्या महावाणिज्य दूतावासाने सौदी अधिकाऱ्यांकडे स्पष्टीकरण मागितले आहे. १९ ऑक्टोबर रोजी सौदी अरेबियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या जेद्दाह शाखेला राजनैतिक पत्र पाठवून संबंधित कैद्यांच्या खटल्यांचा तपशील, न्यायालयीन निकालांच्या प्रती आणि शिक्षेची अचूक माहिती देण्याची मागणी करण्यात आल्याचे वृत्त आहे.

परदेशात अटक झालेल्या नागरिकांना दूतावासाशी संपर्क साधण्याचा अधिकार आणि संबंधित देशाच्या कायद्यानुसार मदत मिळणे महत्त्वाचे मानले जाते. या प्रकरणात दूतावासाला वेळेत माहिती देण्यात आली होती का, तसेच न्यायालयीन प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडली, याबाबत बांगलादेशकडून स्पष्टीकरण मागितले जात आहे. सौदी प्रशासनाच्या अधिकृत उत्तरानंतरच उर्वरित कैद्यांच्या शिक्षेबाबतची स्थिती स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

नझरुलच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, कामाच्या ठिकाणी झालेल्या वादातून एका सहकाऱ्याने त्याच्याविरोधात कट रचून त्याला खोट्या प्रकरणात अडकवले. स्वीटी अख्तरच्या कुटुंबीयांनीही कामाच्या ठिकाणी झालेल्या वादानंतर ऑगस्ट २०२३ मध्ये तिला अटक करण्यात आल्याचा दावा केला आहे. न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान स्वतःची बाजू मांडण्यासाठी वकील मिळाला नाही आणि निष्पक्ष सुनावणीची संधीही देण्यात आली नाही, असा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

तिबेटमध्ये ७ रिश्टर तीव्रतेचा भूकंप; १६ जणांचा मृत्यू, ३०० हून अधिक घरे कोसळल्याचा दावा

नवी दिल्ली :दि.२३ वृत्तसंस्था

तिबेट प्रदेशात ७ रिश्टर तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाल्याने मोठी जीवित व वित्तहानी झाल्याचे वृत्त समोर आले आहे. या भीषण आपत्तीत किमान १६ जणांचा मृत्यू झाला असून ३२ हून अधिक नागरिक जखमी झाल्याची माहिती देण्यात आली आहे. भूकंपामुळे ३०० हून अधिक घरे कोसळल्याचा दावाही करण्यात आला आहे. ढिगाऱ्याखाली आणखी नागरिक अडकले असण्याची शक्यता असल्याने बचावकार्याला वेग देण्यात आला आहे.

स्थानिक वेळेनुसार गुरुवारी रात्री १० वाजून ३३ मिनिटांनी भूकंपाचे जोरदार धक्के बसल्याचे वृत्त आहे. अचानक झालेल्या धक्क्यांमुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. अनेकांनी घराबाहेर धाव घेतली; मात्र काही ठिकाणी घरे कोसळल्याने मोठे नुकसान झाले. भूकंपामुळे वीजपुरवठा आणि दूरसंचार सेवा विस्कळीत झाल्याने मदतकार्यापुढे अडचणी निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू उत्तर तिबेटमधील नागचू परिसरातील बाचेन काउंटीच्या मारू टाउनशिपजवळ असल्याचे वृत्त आहे. हा भाग तिबेटची राजधानी ल्हासापासून सुमारे ३९० किलोमीटर ईशान्येला असून समुद्रसपाटीपासून सुमारे ४,८६४ मीटर उंचीवर आहे. दुर्गम पर्वतीय भूप्रदेश आणि कडाक्याच्या थंडीमुळे बचाव पथकांना घटनास्थळी पोहोचणे तसेच ढिगारे हटवणे कठीण जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणांना सतर्क केले असून शोध आणि बचावकार्य सुरू केले आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेतला जात असून मृतांचा आकडा आणि नुकसानीची व्याप्ती वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र, या घटनेची तारीख, भूकंपाची तीव्रता, मृतांची संख्या आणि नुकसानीचे तपशील अधिकृत स्रोतांकडून पडताळणे आवश्यक आहे. त्यामुळे ही बातमी प्रकाशित करण्यापूर्वी संबंधित भूकंप निरीक्षण संस्था आणि अधिकृत प्रशासनाकडून माहितीची खातरजमा करावी.

हे पत्र मालक,प्रकाशक, **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे यांनी तिक्ष्णगत मीडिया प्रा.लि.**करिता डी.बी.कॉर्प.लि.,एन.एच.६, बोरगाव मंजू, अकोला (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून दै. अजिंक्य भारत, मुख्य कार्यालय सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)** आरएनआय-MAHMAR/2009/35271 (ई-मेल- ajinkyabharat23@gmail.com)

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

संपादकीय...

सावध राहण्याची नव्हे, तर सज्ञतेची वेळ ओळखावी

भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद हा केवळ दोन देशांमधील जमिनीच्या तुकड्याचा संघर्ष नाही, तर तो राष्ट्रीय अस्मिता, सार्वभौमत्व, सामरिक सुरक्षा आणि आशियातील वर्चस्वाच्या लढाईशी संबंधित आहे. अरुणाचल प्रदेशच्या सीमावर्ती भागात भारतीय आणि चिनी सैन्यादरम्यान पुन्हा संघर्षाच्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, भारत-तिबेट सीमा पोलीस दलाचे महासंचालक शत्रुजीत कपूर यांनी अरुणाचल प्रदेशात अनेक ठिकाणी भारतीय आणि चिनी सैन्यादरम्यान समोरासमोर संघर्षाच्या घटना घडल्याची आणि परिस्थिती अद्याप कायम असल्याची माहिती दिली. त्यामुळे सीमावर्ती परिस्थितीचे गांभीर्य वाढले आहे. या घडामोडींकडे केवळ एखाद्या सीमावर्ती घटनेच्या स्वरूपात पाहून चालणार नाही. चीनच्या विस्तारवादी धोरणाचा इतिहास, भारतीय भूभागावरील त्याचे दावे आणि सीमारेषेवर वारंवार निर्माण होणारा तणाव लक्षात घेता भारताला प्रत्येक पाऊल अत्यंत विचारपूर्वक टाकावे लागणार आहे. एकीकडे देशाच्या सीमांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आणि दुसरीकडे युद्ध टाळून शांतता कायम ठेवण्याचे आव्हान, अशा दुहेरी परिस्थितीत भारताची भूमिका निर्णायक ठरणार आहे. अरुणाचल प्रदेश हा भारताच्या ईशान्येकडील महत्त्वाचा सीमावर्ती प्रदेश आहे. चीन या राज्यातील भूभागावर आपला दावा सांगत आला आहे. मात्र, भारताने अरुणाचल प्रदेश हा देशाचा अविभाज्य भाग असल्याची भूमिका सातत्याने स्पष्ट केली आहे. चीनने एखाद्या भारतीय प्रदेशावर दावा केला किंवा तेथील गावांची नावे बदलली, म्हणून त्या प्रदेशाचे सार्वभौमत्व बदलत नाही. भूभागावरील अधिकार हा केवळ दुसऱ्या देशाच्या घोषणांवर ठरत नसतो. चीनची रणनीती अनेकदा सीमावर्ती भागात दबाव निर्माण करणे, आपल्या दाव्यांच्या मर्यादा पुढे रेटण्याचा प्रयत्न करणे आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थिती बदलण्यासाठी संधी शोधणे, अशी राहिल्याचे भारताच्या सुरक्षा धोरणासमोरील आव्हानांतून दिसून येते. अरुणाचल प्रदेशातील तणावाच्या वृत्तांमुळे पुन्हा एकदा या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे.चीनच्या प्रत्येक कृतीला युद्धाचे आव्हान समजणे योग्य ठरणार नाही; परंतु प्रत्येक घटनेकडे दुर्लक्ष करणेही तितकेच धोकादायक आहे. भारताने परिस्थितीचे वास्तववादी मूल्यमापन करून सीमावर्ती भागातील आपली उपस्थिती, गुप्तचर यंत्रणा आणि संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम ठेवली पाहिजे. जून २०२० मध्ये लडाखमधील गलवान खोऱ्यात भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या हिंसक संघर्षात भारताचे २० जवान शहीद झाले. या घटनेने भारत-चीन संबंधांना मोठा धक्का बसला. दोन्ही देशांमधील विश्वासाला तडा गेला आणि सीमावर्ती भागातील सैन्यतैनातीचा प्रश्न अधिक गंभीर बनला. गलवानमधील घटनेने एक महत्त्वाचा धडा दिला. आंतरराष्ट्रीय स्तरावर मैत्रीचे दावे, आर्थिक सहकार्याच्या घोषणा आणि चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या, तरी राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही गाफील वृत्ती परवडणारी नाही. सीमावर्ती भागात शांतता टिकवायची असेल, तर दोन्ही बाजूंनी प्रत्यक्ष कृतीतून करारांचे पालन करणे आवश्यक आहे. भारत आणि चीन यांच्यात ऑक्टोबर २०२४ मध्ये लडाखमधील डेपसांग आणि डेमचोक या भागांतील तणाव कमी करण्यासाठी गस्त आणि सैन्य माघारीसंदर्भात सहमती झाली होती. त्यानंतर संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र, एका भागातील तणाव कमी झाला म्हणून दुसऱ्या भागातील सुरक्षेची आव्हाने संपली, असे समजणे चुकीचे ठरेल. अरुणाचल प्रदेशातील अलीकडील घटनांनी ही बाब पुन्हा स्पष्ट केली आहे. सीमेवरील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने कोणती भूमिका घ्यावी, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. भारताची भूमिका तीन प्रमुख तत्त्वांवर आधारित असली पाहिजेराष्ट्रीय सार्वभौमत्वाचे संरक्षण, सैन्याची प्रभावी सज्जता आणि राजनैतिक संवादातून तणाव कमी करणे. पहिले म्हणजे, भारतीय भूभागाच्या संरक्षणाबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये. सीमावर्ती भागात घुसखोरीचा प्रयत्न झाला, तर त्याला कायदेशीर आणि सामरिक चौकटीत राहून प्रभावी प्रत्युत्तर देण्याची क्षमता भारतीय सैन्याकडे असली पाहिजे. देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे.दुसरे म्हणजे, सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे. उंच पर्वतरांगांमध्ये रस्ते, पूल, संपर्क व्यवस्था, आधुनिक शस्त्रास्त्रे, देखरेख यंत्रणा आणि आवश्यक रसद वेळेवर उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. युद्धाच्या परिस्थितीत केवळ सैनिकांचे शौर्य पुरेसे नसते; त्यांना आधुनिक साधने, अचूक माहिती आणि वेळेवर मदत मिळणेही तितकेच आवश्यक असते. तिसरे म्हणजे, भारताने राजनैतिक संवादाचे मार्ग खुले ठेवले पाहिजेत. चर्चेला कमजोरी समजणे ही मोठी चूक ठरेल. मात्र, संवादाच्या नावाखाली राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करणेही योग्य नाही. भारताने शांततेची इच्छा व्यक्त करतानाच आपल्या सीमांचे संरक्षण करण्याचा निर्धार कृतीतून दाखविला पाहिजे.सीमेवर तैनात असलेले भारतीय जवान प्रतिकूल हवामान, उणे तापमान, दुर्गम पर्वतरांगा आणि मर्यादित साधनसामग्री अशा परिस्थितीत देशाचे रक्षण करतात. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेमुळेच देशातील नागरिक सुरक्षित वातावरणात आपले दैनंदिन जीवन जगू शकतात. त्यामुळे सीमावर्ती भागात संघर्षाची परिस्थिती निर्माण झाल्यास देशाने आपल्या जवानांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. मात्र, जवानांविषयीचा आदर केवळ घोषणांपुरता मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या प्रशिक्षणासाठी, आधुनिक उपकरणांसाठी, आरोग्य सुविधांसाठी आणि कुटुंबांच्या कल्याणासाठी सरकारने आवश्यक त्या उपाययोजना केल्या पाहिजेत. भारत-तिबेट सीमा पोलीस दलाने अरुणाचल प्रदेशातील तणावपूर्ण परिस्थिती हाताळण्यासाठी विशेष प्रशिक्षित शौर्य कमांडो पथकांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याचे दलाच्या महासंचालकांनी नमूद केले आहे. तसेच, सीमावर्ती भागातील संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन आणि भूमिगत संरक्षण सुविधांवर भर देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. आधुनिक युद्धपद्धती झपाट्याने बदलत आहेत. त्यामुळे भारताने पारंपरिक सैन्यशक्तीबरोबरच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रहाधारित देखरेख आणि ड्रोनविरोधी यंत्रणा यांमध्येही गुंतवणूक वाढवली पाहिजे. सीमेवरील संघर्ष हा देशाच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय आहे. अशा वेळी सरकारने पारदर्शकतेची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. लष्करी कारवाईची गोपनीय माहिती उघड करणे शक्य नसले, तरी देशाच्या सीमांवर नेमकी परिस्थिती काय आहे, सरकार कोणती पावले उचलत आहे आणि नागरिकांनी कोणत्या माहितीवर विश्वास ठेवावा, याबाबत अधिकृत स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे. विरोधी पक्षांनीही राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित करताना जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे. सरकारच्या भूमिकेवर प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा अधिकार आहे; मात्र, अप्रमाणित माहिती पसरवून जनतेत भीती निर्माण करणे टाळले पाहिजे. त्याचप्रमाणे, सरकारनेही टीकेला केवळ राजकीय विरोध म्हणून नाकारण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे जनतेचा विश्वास संपादन केला पाहिजे. राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नावर मतभेद असू शकतात; परंतु देशाचे सार्वभौमत्व आणि सैनिकांचे मनोबल याबाबत व्यापक राष्ट्रीय एकमत असणे आवश्यक आहे. भारत आणि चीन या दोन्ही देशांकडे मोठी लोकसंख्या, प्रचंड आर्थिक क्षमता आणि सामरिक सामर्थ्य आहे. दोन अण्वस्त्रधारी देशांमध्ये व्यापक युद्ध पेटल्यास त्याचे परिणाम केवळ दोन्ही देशांपुरते मर्यादित राहणार नाहीत. संपूर्ण आशियाच्या अर्थव्यवस्थेवर आणि जागतिक शांततेवर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.म्हणूनच भारताने युद्धखोरीच्या मार्गावर जाण्याऐवजी सक्षम प्रतिबंधक संरक्षणव्यवस्था उभी केली पाहिजे.

संयुक्त राष्ट्र दिन : शांततामय आणि समताधिष्ठित विश्वनिर्मितीचा संकल्प



प्रासंगिक

डॉ. राजेंद्र बगाटे
bagate.rajendra5@gmail.com

दरवर्षी २४ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'संयुक्त राष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचे स्मरण करून देणारा नसून, संपूर्ण मानवजातीने शांतता, सहकार्य, समानता, न्याय आणि मानवी प्रतिष्ठा यांसाठी स्वीकारलेल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. जगातील विविध राष्ट्रांच्या भाषा, संस्कृती, धर्म, राजकीय व्यवस्था आणि आर्थिक परिस्थिती वेगवेगळी असली, तरी युद्ध, दारिद्र्य, भूक, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि सामाजिक विषमता यांसारखे प्रश्न संपूर्ण मानवजातीसमोर आव्हान निर्माण करतात. या समस्यांचे परिणाम कोणत्याही एका देशापुरते मर्यादित राहत नाहीत. त्यामुळे जागतिक प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रांमध्ये संवाद, परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना असणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि भयमुक्त जीवन जगता यावे, तसेच राष्ट्रांमधील संघर्षांचे निराकरण शांततापूर्ण मार्गाने व्हावे, या व्यापक उद्देशातून संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती झाली. म्हणूनच संयुक्त राष्ट्र दिन हा जागतिक ऐक्याचा संकल्प दृढ करण्याचा आणि मानवतेसमोरील प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे.

विसाव्या शतकातील दोन महायुद्धांनी जगाला मानवी विनाशाची भीषण अनुभूती दिली. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय शांतता टिकविण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली; मात्र दुसऱ्या महायुद्धाला रोखण्यात त्याला यश आले नाही. १९३९ ते १९४५ या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धात कोट्यवधी लोकांना प्राण गमवावे लागले. अनेक शहरे उद्ध्वस्त झाली, अर्थव्यवस्था कोलमडल्या आणि असंख्य कुटुंबे विस्थापित झाली. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्यांनी विज्ञानाच्या प्रगतीचा विनाशकारी वापर किती भयानक ठरू शकतो, हे संपूर्ण जगाला दाखवून दिले. युद्धामुळे निर्माण होणारा द्वेष, असुरक्षितता आणि मानवी हक्कांचा ऱ्हास यांचा परिणाम अनेक पिढ्यांवर होतो, याची जाणीव जगाला झाली. राष्ट्रांमधील मतभेद केवळ शस्त्रांच्या बळावर सोडविण्याचा प्रयत्न केल्यास विनाश वाढतो; त्याऐवजी संवाद, मध्यस्थी, आंतरराष्ट्रीय कायदा आणि परस्पर सहकार्य यांना प्राधान्य दिले पाहिजे, हा विचार अधिक दृढ झाला. याच ऐतिहासिक पार्श्वभूमीवर जागतिक शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी अधिक व्यापक व प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना ही या प्रयत्नांचा ऐतिहासिक परिणाम होता. १९४५ मध्ये सॅन फ्रान्सिस्को येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत संयुक्त राष्ट्रांची सनद तयार करण्यात आली. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी आवश्यक अटी पूर्ण झाल्यानंतर ही सनद अंमलात आली आणि संयुक्त राष्ट्र संघटना अधिकृतपणे अस्तित्वात आली. त्यामुळे दरवर्षी २४ ऑक्टोबर हा संयुक्त राष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. या संघटनेच्या सनदेत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे, राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे, आर्थिक व सामाजिक समस्यांवर सहकार्य वाढविणे आणि मानवी हक्कांविषयी आदर प्रस्थापित करणे ही प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांची स्थापना म्हणजे युद्धाने उद्ध्वस्त झालेल्या जगाने शांततापूर्ण भविष्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. राष्ट्रांनी आपापले मतभेद बाजूला ठेवून जागतिक कल्याणासाठी एकत्र येण्याची आवश्यकता या संघटनेने अधोरेखित केली. तथापि, संघटनेच्या स्थापनेनंतरही जगात अनेक युद्धे आणि संघर्ष झाले. यावरून शांततेसाठी केवळ संघटना स्थापन करणे पुरेसे नसून तिच्या उद्दिष्टांप्रती राष्ट्रांची प्रामाणिक बांधिलकीही आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.



आज संयुक्त राष्ट्र संघटना ही जगातील जवळजवळ सर्व स्वतंत्र राष्ट्रांना एकत्र आणणारी व्यापक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. तिच्या महासभेत प्रत्येक सदस्य राष्ट्राला प्रतिनिधित्व मिळते आणि जागतिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडण्याची संधी उपलब्ध होते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याची विशेष जबाबदारी सुरक्षा परिषदेवर आहे. मात्र, सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्यांना असलेल्या नकाराधिकारामुळे अनेक महत्त्वाच्या निर्णयांवर मोठ्या राष्ट्रांच्या राजकीय हितसंबंधांचा प्रभाव पडतो. त्यामुळे या व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी सातत्याने केली जाते. विकसनशील राष्ट्रांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे, निर्णयप्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर अधिक न्याय्य पद्धतीने निर्णय घेतले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. या मर्यादा असूनही संयुक्त राष्ट्र संघटना विविध देशांना संवादासाठी एक समान व्यासपीठ उपलब्ध करून देते. राष्ट्रांमध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु मतभेदांचे रूपांतर हिंसाचारात होऊ न देता त्यावर शांततापूर्ण मार्ग शोधणे, हे आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. जागतिक शांतता हा संयुक्त राष्ट्रांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. आजही जगातील अनेक भागांत युद्धे, सीमावाद, गृहसंघर्ष, दहशतवाद आणि राजकीय अस्थिरता यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन संकटात सापडले आहे. युद्धाचा परिणाम केवळ रणांगणावर लढणाऱ्या सैनिकांपुरता मर्यादित राहत नाही. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि सामान्य नागरिकांना त्याची मोठी किंमत मोजावी लागते. घरे, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा व्यवस्था आणि रोजगाराची साधने उद्ध्वस्त झाल्यामुळे समाजाची विकासप्रक्रिया खंडित होते. लाखो लोकांना आपली जन्मभूमी सोडून विस्थापित किंवा निर्वासित म्हणून जगावे लागते. अशा परिस्थितीत युद्धविरामासाठी प्रयत्न करणे, वाटाघाटींना प्रोत्साहन देणे, संघर्षग्रस्त भागांत मानवतावादी मदत पोहोचविणे आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य घडवून आणणे, ही संयुक्त राष्ट्रांची महत्त्वाची कार्ये आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये विविध देशांचे सैनिक, पोलीस आणि नागरी तज्ज्ञ सहभागी होतात. या मोहिमांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असला, तरी संघर्षग्रस्त प्रदेशांत स्थैर्य निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. खरी शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला भयमुक्त आणि सन्मानपूर्ण जीवन जगता येणे होय.

मानवी हक्कांचे संरक्षण हे संयुक्त राष्ट्रांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा स्वीकारला. प्रत्येक व्यक्तीला जन्मतः प्रतिष्ठा आणि समान हक्क प्राप्त आहेत, ही या जाहीरनाम्याची मध्यवर्ती भूमिका आहे. जीवनाचा अधिकार, स्वातंत्र्य, सुरक्षितता, शिक्षण, काम, अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि भेदभावापासून संरक्षण यांसारख्या हक्कांना त्यात महत्त्व देण्यात आले. जात, धर्म, वंश, भाषा, लिंग किंवा सामाजिक स्थितीच्या आधारे व्यक्तीशी भेदभाव होऊ नये, हा आधुनिक मानवी हक्कविचाराचा मूलभूत आधार आहे. तथापि, आजही अनेक समाजांमध्ये जातीय भेदभाव, वर्णद्वेष, स्त्री-पुरुष विषमता, बालमजुरी, मानवी तस्करी आणि अल्पसंख्याकांवरील अन्याय दिसून येतो. यावरून मानवी हक्कांची घोषणा करणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे यांत मोठे अंतर असल्याचे स्पष्ट होते. हे अंतर कमी करण्यासाठी प्रभावी कायदे, उत्तरदायी प्रशासन, न्यायव्यवस्थेची उपलब्धता आणि नागरिकांमध्ये सामाजिक संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा आदर करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक व सामाजिक कर्तव्य आहे.

शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रांत संयुक्त राष्ट्रांच्या विविध विशेषीकृत संस्था महत्त्वाचे कार्य करतात. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना म्हणजेच युनेस्को शिक्षणाचा प्रसार, सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आणि वैज्ञानिक सहकार्य वाढविण्यासाठी प्रयत्न करते. जागतिक आरोग्य संघटना सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी, रोगप्रतिबंधासाठी आणि आरोग्यविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्यासाठी कार्य करते. युनिसेफ बालकांचे आरोग्य, पोषण, शिक्षण आणि संरक्षण यांना प्राधान्य देते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना कामगारांचे हक्क, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि सामाजिक न्याय यांसाठी कार्यरत आहे. निर्वासितविषयक संयुक्त राष्ट्रांचे उच्चायुक्त कार्यालय संघर्ष आणि छळामुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करते. या संस्थांच्या कार्यातून एक महत्त्वाचे तत्त्व स्पष्ट होते की विकास म्हणजे केवळ आर्थिक उत्पादनवाढ नव्हे. प्रत्येक व्यक्तीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा, सुरक्षित निवारा आणि सन्मानजनक रोजगार मिळणे आवश्यक आहे. समाजातील वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेपासून दूर राहिले, तर विकासाची उद्दिष्टे अपूर्ण राहतात.

जागतिक आर्थिक विषमता आणि दारिद्र्य ही मानवजातीसमोरील गंभीर आव्हाने आहेत. काही राष्ट्रांनी विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि व्यापाराच्या क्षेत्रांत मोठी प्रगती केली असली, तरी अनेक देशांतील लोकांना अन्न, स्वच्छ पाणी, आरोग्यसेवा (पान ५ वर...)

'ती' चे स्वातंत्र्य



वास्तव

सौ. योगिता पाऊलझगडे
उद्योजिका, मो. 9921073730

आणि देशाचे नाव उज्वल करताना दिसून येत आहे. स्त्री आयुष्यात आलेल्या प्रत्येक परिस्थितीला सामोरे जाऊन स्वातंत्र्य म्हणजे ''दिखाऊ



आणि त्यातून मार्ग काढून प्रगती करत राहणे हे गुण महिलांना जन्मतः प्राप्त असते पण कर्त्या स्त्रीला गरज असते ती फक्त स्वतःच्या कुटुंबाच्या भक्कम आधाराची आणि प्रेम व सन्मानाची आज असे कोणतेही क्षेत्र नाही की, तिथे महिला कार्यरत नाही. शिक्षण क्षेत्र ,उद्योग क्षेत्र तसेच लष्करी दलापर्यंतचा उच्चांक स्त्रियांनी पटकावलेला आहे.

चूल आणि मूल या चौकटीतून बाहेर पडून आजची स्त्री सगळीकडे आपल्या कुटुंबाचे

स्वातंत्र्य '' नव्हे तर प्रत्येक स्त्रीला स्वतःच्या इच्छा, स्वप्ने आणि निर्णय घेण्याच स्वातंत्र्य असलंच पाहिजे. खऱ्या अर्थाने सामाजिक ,आर्थिक आणि मानसिक पातळीवर त्यांना स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे.

स्त्री जन्म हा परिपूर्ण मानला जातो.

स्त्री ही गृहिणी असो किंवा नोकरी ,व्यवसाय करणारी असो तिला आपली जबाबदारी पार पाडताना तारेवरची कसरत करावीच लागते. पण मला असे वाटते की स्त्रीला हवे असणारे खरे आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे घरची जबाबदारी सांभाळून त्यांनी नोकरी , व्यवसाय किंवा इतर काहीही करावे पण आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झालेच पाहिजे व पुरुषांच्या बरोबरीनेच समाजामध्ये तिचा दर्जा असायलाच पाहिजे.

कारण स्त्रीला स्वातंत्र्याची सुरुवात तिच्या आर्थिक सक्षमीकरणातून होते. स्वतः कमावणे आणि स्वतःच्या पैशाचे आर्थिक नियोजन करणे महिलांना अधिक आत्मविश्वासी बनवते केवळ शिक्षण घेणे आणि नोकरी करणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. तर स्वतःच्या आयुष्याचे महत्त्वाचे निर्णय स्वतः घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला मिळायलाच हवे. स्वतंत्र आणि सक्षम स्त्री ही आजच्या काळाची गरज आहे.

एका स्वतंत्र महिलेचे अस्तित्व हे कुटुंबाला आणि समाजाला नवीन दिशा देते. जेव्हा समाजातील प्रत्येक स्त्री ही भयमुक्त, आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण आणि मानसिक दृष्ट्या स्वतंत्र होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने समाजाचा आणि देशाचा समतोल विकास होईल.

केवायसी आणि ओटीपीचा कंटाळा : डिजिटल सुरक्षितता की डिजिटल डोकेदुखी?



चर्चा

पुरुषोत्तम इंगोले
तेल्हारा , मो नं 9922835525

स्मार्टफोनच्या एका क्लिकवर बँक व्यवहार, ऑनलाईन खरेदी, सरकारी योजनांचा लाभ आणि अगदी घरबसल्या खाद्यपदार्थ मागवण्याची सोय आज उपलब्ध झाली आहे. डिजिटल इंडियाच्या या युगात नागरिकांचे आयुष्य सुकर झाले आहे, यात शंका नाही. परंतु, या सोयीसुविधांसोबतच एक नवीन आणि अत्यंत त्रासदायक समस्या समोर आली आहे ती म्हणजे सतत लागणारे आणि प्रत्येक व्यवहारासाठी येणारा! आज सर्वसामान्य नागरिक या सततच्या पडताळणी प्रक्रियेला पार कंटाळला आहे. सुरुवातीला आणि हे ग्राहकाच्या खात्याच्या आणि पैशांच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आणि विश्वासार्ह कवच म्हणून सादर केले गेले. ऑनलाईन फसवणूक आणि सायबर गुन्हे रोखण्यासाठी ही यंत्रणा आवश्यकही होती. मात्र, आता या यंत्रणेचा अतिरेक झाला आहे. लहान-सहान ॲप डाऊनलोड करण्यापासून ते अगदी जुन्याच बँक खात्यात किरकोळ बदल करण्यासाठीही दर काही महिन्यांनी री-केवायसी ची मागणी केली जाते. आधार कार्ड, पॅन कार्ड जोडणे, बायोमेट्रिक देणे, लाईव्ह फोटो काढणे ही प्रक्रिया आता सुरक्षेचे साधन न वाटता एक त्रासदायक डिजिटल डोकेदुखी वाटू लागली आहे. यात आणखी भर घालतो तो म्हणजे . बँक व्यवहार असो वा एखादा साधा पासवर्ड रिसेट करणे, मोबाईलवर येईपर्यंत ग्राहकाला श्वास रोखून धरावा लागतो. कित्येकदा नेटवर्कच्या समस्येमुळे वेळेत येत नाही, आलेला टायप करेपर्यंत होतो, तर कधीकधी सिस्टीमच्या तांत्रिक त्रुटींमुळे ओटीपीचा प्रवासच थांबतो. तातडीने पैसे पाठवायचे असतील किंवा एखादे महत्त्वाचे तिकीट बुक करायचे असेल, तर हा वेळेवर न आल्यामुळे नागरिकांचा होणारा मनस्ताप शब्दातीत आहे. ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील लोकांसाठी तर ही यंत्रणा एक मोठे आव्हान ठरत आहे. दर काही दिवसांनी केवायसी अपडेट करा, अन्यथा खाते बंद होईल असे धमकावणारे मेसेज बँकांकडून आणि सर्व्हिस प्रोव्हाईडर्सकडून येतात. यामुळे सर्वसामान्य नागरिक सतत भीतीच्या छायेखाली असतात. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, ज्या सुरक्षेच्या नावाखाली हा सर्व खटाटोप केला जातो, त्याच आणि च्या नावाखाली सायबर भामटे आज सर्वात जास्त फसवणूक करत आहेत. ''तुमचे केवायसी अपडेट करा'' असा बनावट कॉल किंवा मेसेज पाठवून नागरिकांना लुटण्याचे प्रकार दररोज घडत आहेत. म्हणजे ज्या गोष्टीमुळे सुरक्षा मिळायला हवी होती, तीच गोष्ट आज असुरक्षिततेचे आणि फसवणुकीचे मुख्य कारण बनली आहे. बँका आणि वित्तीय संस्थांनी आपली जबाबदारी ग्राहकांच्या मानगुटीवर बसवली आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सुरक्षेचे नियम असणे गरजेचे आहेच, पण ते नियम ग्राहकाभिमुख आणि सुलभ असावेत. एकदा अधिकृतपणे केवायसी झाल्यानंतर वारंवार तीच ती माहिती मागणे कितपत योग्य आहे? एकाच व्यक्तीची विविध बँकांमध्ये किंवा ॲप्सवर वेगवेगळी केवायसी करण्याऐवजी सेंट्रलाइज्ड केवायसी ही प्रणाली अधिक प्रभावीपणे का राबवली जात नाही? डिजिटल तंत्रज्ञानाचा मूळ उद्देश मानवी श्रम आणि वेळ वाचवणे हा होता. मात्र, आणि च्या या गर्तेत नागरिकांचा मौल्यवान वेळ आणि शांतता दोन्ही पणाला लागत आहे. रिझर्व्ह बँक आणि संबंधित प्रशासनाने या परिस्थितीची गंभीर दखल घेणे गरजेचे आहे. सुरक्षेचा समतोल राखत असतानाच या प्रक्रिया अधिक सोप्या, वेगवान आणि त्रासमुक्त कशा करता येतील, यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे. अन्यथा, डिजिटल क्रांती ही सुविधेपेक्षा मनस्तापाचेच मोठे कारण ठरेल!


वाघांच्या संवर्धन मोहिमेला स्थानिक नियोजनाचे संरक्षण मिळणार का?



मंथन

प्रशांत रत्नाकर भागवत
उमरखेड. मो. ९४२२८६७७४८

महाराष्ट्रात वाघांचे संवर्धन, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचा विस्तार आणि प्रस्थापित व्याघ्र प्रकल्पांवरील वाढता भार कमी करण्याच्या उद्देशाने वन विभागाने महत्त्वाकांक्षी पावले उचलली आहेत. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पासह ज्ञानगंगा आणि पैनगंगा वन्यजीव अभयारण्यांमध्ये वाघांचे स्थलांतर करून नव्या अधिवासात त्यांची प्रजननक्षम संख्या विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, या महत्त्वाकांक्षी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर पैनगंगा अभयारण्यात स्थलांतरित करण्यात आलेल्या वाघिणीचा किनवट तालुक्यात रेल्वे अपघातात मृत्यू झाल्याने संवर्धनाच्या नियोजनापासून प्रत्यक्ष क्षेत्रीय व्यवस्थापनापर्यंतच्या अनेक बाबींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. १७ ऑक्टोबर रोजी मदनापूर परिसरात रेल्वे रुळावर वाघिणीचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक माहितीनुसार, रेल्वेची धडक बसल्याने तिचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. या घटनेने वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः वाघांचे स्थलांतर करून त्यांना नव्या अधिवासात स्थिरावण्याची संधी देणाऱ्या मोहिमेत अशा दुर्घटना टाळण्यासाठी पुरेशी खबरदारी घेतली जाते का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.



राज्यस्तरावर धाडसी पाऊल; स्थानिक पातळीवरील जबाबदारीचे काय? : वाघांचे संवर्धन म्हणजे केवळ एका जंगलातून दुसऱ्या जंगलात वाघाला हलविणे नव्हे. त्यासाठी योग्य अधिवासाची निवड, नैसर्गिक भक्ष्याची उपलब्धता, पाण्याचे स्रोत, अन्य वाघांशी संभाव्य संघर्ष, मानवी वस्तीपासूनचे अंतर, सुरक्षित भ्रमणमार्ग आणि दीर्घकालीन निरीक्षण या सर्व बाबींचे एकत्रित नियोजन आवश्यक असते. पैनगंगा अभयारण्यात ७ जानेवारी २०२६ रोजी पेंचमधून पीकेटी-७ सीपी-२ या वाघिणीचे स्थलांतर करण्यात आले. त्यानंतर जुलैमध्ये नर वाघ आणि सप्टेंबरमध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातून टी-एसएएफ या तरुण वाघिणीचे स्थलांतर करण्यात आले. या प्रयत्नांमागे अभयारण्यात वाघांची प्रजननक्षम संख्या विकसित करण्याचा आणि नव्या वनक्षेत्रात त्यांचे अस्तित्व बळकट करण्याचा उद्देश आहे. हा उपक्रम निश्चितच महत्त्वाचा आहे. मात्र, स्थलांतरित वाघांचे पुढील आयुष्य सुरक्षित राहावे, त्यांना योग्य अधिवास मिळावा आणि त्यांच्यापासून भविष्यात यशस्वी प्रजनन व्हावे, यासाठी स्थलांतरानंतरची यंत्रणा तितकीच सक्षम असणे आवश्यक आहे. राज्यस्तरावर घेतलेल्या निर्णयाचे यश प्रत्यक्ष जंगलात काम करणाऱ्या यंत्रणेच्या नियोजनावर, समन्वयावर आणि सततच्या देखरेखीवर अवलंबून असते. खरबी क्षेत्राची निवड आणि पर्यायी वनक्षेत्रांचा प्रश्न पैनगंगा अभयारण्यातील खरबी वनपरिक्षेत्रात स्थलांतरित वाघिणीला सोडण्यात आले. या परिसरात यापूर्वीपासूनच जुन्या वाघिणीचे अस्तित्व असल्याची स्थानिक पातळीवर चर्चा आहे. अशा परिस्थितीत नव्याने स्थलांतरित केलेल्या वाघिणीसाठी या क्षेत्राची निवड करताना तिच्या हालचालींचे संभाव्य मार्ग, आधीपासून असलेल्या वाघिणीचा अधिवास, क्षेत्रावरील प्रादेशिक हक्कांचा संघर्ष आणि सुरक्षित भ्रमणासाठी उपलब्ध जागा यांचे कितपत मूल्यमापन झाले, हा संशोधनाचा विषय आहे.

बिटरगाव, कोर्टा आणि सोंदाबी यांसारखी अन्य वनक्षेत्रे उपलब्ध असताना खरबीच का निवडण्यात आले? या पर्यायी क्षेत्रांचा शास्त्रीय पद्धतीने तुलनात्मक अभ्यास करण्यात आला होता का? रेल्वेमार्ग, मानवी वस्ती, वन्यजीवांचे पारंपरिक भ्रमणमार्ग आणि संभाव्य धोके यांचा निर्णयप्रक्रियेत किती विचार झाला? या प्रश्नांची उत्तरे संबंधित वन विभागाच्या तांत्रिक अहवालातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. अर्थात, पर्यायी वनक्षेत्रे उपलब्ध आहेत एवढ्याने ती वाघिणीसाठी अधिक योग्य ठरतात, असे म्हणता येणार नाही. त्यांची भक्ष्यघनता, अधिवासाची सलगता, आधीपासून असलेल्या वाघांची संख्या, पाण्याची उपलब्धता आणि मानवी हस्तक्षेप यांचा तुलनात्मक अभ्यास झाल्याशिवाय कोणता निर्णय चुकीचा होता, असा निष्कर्ष काढता येणार नाही. परंतु, अशा निर्णयांमागील शास्त्रीय आधार आणि स्थानिक परिस्थितीचे मूल्यमापन पारदर्शकपणे समोर येणे गरजेचे आहे.

रेल्वेमार्गावरील धोका आधीच ओळखता आला असता का?: मदनापूरजवळ घडलेल्या दुर्घटनेने वन्यजीवांच्या भ्रमणमार्गांमधून जाणाऱ्या रेल्वेमार्गांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित केला आहे. जंगलातील वाघाला प्रशासकीय हद्दींचे बंधन नसते. तो भक्ष्याच्या शोधात, पाण्यासाठी किंवा स्वतःचा अधिवास निर्माण करण्यासाठी लांब अंतर पार करू शकतो. त्यामुळे वाघाला एका विशिष्ट वनपरिक्षेत्रात सोडल्यानंतर त्याचे संरक्षणही केवळ त्याच क्षेत्रापुरते मर्यादित ठेवून चालणार नाही. वाघिणीच्या हालचालींवर रेडिओ कॉलरद्वारे किंवा अन्य उपलब्ध तंत्रज्ञानाच्या साहाय्याने देखरेख ठेवली जात होती का? तिच्या हालचाली रेल्वेमार्गाच्या दिशेने होत असल्याचे आधी लक्षात आले होते का? वन विभाग आणि रेल्वे प्रशासनामध्ये संवेदनशील ठिकाणांबाबत नियमित माहितीची देवाणघेवाण होते का? संबंधित मार्गावर वन्यजीवांच्या उपस्थितीबाबत रेल्वे कर्मचाऱ्यांना सूचना देण्याची व्यवस्था होती का? या प्रश्नांची उत्तरे तपासातून मिळाली पाहिजेत.

रेल्वे अपघातात वाघिणीचा मृत्यू झाला म्हणून संपूर्ण दोष वन विभागाचा किंवा रेल्वे प्रशासनाचा आहे, असे तातडीने म्हणता येणार नाही. मात्र, संभाव्य धोके ओळखणे, त्यांचे निवारण करणे आणि दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना करणे ही संबंधित यंत्रणांची सामायिक जबाबदारी आहे.

संवर्धन मोहिमेच्या यशाचे मोजमाप केवळ स्थलांतराच्या संख्येवर नको : वाघांच्या संवर्धनासाठी वरिष्ठ पातळीवर घेतले जाणारे निर्णय आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील अंमलबजावणी यांच्यात समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या वाघाचे स्थलांतर यशस्वीरीत्या पूर्ण झाले, त्याने नव्या जंगलात प्रवेश केला किंवा काही काळ वास्तव्य केले, एवढ्यावरून संवर्धन मोहीम पूर्ण यशस्वी झाली असे म्हणता येत नाही. स्थलांतरित वाघ सुरक्षितपणे स्थिरावला का, त्याला पुरेसे भक्ष्य मिळते का, त्याने स्वतंत्र भ्रमणक्षेत्र निर्माण केले का, स्थानिक नागरिकांशी संघर्ष निर्माण होतो का आणि त्याच्यापासून पुढील पिढी निर्माण होण्याची शक्यता किती आहे, या निकषांवर मोहिमेचे मूल्यमापन व्हायला हवे. त्याचबरोबर अशा प्रकल्पांतून स्थानिक गावांना निर्माण होणारे धोके, वन विभागाची प्रतिसादक्षमता आणि नागरिकांमध्ये निर्माण होणारा विश्वास यांनाही महत्त्व दिले पाहिजे. स्थानिक पातळीवरील नियोजनात त्रुटी असतील, तर त्या वरिष्ठ स्तरावरील (पान ५ वर...)

चिंतन



डॉ राजेश रांदड
मो. 9284418427

जीवनरुपी मॉल आणि आपली निवड : एक घ्या, एक मोफत मिळवा!

व्यापाराच्या जगात एक विकत घ्या, एक मोफत मिळवा ही ऑफर आपण सर्वानीच अनेकदा पाहिली असेल. वस्तूंच्या खरेदीसाठी ही ऑफर खूप आकर्षक वाटते. पण कधी विचार केला आहे का? हीच ऑफर आपल्या दैनंदिन आयुष्यातही २४ तास सुरू असते! आपण आपल्या विचारांच्या आणि भावनांच्या बाजारात काय खरेदी करतो, यावरच आपल्याला काय मोफत मिळणार हे ठरत असते. विदर्भातील प्रसिद्ध मुखकर्करोगतज्ज्ञ डॉ. राजेश जी. रांदड यांनी मानवी आरोग्य आणि विचारांचा अतिशय सुंदर संबंध या ऑफरच्या माध्यमातून स्पष्ट केला आहे.

नकारात्मकतेची खरेदी आणि आजारांची ऑफर : आपण दैनंदिन जीवनात नकळत अनेक नकारात्मक गोष्टी विकत घेतो आणि त्यासोबत मिळणारे आजार मोफत स्वीकारतो:

राग आणि ॲसिडिटी: जेव्हा आपण राग विकत घेतो (किंवा रागवतो), तेव्हा शरीरात पित्त आणि आम्लतेचे प्रमाण वाढून ॲसिडिटी आपल्याला मोफत मिळते.

ईर्ष्या आणि डोकेदुखी: दुसऱ्यांबद्दल ईर्ष्या किंवा मत्सर मनात बाळगला, तर त्याचा थेट ताण मेंदूवर पडतो आणि डोकेदुखी मोफत मिळते.

द्वेष आणि अल्सर: कुणाबद्दल तरी मनात द्वेष पेरला, तर पचनसंस्थेवर त्याचा वाईट परिणाम होऊन पोटाचा अल्सर मोफत मिळतो.

ताणतणाव आणि उच्च रक्तदाब: आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण ताणतणाव विकत घेतला, की उच्च रक्तदाब आणि हृदयाचे विकार आपोआप मोफत मिळतात.

सकारात्मकतेची गुंतवणूक आणि आरोग्याची भेट:

पण जर आपण आपला दृष्टिकोन बदलला आणि चांगल्या विचारांची खरेदी केली, तर मिळणारे मोफत फायदे आपले आयुष्य



समृद्ध करतात:

संवाद आणि जिवलग मैत्री: जर आपण लोकांशी गोड बोलून आणि चांगला वार्तालाप करून विश्वास विकत घेतला, तर आपल्याला अखंड आणि जिवलग मैत्री मोफत मिळते.

व्यायाम आणि निरोगी आयुष्य: रोज थोडा वेळ काढून व्यायाम आणि कसरत केली तर दीर्घ व निरोगी आयुष्य मोफत मिळते.

शांतता आणि समृद्धी: मनात अन् पर्यावरणात शांती जपली, तर घरात आणि आयुष्यात समृद्धी व प्रसन्नता मोफत मिळते.

प्रामाणिकपणा आणि गाढ झोप: जर आपण कामात व व्यवहारात ईमानदारी अन् प्रामाणिकपणा विकत घेतला, तर रात्रीची शांत व गाढ झोप मोफत मिळते.

आयुष्याच्या या बाजारात आपण ग्राहक आहोत आणि आपले विचार हे आपले चलन आहेत. आपण रागाचे, ताणतणावाचे नाणे खर्च करून आजारपण विकत घ्यायचे, की संयम, व्यायाम आणि प्रामाणिकपणाचे नाणे वापरून आरोग्य व समाधान मिळवायचे हे पूर्णपणे आपल्याच हातात आहे. हा सोपा जीवनमंत्र जर आपण लक्षात ठेवला, तर आपले आयुष्य केवळ निरोगीच नाही, तर अत्यंत आनंदी आणि समृद्ध बनेल. म्हणूनच, आजच योग्य विचारांची खरेदी करा आणि सुंदर आयुष्याची भेट मोफत मिळवा! हा विचार खरोखरच अत्यंत मार्मिक आणि जीवनाला योग्य दिशा देणारा आहे! जेव्हा आपण आपल्या मनात सकारात्मक विचार, संयम आणि प्रामाणिकपणाची पेरणी करतो, तेव्हा त्याचे फळ म्हणून आपल्याला आरोग्य, शांतता आणि मनःशांती आपोआपच लाभते. याउलट, नकारात्मक विचारांची निवड आपल्याला मानसिक आणि शारीरिक आजारांकडे घेऊन जाते.

आनंदी आणि समृद्ध आयुष्यासाठी काही छोटे संकल्प:

विचारपूर्वक प्रतिक्रिया देणे: कोणत्याही प्रसंगात लगेच रागवण्याऐवजी १-२ सेकंद थांबून विचार करा.

नित्य व्यायाम: दररोज किमान ३० मिनिटे शरीराला आणि मनाला वेळ द्या.

सकारात्मक संवाद: लोकांशी संवाद साधताना नेहमी आपुलकी आणि प्रामाणिकपणा जपा.

कृतज्ञता : रोज रात्री झोपण्यापूर्वी आयुष्यात मिळालेल्या चांगल्या गोष्टींबद्दल आभार माना.

टायगरच्या अंगात घुसले गोळीचे छर्रे!



अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने चित्रपटसृष्टीत खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात टायगर थोडक्यात बचावला असला, तरी त्याच्या हाताला गोळीचे छर्रे लागल्याची माहिती समोर आली आहे. टायगरच्या टीमने त्याच्या हाताला झालेल्या जखमांचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओसोबत टीमने 'देवाची कृपा आहे' अशी प्रतिक्रिया दिली आहे. टायगरच्या हातावर झालेल्या जखमा या व्हिडीओमध्ये स्पष्टपणे दिसत आहेत. विशेष म्हणजे, या कठीण प्रसंगानंतरही टायगर व्हिडीओमध्ये त्याचे बायसेप्स दाखवताना दिसत आहे. या घटनेनंतर त्याच्या चाहत्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. रविवारी रात्री टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार करण्यात आला. ही घटना १८ ऑक्टोबर रोजी मुंबईतील जुहू परिसरात घडली. गोळीबार झाला, तेव्हा टायगर गाडीत बसला होता. या घटनेत टायगरचा चालक आणि त्याचा चाहता उमेश चौहान हे दोघे जखमी झाले. या हल्ल्याची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित व्यक्तीने घेतली आहे.

संयुक्त राष्ट्र दिन : शांततामय आणि समताधिष्ठित विश्वनिर्मितीचा संकल्प

(पान ४ वरुन...) आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. संपत्तीचे केंद्रीकरण, रोजगाराच्या संधींचे असमान वितरण आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव यांमुळे विषमता वाढते. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये शाश्वत विकासासाठी २०३० चा कार्यक्रम स्वीकारला. गरिबीचे निर्मूलन, भूक कमी करणे, आरोग्य सुधारणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे, लैंगिक समानता साध्य करणे, स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे आणि विषमता कमी करणे ही त्यातील महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, हा या कार्यक्रमाचा गाभा आहे. सरकारे, उद्योग, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिक यांच्या समन्वयातूनच ही उद्दिष्टे साध्य होऊ शकतात. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, आदिवासी समुदाय, महिला, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक लोकशाहीच्या विचारात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या परस्परसंबंधावर भर दिला आहे. समाजातील विषमता दूर करून प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठेने जगण्याची संधी देणे, हे लोकशाहीचे खरे उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि देशांतर्गत सामाजिक न्याय यांचा परस्परांशी जवळचा संबंध आहे. न्याय्य आणि समताधिष्ठित समाजरचना ही दीर्घकालीन शांततेची महत्त्वाची पूर्वअट आहे.

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, चुकीची माहिती आणि डिजिटल विषमता यांसारखी नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले असले, तरी त्याचा गैरवापर सामाजिक तणाव आणि असुरक्षितता वाढवू शकतो. अफवा, द्वेषपूर्ण प्रचार, वैयक्तिक माहितीचा गैरवापर आणि सायबर हल्ले यांमुळे व्यक्तींच्या स्वातंत्र्याला आणि समाजाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण, आरोग्य, शेती आणि सार्वजनिक सेवांच्या विकासासाठी झाला पाहिजे; मात्र त्यातून भेदभाव वाढू नये आणि मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. अण्वस्त्रांचा प्रसार, दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी यांवर नियंत्रण मिळविण्यासाठीही राष्ट्रांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची खरी उपयुक्तता मानवी जीवन अधिक सुरक्षित, समृद्ध आणि सन्मानपूर्ण करण्यात आहे.

संयुक्त राष्ट्र दिनाचा संदेश केवळ सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांपुरता मर्यादित नाही. प्रत्येक नागरिकाचे वर्तन जागतिक शांतता आणि सामाजिक सलोखा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा राष्ट्रीयत्वाच्या आधारावर इतरांना कमी लेखण्याऐवजी परस्पर आदराची भावना जोपासणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मानवी हक्क, शांतता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण केली पाहिजे. समाजमाध्यमांवर जबाबदारीने वागणे, अप्रमाणित माहिती न पसरविणे, भेदभावाला विरोध करणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे या कृती शांततापूर्ण समाजाच्या निर्मितीस हातभार लावतात. जागतिक शांततेची सुरुवात आंतरराष्ट्रीय परिषदांमधून होत असली, तरी तिचे संवर्धन कुटुंब, शाळा, कार्यस्थळ आणि समाजातील दैनंदिन व्यवहारांतूनही होते. म्हणूनच जागतिक नागरिकत्वाची भावना विकसित करणे आणि स्वतःच्या कृतींचे व्यापक सामाजिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे.

२४ ऑक्टोबरचा संयुक्त राष्ट्र दिन आपल्याला भावी पिढ्यांसाठी कोणते जग निर्माण करायचे आहे, याचा विचार करण्याची संधी देतो. युद्ध, द्वेष, विषमता आणि पर्यावरणीय संकटांनी ग्रस्त जग भावी पिढ्यांच्या हाती सोपविण्याऐवजी शांतता, न्याय, समान संधी आणि सहकार्यावर आधारित समाज निर्माण करण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे यश केवळ ठरावांच्या संख्येवर किंवा आंतरराष्ट्रीय परिषदांवर मोजता येणार नाही; तर सामान्य माणसाचे जीवन किती सुरक्षित झाले, किती लोकांना शिक्षण आणि आरोग्यसेवा मिळाली आणि किती समाजांमध्ये न्याय व शांततेची शक्यता निर्माण झाली, यावर ते ठरेल. प्रत्येक राष्ट्राने आपली जबाबदारी ओळखून जागतिक समस्यांच्या निराकरणासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मानवजातीचे भविष्य परस्पर द्वेषात नसून सहकार्यामध्ये, युद्धात नसून शांततेमध्ये आणि विषमतेत नसून न्याय्य संधींमध्ये आहे. 'एक पृथ्वी, एक मानवजात आणि सामायिक भविष्य' ही भावना केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरली, तरच संयुक्त राष्ट्र दिनाचा खरा उद्देश साध्य होईल. जागतिक शांतता, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांसाठीचा सामूहिक संकल्प दृढ करणे, हाच या दिवसाचा सर्वांत महत्त्वाचा संदेश आहे.

वाघांच्या संवर्धन मोहिमेला स्थानिक नियोजनाचे संरक्षण मिळणार का?

(पान ४ वरुन...) सकारात्मक प्रयत्नांना बाधा आणू शकतात. मात्र, येथे असहकार्य झाले किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाले, असे पुराव्याविना म्हणणे योग्य ठरणार नाही. त्याऐवजी निर्णयप्रक्रिया, क्षेत्रनिवड, स्थलांतरानंतरची देखरेख आणि रेल्वेमार्गावरील सुरक्षा व्यवस्थेचे स्वतंत्र मूल्यमापन होणे अधिक आवश्यक आहे.

आता पुढे काय? : या घटनेच्या पार्श्वभूमीवर वन विभागाने काही ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

१. स्वतंत्र तांत्रिक चौकशी: वाघिणीच्या मृत्यूचे नेमके कारण, तिच्या हालचालींचा उपलब्ध मागोवा आणि अपघाताच्या ठिकाणची परिस्थिती तपासावी. स्थलांतर व अधिवास निवडीच्या निर्णयांचेही परीक्षण करावे.

२. संवेदनशील भ्रमणमार्गांचे नकाशांकन: पैनगंगा अभयारण्य आणि किनवट परिसरातील रेल्वेमार्ग ओलांडण्याची शक्यता असलेले वन्यजीवांचे मार्ग निश्चित करून धोकादायक ठिकाणांची नोंद करावी.

३. वन विभागरेल्वे समन्वय: संवेदनशील पट्ट्यांमध्ये वन्यजीवांच्या हालचालींची माहिती वेळेवर मिळेल अशी व्यवस्था, आवश्यक ठिकाणी वेगनियंत्रणासह अन्य व्यवहार्य सुरक्षा उपाय आणि नियमित संयुक्त पाहणी करावी.

४. स्थलांतरापूर्वी आणि नंतरचे मूल्यमापन: पर्यायी अधिवासांचा तुलनात्मक अभ्यास, विद्यमान वाघांची उपस्थिती, भक्ष्याची उपलब्धता आणि मानवी हस्तक्षेप यांचे मूल्यमापन करून त्याचा अहवाल नोंदवावा. स्थलांतरानंतर वाघांच्या हालचालींचे नियमित निरीक्षण करावे.

५. उत्तरदायित्व निश्चित करणे: चौकशीत नियोजनातील त्रुटी, आवश्यक खबरदारीचा अभाव किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित स्तरावर जबाबदारी निश्चित करून सुधारात्मक कारवाई करावी. त्याचवेळी चांगले काम करणाऱ्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना आवश्यक मनुष्यबळ, साधने आणि तांत्रिक मदत उपलब्ध करून द्यावी.

वाघिणीचा मृत्यू हा व्यवस्थेतील उणिवा तपासण्याचा इशारा

महाराष्ट्रात सह्याद्री, ज्ञानगंगा आणि पैनगंगा यांसारख्या वनक्षेत्रांमध्ये वाघांचे संवर्धन आणि अधिवास विस्तारण्यासाठी होत असलेले प्रयत्न दीर्घकालीन पर्यावरणीय संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे यश सुनिश्चित करणे ही केवळ वन विभागाचीच नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी आहे.

मात्र, वरिष्ठ स्तरावर संवर्धनासाठी धाडसी निर्णय घेतले जात असताना स्थानिक पातळीवर नियोजन, समन्वय किंवा संरक्षण व्यवस्थेत उणिवा राहिल्या, तर त्या निर्णयांच्या मूळ उद्देशालाच बाधा पोहोचू शकते.

म्हणूनच या घटनेकडे केवळ एका वाघिणीच्या मृत्यूच्या स्वरूपात न पाहता, भविष्यातील संवर्धन मोहिमांसाठी धडा म्हणून पाहिले पाहिजे.

वाघांची संख्या वाढविणे हे उद्दिष्ट आहे; पण वाढणाऱ्या प्रत्येक वाघाला सुरक्षित जीवनाची संधी मिळणे, हेच संवर्धनाचे खरे यश आहे. मदनापूरजवळील दुर्घटनेची निष्पक्ष चौकशी, स्थानिक पातळीवरील निर्णयांचे शास्त्रीय मूल्यमापन आणि रेल्वेवन विभागाच्या समन्वयातून ठोस सुधारणा झाल्या, तर या दुर्दैवी घटनेतून भविष्यातील व्याघ्र संवर्धनासाठी महत्त्वाचा मार्ग निघू शकतो.

ओळख पक्ष्यांची : निलशिर कस्तूर



शारीरिक रचना आणि ओळख :

* मादी पक्षी: चित्रात दाखवल्याप्रमाणे, या पक्ष्याची मादी प्रामुख्याने वरच्या बाजूने राखाडी-तपकिरी रंगाची असते. तिच्या पोटाकडचा भाग पांढरट असतो, ज्यावर गडद तपकिरी रंगाचे खवले किंवा ठिपके असतात.
* नर पक्षी: या प्रजातीचा नर अतिशय देखणा आणि रंगीबेरंगी असतो. नराचे डोके, गळा आणि खांदे चमकदार निळ्या रंगाचे असतात, तर पाठीचा उर्वरित भाग काळा आणि पोटाचा भाग गडद नारिंगी-तांबूस रंगाचा असतो.


अधिवास आणि सवयी

* स्थलांतर: हा एक स्थलांतरित पक्षी आहे. हे पक्षी उन्हाळ्यात हिमालयाच्या भागात वीण करतात आणि हिवाळ्यात दक्षिण भारताकडे, विशेषतः पश्चिम घाटातील जंगलांमध्ये स्थलांतर करतात.
* स्वभाव: हा पक्षी खूप लाजाळू स्वभावाचा असून घनदाट झाडी, बागा, कॉफीच्या आणि वेलचीच्या बागांमध्ये किंवा झाडांच्या फांद्यांवर एकटा बसलेला पाहायला मिळतो.

अन्न : * हा पक्षी प्रामुख्याने कीटकभक्षी आहे. झाडांच्या पानांवर किंवा जमिनीवर पडलेल्या पानांमधून तो लहान कीटक, अळ्या आणि टोळ शोधून खातो. कधीकधी तो झाडांची छोटी फळे देखील खातो.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 548



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

मणगट
मालमत्ता
राज्यभार
लखलाभ
वनामति
व्यतिरिक्त
शीघ्रकोपी
समाचार
सैरावैरा
संकोचणे

पाच अक्षरी

अभिवचन
कासवगति
मनोकाम ना
रावणराज्य
सुस्वागतम

सहा अक्षरी

संदेशवहन
स्वातंत्र्यसैनिक

अन्य अक्षरी

लाख लाखाचा माणूस
वाचाळ पंचविशी
व्यक्ति स्वातंत्र्यवाद
(उत्तर पुढील अंकी)

संकेत शब्दः—

दोन अक्षरी

कर
कल
गट
गत
जग
जन
जरा
डग
तग
तंट
तुला
तात
तीस
तंत
धाक
नथ
नाक

नाभि
नाला
पुर
मजा
मय
मल
माग
यम
रति
रमा
रव
रवि
रान
ऱ्हास
लव
लस
लळा
लक्ष
वर

वपु
सत्ता

तीन अक्षरी

अकड
अवैध
कणेर
कजाग
कारण
कु-हाड
खातरी
गरम
गजरा
तमाशा
तरल
ताईत
तुलना
नाटक
नकुल
भरारी

भासरा
रजत
रमण
विरक्त
स्वागत
संगम

चार अक्षरी


एकलव्य
करामत
कातरण
डोईजड
तारामती
तासभर
धवलता
निरामय
पारतंत्र्य
पारिजात
मनमानी
मळवट

मागील महाशब्दकोडेचे उत्तर

व	सं	त	रा	व	दे	श	पां	डे	■	ह	रि	ह	र	न	■	ध्या	स
डि	■	■	■	■	ठ	■	ड	■	बे	■	स	र	स	■	म	■	म
लो	ह	पु	रू	ष	■	अ	व	हे	ल	ना	■	हु	■	म	ह्य	ल	य
पा	ल	न	■	ट	■	रू	■	रं	■	प	रा	न्न	■	स	भा	■	■
र्जि	■	रा	ज	क्ष	र	ण	■	ब	■	त	■	री	त	■	र	क्ष	क
त	■	वृ	■	र	फू	■	ओ	■	दे	■	गी	■	पा	ळ	त	■	न्या
■	ब	ती	स	■	च	र्व	ण	■	ह	■	त	■	स	■	■	ग	दा
आ	ळ	■	■	थ	क्क	■	वा	■	रा	म	रा	ज्य	■	उ	प	व	न
■	ज	■	प्र	क	र	ण	■	ख	ड्डू	■	मा	■	री	ता	■	त	■
श	ब	री	■	वा	■	■	भुं	■	न	■	य	क्ष	■	र	स	■	क
प	री	■	डं	■	रो	ज	गा	र	■	क्षी	ण	■	न	व	ल	क	था
थ	■	प	ख	वा	ज	■	■	स	त्क्ष	र	■	वि	ल	य	■	मा	न
वि	न	य	■	■	नि	र्ण	य	क	■	सा	म	वे	द	■	ज	न	क
धी	■	खि	■	श	शी	■	■	स	ल	ग	■	क	म	नी	य	■	■
■	अ	नी	ती	■	■	कै	द	■	व	र	दा	■	यं	■	घो	ष	णा
म	जा	■	र	ग	ख	■	म	र	ण	■	भ	र	ती	■	ष	ट्	■
त	ण	स	■	ज	क	ड	णे	■	■	क	ण	व	■	■	■	क	र्णा

Uday Munde - 8446302691

महाशब्दकोडे 932



आडवे संकेत

१) समाविष्ट, अंतर्भूत
३) उत्पादित मालाचे सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत वितरण करणारा
६) देव–दानवांनी वासुकीची दोरी करून समुद्राला ढवळून काढले ते
१०) हा महिना, जगभरातील मुस्लीम उपवासाचा महिना म्हणून पाळतात
११) रक्षणकर्ता
१३) आपल्या उत्पन्नातून सरकारला देय असलेले देणे
१४) पाणी भरलेली टाकी, माठ, रांजण
१६) सैन्याचा दाणागोटा
१७) बागकाम करणारा, बागेची निगा राखणारा
१८) जरीपटक्याचा रंग
२२) सत्यनारायणाच्या पूजेतील कथेत प्रसाद न घेता नवऱ्याच्या भेटीस निघालेली स्त्री
२५) निमंत्रित लोकांना दिलेले थाटामाटाचे भोजन
२६) मोठेपणा, श्रेष्ठता
२८) प्राण, जीव (हिं.)
२९) एक चतुर्थांश
३०) शाक भाजी पिकविण्याचे शेत
३२) तसबीर
३३) वाऱ्याच्या शक्तीने फिरणारे यंत्र
३५) वाक्यामध्ये कमी अधिक थांबण्यासाठी केलेली खूण
३९) व्यंजनापासून बारा स्वरांच्या संयोगाने तयार होणाऱ्या अक्षरांची मालिका
४१) सारखे
४२) शोभिवंत रचना
४३) एक संख्या
४४) जन्मकाळाच्या ग्रहांच्या स्थितीवरून शुभ –अशुभाचे वर्णन करणारा ज्योतिषशास्त्रातील एक विषय
४६) पश्चिमाने शरीरातून निघणारे पाणी
४७) हिमालयातील एक उंच शिखर
४९) हिंदीत आरसा
५०) एक श्वासरोग
५२) पडणे, पतन
५३) वृक्षाभोवती बांधलेला ओटा
५४) आजच्या अगोदरचा दिवस
५६) नाही म्हणणे
५७) लहान व बारीक हिरवेगार गवत
५८) अंकुर
५९) टेबलावरून चेंडू टोलविण्याचा एक खेळ
६१) एक प्रकारचा जुगार
६२) अश्व
६३) अमावस्या त्या दिवशीचे श्राद्ध
६६) खूप जोराने पडणारा पाऊस
६८) चवथे नक्षत्र
७०) भाजीपाला
७१) हस्त
७३) मनुष्य
७४) तृण
७५) पर्ण, विडा
७६) हमाल, भार वाहणारा
७७) चंद्राचा सोळावा भाग
७८) मौंज, व्रतबंध

उभे संकेत

१) समाजासाठी हितकारक ठरेल असे कार्य
२) हत्तीचा छावा
३) पायजमा
४) गवताची काडी, अति क्षुद्र वस्तू
५) सरकारला देणे असलेली रक्कम
६) सर्वजण
७) पदार्थ वितळण्याची क्रिया
८) दम, श्रम, ग्लानी
९) मानव
१२) माफी
१५) दर बारा वर्षांनी हरिद्वारला भरणारी मोठी यात्रा
१९) वेग, चालण्याची ढब
२०) जे वास्तवात नाही असे, अयोग्य, खोटे
२१) इंग्रजी वर्षातील एक महिना
२३) विवाहप्रसंगी होमकुंडात वधूवरांनी लाह्या टाकण्याचा प्रकार
२४) गावाची हद्द
२७) लिखाणात क्षणिक थांबण्याकरिता असलेले चिन्ह
२९) नाटकातील भूमिका, भांडे
३०) मद्य, दारू
३१) पूजेच्या समयी आचंपळीने पाण्याचे थेंब दोन थेंब पिणे
३२) प्रतीक, खूण
३३) रिकामी पडलेली जागा
३४) तपकीर
३६) राशी, ढीग
३७) चित्रकार
३८) ज्वारीची जाड पोळी
३९) कुष्ठरोग्यांच्या सेवेकरीता विदर्भात आनंदवनाची निर्मिती करणारे महान समाजसेवक
४०) खजिना, रत्नभांडार
४२) जोराचा तडाखा, प्रहार
४३) सदैव एकटाच राहणारा, एकांतप्रिय
४५) पुरुषांनी नेसावयाचे उंची वस्त्र
४७) सत्कार, सन्मान
४८) संशय, आक्षेप
५१) हिमालयातील एक प्रसिद्ध सरोवर
५२) 'हंसता हुआ नुरानी चेहरा....' हे गीत असलेला एक जुना हिंदी चित्रपट
५३) आरपार दिसू शकेल असे
५५) बिनचूक नेमके
६०) बलिष्ठ, बलाढ्य
६३) रामायणातील दशमुखी रावण
६४) खाणे, भक्ष्य
६५) कर्कश, कानाला त्रास होणारा आवाज
६६) गोंधळ, अंदाधुंदी, लढाई
६७) धावणारा
६९) कल्याण, फायदा, उपयुक्त
७२) ताजा, नव्या दमाचा
७५) पातक
७६) अंतःकरणाची जागृत स्थिती ●

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

अ	द	ला	ब	द	ल	■	सा	डे	सा	ती	■	क	र्त	व्य
स	म	■	■	■	घु	■	र	■	■	र	■	ला	■	स्त	व
मा	न	व	ता	■	त्त	■	व	ल	य	■	अ	वं	ती	■	खा
धा	■	च	■	र	म	मा	ण	■	मु	ष्टी	घा	त	■	सा	र
न	र	क	■	■	सा	■	■	म	ना	■	खी	■	गो	ठा	■
■	ब	■	सा	व	धा	न	■	ळ	■	शि	सा	री	■	■	ग
सै	र	मा	स	■	र	ग	ड	म	ल्ली	■	ध	म	क्का	व	णे
■	■	■	र	म	ण	■	क्का	ळ	■	उ	णे	■	रा	■	श
वि	क्का	स	■	स	वि	स्त	र	■	के	प	■	र	वा	ना	■
क	स	क	स	■	भा	र	■	घ	स	ट	■	म	स	■	क
णे	■	ळी	■	रा	ज्य	■	व	सा	■	सुं	ग	णे	■	गा	र
■	आ	क	र्ष	क	■	गो	■	रा	■	भ	व	■	पा	ल	व
पा	ड	■	■	ट	क	म	क	■	ता	■	ळी	■	■	प	त
र	व	■	रे	■	रु	■	त्प	■	बू	■	■	वि	रा	ट	■
द	ळ	ण	व	ळ	ण	■	त	ब	ल	जी	■	र	ग	■	सा
■	ण	■	ती	■	■	त	रू	■	■	भ	क्का	स	■	दे	व

Uday Munde - 8446302691

मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपातील सत्य जनतेसमोर आले पाहिजे! -वडेट्टीवार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

नागपूर , दि. २३ : मनोज जरांगे-पाटील यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांचे सत्य समोर आणल्याबद्दल आभार मानतो. भाजप आणि शिंदे सेनेचा खरा चेहरा त्यांनी महाराष्ट्रासमोर आणला आहे. २०२४ विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रीपद आणि सत्तेसाठी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पेटवून महाराष्ट्राचे मोठे नुकसान केले, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी काल एक ऑडिओ क्लिप ऐकवली, त्याची



सत्यता तपासली पाहिजे. या क्लिपमध्ये कोणाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत असेल, तर ते सत्य जनतेसमोर आले पाहिजे, यासाठी निष्पक्ष चौकशी करावी.

मुख्यमंत्रीपदाच्या हव्यासापोटी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष उभा करून महाराष्ट्राचे मोठे नुकसान केले. सत्तेसाठी समाजा-समाजात भांडणं लावणं हे राजकारण महाराष्ट्राच्या हिताचं नाही, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

मुख्यमंत्री पदासाठी या दोन्ही पक्षांमधील संघर्ष आता विकोपाला गेला आहे. राज्यात दुष्काळाचे संकट आहे, बेरोजगारी वाढली आहे आणि एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न गंभीर बनले आहेत. तरुणांच्या भविष्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पण सत्ताधारी मुख्यमंत्री पदासाठी राजकारण करताहेत. हे राजकारण केवळ जनतेच्या हिताचे नसून केवळ खुर्चीसाठी सुरू आहे. यात महाराष्ट्राचे नुकसान झाल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

शेतकऱ्यांना परदेशातील शेतीचा अभ्यास करण्यासाठी पाठवण्याच्या निर्णयावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात दुष्काळाची परिस्थिती असताना सरकारने सर्वप्रथम शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी. शेतकऱ्यांच्या हातात पैसे नाहीत, शेती संकटात आहे, अशा वेळी केवळ अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करून सरकारची जबाबदारी संपत नाही. केवळ १८० शेतकऱ्यांनाच परदेशात पाठवण्याऐवजी एक हजार शेतकऱ्यांना संधी द्यावी. राज्यातील प्रत्येक विभागातून किमान २०० शेतकऱ्यांची निवड करावी. दुष्काळात शेतकऱ्यांना फक्त पाच हजार रुपये देऊन बोळवण करण्यात येते आहे. त्यापेक्षा भरीव मदत करावी, दुष्काळाला सरकारने प्राधान्य द्यावे असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

मतपत्रिका फाटली तरी मत बाद करू नका; सुधीर मुनगंटीवारांचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

चंद्रपूर , दि. २३ : नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी माजी मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपुरात मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीसाठी महायुतीचे समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या मुनगंटीवार यांनी यावेळी भाजपचा बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्याचा विश्वास व्यक्त केला. मात्र, मतदानानंतर त्यांनी निवडणूक आयोग आणि निवडणूक विभागाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली. आचारसंहितेच्या नावाखाली दुष्काळी परिस्थिती आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांवर बैठका घेण्यास मज्जाव केला जात असल्याचा आरोप करत त्यांनी संताप व्यक्त केला. तसेच, मतपत्रिका घडी घालताना फाटल्यास केवळ त्या कारणावरून मत अवैध ठरवू नये, अशी महत्त्वपूर्ण मागणीही त्यांनी केली.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. या निवडणुकीत भाजपला पुन्हा विजय मिळेल, असा विश्वास सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. भाजपने केलेल्या विकासकामांना मतदार साथ देतील आणि पक्षाचा बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्यात यश मिळेल, अशी भावना त्यांनी यावेळी मांडली. मतदानानंतर मुनगंटीवार यांनी निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दुष्काळी परिस्थिती गंभीर असताना तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला असताना संबंधित विषयांवर बैठका घेण्यास परवानगी दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. ''दुष्काळ आणि पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात बैठका घ्यायच्या असतील, तर त्या घेऊ दिल्या जात नाहीत. आचारसंहितेच्या नावाखाली अशा प्रकारे निर्बंध लादणे योग्य नाही,'' अशा शब्दांत त्यांनी निवडणूक विभागाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.

महत्त्वाचे

धामणी येथील अथर्व धोटे आणि श्रीरंग महिंद्रे यांची राज्यस्तरावर निवड

मानोरा:येथील संत वामन महाराज इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, धामणीच्या अथर्व संदीप धोटे आणि श्रीरंग राहुल महिंद्रे यांनी विभागस्तरीय योग क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या कामगिरीच्या बळावर दोन्ही विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्यस्तरीय योग क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली असून, ते अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. यवतमाळ येथील गोधणी रस्त्यावरील जिल्हा क्रीडा संकुलात ही स्पर्धा पार पडली. यात अथर्व आणि श्रीरंग यांनी आर्टिस्टिक पेअर व रिदमिक पेअर या दोन्ही प्रकारांत योगकौशल्य, शिस्त आणि नियमित सरावाच्या जोरावर बाजी मारली. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण वाशिम जिल्ह्यासह अमरावती विभागातून या खेळाडूंचे कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडा आणि योग क्षेत्रातही प्रावीण्य मिळवावे, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देत त्यांना स्पर्धात्मक व्यासपीठ मिळवून देणे हे शाळेचे मुख्य उद्दिष्ट आहे. भविष्यात विद्यार्थ्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर झेप घेत उत्तम व्यक्तिमत्त्व घडवावे, यासाठी संस्था प्रयत्नशील असते.

संत झोलेबाबा पुण्यतिथी : विविध धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसादाचे नियोजन

शेलूबाजार : मंगरुळनाथ तालुक्यातील श्री क्षेत्र चिखली येथील संत झोलेबाबा संस्थानच्या वतीने प.हं. संत झोलेबाबांचा ४९ वा पुण्यतिथी महोत्सव २८ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, श्री ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन, प्रवचन, शोभायात्रा आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिर अशा विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, श्रींची आरती, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ह.भ.प. विठोबा महाराज घोडके, विनोद महाराज दीक्षित, नारायण महाराज तनपुरे, माउली महाराज भिसे, शिवलीलाताई पाटील, कैलास महाराज येवले आणि जगन्नाथ महाराज उबाळे यांची कीर्तनसेवा लाभणार आहे. प्रवचनसेवा ह.भ.प. जगन्नाथ महाराज उबाळे देणार आहेत.

बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी मुख्य सोहळ्यानिमित्त पहाटे महापूजा, सकाळी शोभायात्रा आणि ह.भ.प. वामन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थान व महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

तेल्हारा दुहेरी खून प्रकरणातील आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : तेल्हारा तालुक्यातील भांबेरी येथे आपसी वादातून झालेल्या दुहेरी खून प्रकरणातील आरोपी राजेश गणपत भोजने (वय ५४) याचा जामीन अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने फ टाळला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. एम. पाटील यांनी २३ ऑक्टोबर रोजी हा निर्णय दिला. आरोपी ३० मे २०२१ पासून अकोला कारागृहात बंदिस्त आहे.

तेल्हारा पोलीस ठाण्यात या प्रकरणी २९ मे २०२१ रोजी भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२, ३०७ आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, जुन्या वादातून आरोपींनी संगनमत करून कुऱ्हाड, लोखंडी पाईप आणि लोखंडी सब्बलने केलेल्या हल्ल्यात देविदास उकर्डा भोजने यांचा मृत्यू झाला. तसेच अजय भोजने, प्रमिला भोजने आणि विजय भोजने यांच्यावरही जीवघेणा हल्ला करण्यात आला. उपचारासाठी नेण्यात आलेल्या अजय भोजने यांनाही डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरल्याचा आरोप असलेली कुऱ्हाड, लोखंडी पाईप, सब्बल तसेच कपडे जप्त केले होते. घटनास्थळावरील रक्तमिश्रित माती व इतर नमुने न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, त्यासंबंधीचे अहवालही प्रकरणात दाखल करण्यात आले आहेत. आरोपीला जामीन मिळाल्यास तो फिर्यादी व साक्षीदारांवर दबाव आणू शकतो, त्यांना धमकावू शकतो किंवा खटल्याच्या सुनावणीत अडथळे निर्माण करू शकतो, असा युक्तिवाद सरकारी पक्षातर्फे करण्यात आला. प्रकरणाचे गांभीर्य, उपलब्ध कागदपत्रे आणि साक्षीदारांवर संभाव्य दबावाचा मुद्दा मांडत सरकारी वकील अजित देशमुख यांनी जामीन अर्जाला विरोध केला.

जिल्ह्यात २७ ऑक्टोबरला राष्ट्रीय जंतनाशक दिन; ३ नोव्हेंबरला मॉप-अप मोहीम

शाळा व अंगणवाड्यांत जंतनाशक गोळ्या वाटणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : मुलामुलींचे आरोग्य सुधारण्यासाठी, कुपोषणाला प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांची शारीरिक व बौद्धिक वाढ साधण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने दि. २७ ऑक्टोबरला राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येणार आहे.

शाळा, अंगणवाड्यात विनामूल्य जंतनाशक गोळ्या वाटण्यात येतील. मॉप-अप दिन ३ नोव्हेंबरला असेल. जिल्हाधिकारी वर्षा मीना व मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांच्या मार्गदर्शनात मोहिम राबविण्यात येत आहे. नियोजनाबाबत बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्या उपस्थितीत झाली. माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर उपस्थित होते.



या मोहिमेत १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व बालके, शाळेत जाणारे विद्यार्थी तसेच शाळाबाह्य मुले-मुली यांचा समावेश आहे. शासकीय, अनुदानित व खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि ग्रामीण व शहरी अंगणवाडी केंद्रांमध्ये पात्र लाभार्थ्यांना अल्बेंडाझोल या जंतनाशक औषधाचे मोफत वितरण करण्यात येणार आहे.

जंतसंसर्गामुळे मुलांच्या पोषणावर, शारीरिक वाढीवर आणि अध्ययन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे जंतनाशक गोळ्यांचे सेवन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या, शिक्षकांच्या व अंगणवाडी सेविकांच्या देखरेखीखाली करणे आवश्यक आहे. एक वर्षाखालील बालकांना ही गोळी देऊ नये. दोन वर्षांखालील बालकांना निर्धारित अर्धी मात्रा आणि त्यापुढील वयोगटाला निर्धारित पूर्ण मात्रा वैद्यकीय मार्गदर्शक सूचनांनुसार द्यावी, असे निर्देश आरडीसींनी दिले. गोळी दिल्यानंतर मुलांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे व काही त्रास जाणवल्यास तातडीने आरोग्य कर्मचाऱ्यांना कळवावे. आवश्यकतेनुसार आरोग्य विभागाच्या १०४ हेल्पलाइनवर संपर्क साधावा; आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी १०८ क्रमांकाचा वापर करावा, अशा सूचना देण्यात आल्या.

जळका शहापूरमध्ये जिलेटिनचा सप्लायर कोण?

ब्लास्टिंग प्रकरणाने खळबळ बंदी असताना जिलेटिन आले कुठून?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

नांदगाव पेठ, दि. २३ : जळका शहापूर येथे मागील आठवड्यात दोन ठिकाणी विनापरवाना ब्लास्टिंगचे प्रकार उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. महसूल प्रशासनाने दोन्ही घटनांतील साहित्य जप्त करून संबंधितांना दंड ठोठावला असला, तरी या कारवाईमुळे अनेक गंभीर प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. ब्लास्टिंग करणाऱ्यांवर कारवाई झाली; पण स्फोटकांचा पुरवठा करणारे नेमके कोण? हा आता सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. परिसरात ब्लास्टिंगवर बंदी असताना मोठ्या प्रमाणात जिलेटिन उपलब्ध झालेच कसे? हे स्फोटक कोठून आणण्यात आले ? ते कोणी आणले? विक्री करणाऱ्याने कोणत्या परवानगीच्या आधारे त्याचा पुरवठा केला? आणि खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची नोंद आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय या प्रकरणाचा पूर्ण उलगडा होणार नाही. विशेष म्हणजे, विनापरवाना ब्लास्टिंगसाठी जिलेटिनसारखे स्फोटक उपलब्ध होणे ही केवळ नियमभंगाची बाब नसून सार्वजनिक सुरक्षिततेशी संबंधित गंभीर बाब आहे. त्यामुळे केवळ घटनास्थळावरील साहित्य जप्त करणे आणि दंड ठोठावणे एवढ्यावरच प्रशासनाने समाधान मानू नये. स्फोटकांचा स्रोत शोधून त्यामागील संपूर्ण पुरवठा साखळी उघड करणे, हीच या कारवाईची खरी कसोटी ठरणार आहे. नागरिकांच्या मते, जिलेटिनचा पुरवठा करणारे, ते वाहून आणणारे आणि त्याची अनधिकृत खरेदी-विक्री करणारे कोणी असतील, तर त्यांचीही चौकशी झाली पाहिजे. नियमबाह्य विक्री किंवा खरेदी झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा, प्रत्यक्ष ब्लास्टिंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होईल; मात्र त्यांना स्फोटके पुरवणारे पडद्यामागचे चेहरे मात्र तपासाच्या कक्षेबाहेर राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.



केवळ दंड नव्हे, स्फोटकांच्या स्त्रोतांचाही छडा लावा

जळका शहापूरमधील दोन घटनांनी स्फोटकांच्या उपलब्धतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. त्यामुळे जिलेटिनचा साठा कुठून आला, त्याचा पुरवठा कोणी केला आणि संबंधित व्यवहार कायदेशीर होते का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. महसूल प्रशासनासह पोलिस आणि स्फोटकांशी संबंधित सक्षम यंत्रणांनी या प्रकरणाची व्याप्ती तपासून आवश्यक ती कारवाई करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. ब्लास्टिंग करणाऱ्यांवर कारवाई झालीः मग जिलेटिन पुरवणाऱ्यांचा शोध कधी लागणार? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी प्रशासन काय पावले उचलते, याकडे जळका शहापूरवासीयांचे लक्ष लागले आहे.

भीषण दुष्काळात संत्रा रस्त्यावर ; संत्रा प्रक्रिया प्रकल्प असूनही शेतकरी हवालदिल !

रुपेश वाळके यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मोर्शी, दि. २३ :मोर्शी-वरूड हा विदर्भातील संत्रा उत्पादनाचा प्रमुख पट्टा म्हणून ओळखला जातो. मात्र, याच संत्रा उत्पादक पट्ट्यातील शेतकऱ्यांवर आज भीषण दुष्काळ, भूजलपातळीतील घट, वाढता उत्पादन खर्च आणि संत्र्याला मिळत नसलेला योग्य बाजारभाव अशा संकटांचा दुहेरी-तिहेरी मारा होत आहे. कष्टाने पिकविलेल्या संत्र्याला बाजारात अपेक्षित भाव मिळत नसल्याने काही शेतकऱ्यांवर संत्रा रस्त्यावर फेकून देण्याची वेळ येत आहे. संत्रा उत्पादकांचे हे विदारक वास्तव शासनाच्या कृषी धोरणांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. संत्रा प्रक्रिया उद्योगांची उभारणी आणि त्यांचा शेतकऱ्यांना होणारा प्रत्यक्ष लाभ याबाबत आता ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

नागपूर मिहान येथील रामदेवबाबा संत्रा प्रक्रिया प्रकल्प, दापोरी येथील जैन फार्म फ्रेश संत्रा उन्नती प्रकल्प आणि नांदेड येथील संत्रा प्रक्रिया प्रकल्प असूनही संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित दिलासा मिळत नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. या



प्रकल्पांचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किती लाभ मिळतो, किती संत्र्यावर प्रक्रिया होते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किती वाढ झाली, याचा शासनाने पारदर्शक आढावा घेऊन संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मोर्शी तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांनी व्यक्त केली आहे.

संत्रा उत्पादक शेतकरी वर्षभर बागेची निगा राखण्यासाठी मेहनत आणि मोठी आर्थिक गुंतवणूक करतो. मात्र, पीक हातात आल्यानंतर बाजारभाव मिळत नसेल आणि प्रक्रिया उद्योगांचाही आधार मिळत नसेल, तर शेतकऱ्याने जगायचे कसे? संत्रा रस्त्यावर फेकण्याची वेळ येणे ही केवळ एका शेतकऱ्याची समस्या नसून संपूर्ण संत्रा उत्पादक पट्ट्याच्या अर्थव्यवस्थेसमोरील गंभीर संकट आहे. त्यामुळे शासनाने संत्रा प्रक्रिया प्रकल्पांच्या कार्यक्षमतेची तपासणी करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेल, अशी व्यवस्था उभी करावी. दुष्काळग्रस्त संत्रा उत्पादकांना तातडीची मदत द्यावी आणि लहान आकाराच्या संत्रावर प्रक्रिया करणारा नांदेड येथील संत्रा प्रक्रिया प्रकल्प मोर्शी तालुक्यात उभारण्याच्या मागणीवर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

संत्रा प्रक्रिया प्रकल्पांचा शेतकऱ्यांना फायदा कधी?

संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या मोर्शी-वरूड परिसरात संत्र्यावर आधारित प्रक्रिया उद्योगांची मोठी क्षमता आहे. मात्र, बाजारात संत्र्याचे दर घसरले किंवा व्यापाऱ्यांकडून मागणी कमी झाली की उत्पादकांसमोर संत्रा विकायचा कुठे, हा गंभीर प्रश्न उभा राहतो. संत्र्याचा रस, पल्प, कॉन्सन्ट्रेट आणि इतर मूल्यवर्धित उत्पादने तयार करणाऱ्या उद्योगांमुळे शेतकऱ्यांना पर्यायी बाजारपेठ मिळू शकते. परंतु प्रक्रिया उद्योगांची उपलब्धता, त्यांची प्रत्यक्ष कार्यक्षमता, खरेदी व्यवस्था आणि शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला यामध्ये प्रभावी समन्वय नसल्यास या प्रकल्पांचा अपेक्षित लाभ उत्पादकांपर्यंत पोहोचणार कसा, असा सवाल उपस्थित होत आहे.

दुष्काळात बागा जगवायच्या की संत्रा फेकून द्यायचा?



यंदाच्या भीषण दुष्काळामुळे मोर्शी-वरूड परिसरातील संत्रा उत्पादकांसमोर बागा जगविण्याचे मोठे आव्हान उभे आहे. पाण्याची पातळी खालावल्याने सिंचनासाठी अडचणी निर्माण होत आहेत. वीज, खते, औषधे आणि मजुरीचा खर्च वाढत असताना संत्र्याला रास्त भाव मिळत नसल्यामुळे उत्पादन खर्चही भरून निघणे कठीण होत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत, सिंचनासाठी पुरेसे पाणी व वीज आणि संत्र्याच्या विक्रीसाठी प्रभावी व्यवस्था उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता असली पाहिजे.

-रुपेश वाळके

अध्यक्ष,राष्ट्रवादी युवक काँग्रेस मोर्शी तालुका.

कचराकोंडीत अमरावतीकरांचा सण ठरतोय दुर्गंधीमय; स्वच्छता बंदच

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ :शहराच्या स्वच्छतेचे केंद्रीय कंत्राट घेणारी कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी व महानगरपालिकेचे समीकरण अजूनही जुळले नाही. कोणार्क कंपनी सतत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वादग्रस्त ठरत आहे. त्याचा साहजिकच परिणाम शहराच्या स्वच्छतेवर होत आहे. नियमित वेतन देण्यात अपयशी ठरत असल्यामुळे कोणार्कचे कर्मचारी ऐन सण-उत्सव पाहून कामबंद आंदोलन करीत आहेत. त्यामुळे शहरात सर्वत्र अस्वच्छता दिसून येत आहे. गणेशोत्सवात शहरात अस्वच्छतेने कहर केला. त्यानंतर परिस्थिती काहीशी सुधारत नाही तोच, ऐन नवरात्रोत्सवाच्या आधी कोणार्क कंपनीने त्यांच्या घरोघरी कचरा उचलणारी वाहने चोरीला गेल्याची तक्रार केली. काही माजी कंत्राटदारांविरोधात एफआयआरही दाखल करण्यात आली. त्यानंतर कोणार्ककडे निधीच नसल्यामुळे ऐन नवरात्रोत्सवात शहरात घंटागाड्याच फिरकल्या नाहीत. पेट्रोल पंपांनी उधारीवर डिझेल देण्यास नकार दिला. त्यामुळे शहरात सर्वत्र कचरा पडून आहे. नवरात्रोत्सवानिमित्त गरब्यांचे आयोजन करण्यात आले. दुर्गोत्सव मंडळांमध्ये येत्या दोन ते तीन दिवसांत महाप्रसादाच्या कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे.

परिसर स्वच्छता तर सोडा, घंटागाडीही येत नाही शहरातील रस्ते, परिसराची स्वच्छता होणार, याचा विचारच करणे सोडून दिले आहे. कार्यक्रम, उत्सवप्रसंगी आम्हीच परिसर, रस्ते झाडून स्वच्छ करतो. किमान घंटागाडी दररोज यायला हवी, अशी अपेक्षा असते. तसे होत नाही. ती आठवड्यातून एकदा येते.

- सपना राऊत, नागरिक.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

ई-निविदा सूचना-३५/२०२६-२७

१. **वि सं वि ई.नि ३३८ / कोड ३००००७२८५० :-** औ.वि.के. पारस येथे न्युमेरिक रिले-पॉलिफेज डायग्नोस्टीक, मॉनिटरींग अँड टेस्ट किट चा पुरवठा करणे. (Esti.रू:- ४९.४० लाख, EMD रू:- ५२९०६/-)

२. **च सं ई.नि ३३९ / कोड ३००००७२८६५ :-** औ.वि. केंद्र पारस संच ३ चक्रमाला संधारण येथे ओवरहॉल दरम्यान विविध उपभोग्य वस्तुंचा पुरवठा करणे. (Esti.रू:- ३.३९ लाख, EMD रू:- ६८९७/-)

३. **रा हा वि ई. नि ३४० / कोड ३००००७२८८० :-** औ.वि.के. पारस संच ३ आणि ४ राखड हाताळणी विभागातील ई एस पी फ्लाय अॅश इव्हॅक्युएशन सिस्टिम करिता मोटर विरहीत लिक्वीड रींग व्हॅक्यूम पंपाचा पुरवठा करणे. (Esti.रू:-१५.३४ लाख, EMD रू:- १८८४९/-)

४. **रा हा वि ई.नि ३४१ / कोड. ३००००७२८८७ :-** औ.वि.के. पारस येथे बॉयलरच्या कॅट हाउस (९ मीटर पातळीवर) स्कॅफोल्डींग उभारण्याचे आणि नेक सिलिंग व्यवस्था करण्याचा कंत्राट. (Esti.रू:- ३.०८ लाख, EMD रू:- ६५८२/-)

५. **को हा विं ई.नि ३४२ / कोड. ३००००७२८९८ :-** औ.वि.के. पारस येथे २५० मे वॅ कोळसाहाताळणी विभाग येथे ऑउटडोर वर्कशॉप मधून मशिनिंग/रिकंडिशनिंगच्या कामाचा कंत्राट. (Esti.रू:- ८.९९ लाख, EMD रू:- १२४९७/-)

६. **को हा वि ई. नि ३४३ / कोड ३००००७२८९८ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ कोळसाहाताळणी विभाग येथील मेजर ऑक्सलरीज जसे वॅगन टिप्पलर, साईड आर्म चार्जर, स्टॅकर रिक्लाईमर, बुल्डोझर चे विविध प्रकारचे हाय प्रेशर हॅड्रोलीक होजेस् ची दुरूस्ती व बदलविण्याचा कंत्राट. (Esti.रू:- ७.३६ लाख, EMD रू:- १०८६१/-)

१) ई निविदा अ.क्र. १ ते ६ विक्रिचा कालावधी दि. २४.१०.२०२६ ते १३.११.२०२६ सादरकरण्याची दि १४.११.२०२६ वेळ १६.०० वा.

टीप. सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी **https://eprocurement.mahagenco.in**

मुख्य अभियंता औ. वि. केंद्र, पारस

जाहीर नोटीस

विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्र.२७७/२०२५ प्रोसेस क्र. ४६१०/२०२६

चौ. ता.०७/१२/२०२६ दिनांक २२/१०/२०२६

अर्जदार :१. वसंत महादेव बोडखे, वय ६७ वर्ष, रा. मोठे बारगण अकोट ता. अकोट जि. अकोला २. केशव महादेव बोडखे, वय ६७ वर्ष, रा. महालक्ष्मी कॉलनी, सरस्वती नगर कॉलेज रोड अकोट ता. अकोट जि. अकोला ३. अनंत महादेव बोडखे, वय ६३ वर्ष, रा. मोठे बारगण अकोट ता. अकोट जि. अकोला ४. मधुकर महादेव बोडखे, वय ६३ वर्ष, रा. देशपांडे मठाजवळ, काळा मारोती मंदिराजवळ अकोट ता. अकोट जि. अकोला ५. प्रल्हाद महादेव बोडखे, वय ५९ वर्ष, रा. संभाजी नगर, कॉलेज रोड अकोट ता. अकोट जि. अकोला ६. दिपक महादेव बोडखे, वय ५६ वर्ष, रा. मोठे बारगण अकोट ता. अकोट जि. अकोला

...विरुद्ध...

गैरअर्जदार : कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी असून अर्जदार क्र. १ ते ६ चे वडील नामे महादेवराव बळीरामजी बोडखे हे आपले संपूर्ण जीवनकाळात मोठे बारगण अकोट ता. अकोट जि. अकोला येथेच राहिले व तेथेच दि. १०/०२/२००६ रोजी गायत झाले आहेत. तसेच मयत महादेवराव बळीरामजी बोडखे यांची पत्नी व अर्जदारांची आई नामे पार्वताबाई महादेवराव बोडखे ह्या दि. ३१/०५/२०१५ रोजी मोठे बारगण अकोट ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत महादेवराव बळीरामजी बोडखे यांची आई नामे गोदाबाई बळीरामजी बोडखे ह्या सन १९८४ मध्ये मयत झाल्या आहेत. तसेच मयत महादेवराव बळीरामजी बोडखे यांना अर्जदार क्र. १ ते ६ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर रहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (क. स्तर), अकोट

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्र.२७८/२०२५ प्रोसेस क्र.४६१८/२०२६

चौ. ता.२१/११/२०२६ दिनांक २२/१०/२०२६

अर्जदार : मुरलीधर तुळशीराम डवंगे, वय ६० वर्ष, रा. बोर्डी, ता. अकोट जि. अकोला

..विरुद्ध..

गैरअर्जदार :

१. एकनाथ तुळशीराम डवंगे, वय ६८ वर्ष, रा. उमरी बाजार, ता. दर्यापूर, जि. अमरावती २.सौ. आशाबाईशालिकरामश्यामसुंदर, वय ६२ वर्ष, ३. नंदकिशोर तुळशीराम डवंगे, वय ५८ वर्ष, ४. शिवचरण तुळशीराम डवंगे, वय ५६ वर्ष, क्र. २ ते ४ रा. बोर्डी ता. अकोट जि. अकोला सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार हे वरील पत्त्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ४ चे वडील नामे तुळशीराम गंगाराम डवंगे हे आपले संपूर्ण जीवनकाळात मौजे बोर्डी, ता. अकोट जि. अकोला येथेच राहिले व तेथेच दि. १७/०८/२०२५ रोजी मयत झाले आहेत. तसेच तुळशीराम गंगाराम डवंगे यांची पत्नी विमलाबाई तुळशीराम डवंगे ह्या सन १९७४ मध्ये बोर्डी, ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत तुळशीराम डवंगे यांची आई नामे भुगनबाई गंगारामजी डवंगे ह्या दि. १७/०६/१९९५ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच मयत तुळशीराम गंगाराम डवंगे यांचा मुलगा, अर्जदार व गैरअर्जदारांचा भाऊ नामे गोपाल तुळशीराम डवंगे हा दि. १९/१२/२००८ रोजी अविवाहित असताना मयत झाला आहे. मयत तुळशीराम गंगाराम डवंगे यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर रहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट, जि. अकोला

महत्त्वाचे

रेणूका सिंग ठाकूर वनडे मालिकेतून बाहेर



नवी दिल्ली :भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तीन सामन्यांची टी-२० मालिका नुकतीच संपली. भारताने ही मालिका जिंकली. आता दोन्ही संघामध्ये एकदिवसीय मालिका खेळली जाणार आहे. स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघ एकदिवसीय मालिकेतही झिम्बाब्वेला क्लीन स्वीप देण्याचा प्रयत्न करेल. पहिला एकदिवसीय सामना वडोदरा स्टेडियमवर खेळला जाईल. परंतु, या मालिकेपूर्वी एक वाईट बातमी समोर आली आहे. वेगवान गोलंदाज रेणुका सिंग या मालिकेतून बाहेर झाली आहे. बीसीसीआयने तिच्या बदली खेळाडूचीही घोषणा केली आहे.बीसीसीआयने रेणुका सिंग ठाकूरबाबत महत्त्वाची माहिती जाहीर केली आहे. बीसीसीआयने म्हटले की, 'रेणुका सिंग ठाकूर सध्या बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पन्नास षटकांच्या सामन्यांसाठी आवश्यक गोलंदाजीचा सराव करत आहेत. यामुळे तिला एकदिवसीय मालिकेतून वगळण्यात आले आहे.' रेणुकाच्या जागी संघात २२ वर्षीय आसामी वेगवान गोलंदाज जिंतिमानी कलिताला स्थान देण्यात आले आहे. कलिता पहिल्यांदाच एकदिवसीय सामन्यांमध्ये सहभागी होणार आहे.भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना शुक्रवारी वडोदरा येथे खेळला जाईल. स्मृती मंधाना पूर्णवेळ कर्णधार झाल्यानंतर भारताने चांगली सुरुवात केली आणि टी-२० मालिकेत झिम्बाब्वेला ३-० ने पराभूत केले. एकदिवसीय सामन्यांमधील झिम्बाब्वे संघाविरुद्ध पुन्हा एकदा चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.झिम्बाब्वेविरुद्धची तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका स्मृती मंधानासाठी खास असणार आहे.

आशियाई पॅरा गेम्स : भारत पदकतालिकेत चौथ्या क्रमांकावर


नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था



आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारताने आतापर्यंत एकूण १०४ पदके जिंकली असून. यामध्ये २७ सुवर्ण, ३४ रौप्य आणि ४३ कांस्यपदकांचा समावेश आहे. या कामगिरीसह भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर पोहचला आहे.आशियाई पॅरा खेळांमध्ये गुरुवारी भारताच्या पॅरा ॲथलिट्सची नेत्रदीपक कामगिरी कायम राहिली. भारताने या स्पर्धेच्या चौथ्या दिवसअखेर २१ सुवर्ण, २६ रौप्य व ४१ कांस्य अशी एकूण ८८ पदके नोंदवली.दिवसाच्या पहिल्या टप्प्यात पुरुषांच्या ४०० मीटर टी ४७ प्रकारात दिलीप गावितने सुवर्णपदक पटकावले. यापूर्वी १०० मीटर टी ४७ शर्यतीत सुवर्ण जिंकणाऱ्या दिलीपने ४८.२७ सेकंदांची वेळ नोंदवत जपानमधील आपल्या दुसऱ्या सुवर्णपदकावर नाव कोरले. यासह त्याने २०२३ हँग्डा स्पर्धेतील विजेतेपदही यशस्वीरीत्या राखले. दिवसाचा समारोपही भारताने सुवर्णपदकानेच केला.पुरुषांच्या लांब उडी टी ४४/टी ६२/टी ६४ अंतिम फेरीत सोलाईराज धर्मराजने आशियाई क्रीडा स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदक पटकावून आपले जेतेपद कायम राखले. सोलाईराजने ७.१५ मीटर झेप घेतली, तर मलेशियाच्या एडी बर्नार्डने ६.३४ मीटरसह रौप्य आणि युमा तामाकीने (टी ६४) ६.८९ मीटरसह कांस्यपदक जिंकले. पॅरा जलतरणात रवी कार्तिक बुदीगीनाने दोन रौप्यपदकांनंतर आणखी एका कांस्यपदकाची भर घातली. पुरुषांच्या ५० मीटर फ्रीस्टाईल एस १३ प्रकारात त्याने २५.८९ सेकंद वेळेसह तिसरे स्थान मिळवले; तो केवळ ०.३८ सेकंदांच्या फरकाने रौप्यपदकापासून वंचित राहिला. इंडोनेशियाच्या यावियांदा मौलानाने रौप्यपदकावर आपली मोहर उमटवली. पुरुषांच्या १०० मीटर बॅकस्ट्रोक एस ७ फेरीत तेजस नंदकुमारने १:१८.५८ अशा वेळेसह कांस्यपदक मिळवले.पुरुषांच्या उंच उडी टी ६३ प्रकारात भारताने ऐतिहासिक कामगिरी करत सर्व तिन्ही पदकांवर कब्जा केला. शैलेश कुमारने १.८९ मीटर उडी मारत नवा आशियाई विक्रम रचून सुवर्णपदक जिंकले. वरुण भाटीने हंगामातील सर्वोत्तम १.८४ मीटर कामगिरीसह रौप्य, तर राहुलने वैयक्तिक सर्वोत्तम १.८१ मीटर उडी मारत कांस्यपदक मिळवले. महिलांच्या ४०० मीटर टी ४७ फेरीतही भारताने दुहेरी यश मिळवले; अंजनाबेन बुंबडियाने ५९.९७ सेकंदांच्या वेळेसह सुवर्ण, तर जयंती बेहेराने १:००.६५ सेकंदांसह रौप्यपदक जिंकले, महिलांच्या ४०० मीटर टी १२ अंतिम फेरीत तेजलबेन डामोरने ५७.६० सेकंद वेळेसह रौप्यपदक मिळवले. या शर्यतीत इराणच्या हजार सफारझादेहने ५६.४३ सेकंदांच्या नव्या आशियाई विक्रमासह सुवर्ण पटकावले. जलतरणात कपिल कुमारने पुरुषांच्या ४०० मीटर फ्रीस्टाईल एस १० प्रकारात ४:३८.४४ वेळेसह रौप्यपदक पटकावले. जपानच्या अकिटो मिनाईने ४:२७.४४ सेकंदांसह सुवर्ण जिंकले. पुरुषांच्या ब्रेस्टस्ट्रोक एसबी ९ अंतिम फेरीत स्वस्तिक पाटीलने १:१३.७७ वेळेसह भारताला कांस्यपदक मिळवून दिले.

पॅरा बॅडमिंटनमध्ये महिला एकेरी एसयू ५ च्या उपांत्य फेरीत मनीषा रामदासला सहकारी खेळाडू तुलसीमाथी मुरुगेसनकडून २१-१९, १५-२१, १३-२१ असा पराभव पत्करावा लागल्याने कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. पुरुष दुहेरीत सूर्यकांत यादव आणि नवीन शिवकुमार जोडीला इंडोनेशियाच्या सुर्यो नुग्रोहो आणि मुह अल इप्तान जोडीविरुद्ध १-२ (८-२१, २१- १९ १६-२१) अशा पराभवानंतर करियपटक मिळाले.

नितेश-थुलसिमथीची रौप्यपदकाला गवसणी; पॅरा बॅडमिंटनमध्ये भारताची दमदार कामगिरी!



नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंची पदकांची कमाई सुरूच आहे. भारताच्या नितेश कुमार आणि थुलसिमथी मुरुगेसन या जोडीने बॅडमिंटनच्या मिश्र दुहेरी एसएल-३, एसयू-५ गटात रौप्यपदक पटकावले. शुक्रवारी (२३ ऑक्टोबर) झालेल्या अंतिम सामन्यात इंडोनेशियाच्या लीनी रात्री ओक्टिला आणि हिकमत रामदानी या जोडीने भारतीय जोडीचा ११-२१, २१-१९, २१-१४ असा पराभव केला.अंतिम सामन्यात नितेश आणि थुलसिमथी यांनी शानदार सुरुवात करत पहिला गेम २१-११ असा जिंकला. मात्र, दुसऱ्या गेममध्ये इंडोनेशियाच्या जोडीने जोरदार पुनरागमन करत २१-१९ अशी बाजी मारली. निर्णायक तिसऱ्या गेममध्येही इंडोनेशियाच्या खेळाडूंनी आपली आघाडी कायम ठेवत २१-१४ असा विजय मिळवला. त्यामुळे भारतीय जोडीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.या स्पर्धेत थुलसिमथी मुरुगेसनने महिला एकेरी एसयू-५ गटातही रौप्यपदक जिंकले. अंतिम सामन्यात चीनच्या यांग हिच्याकडून तिला १८-२१, ११-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.दुसरीकडे, नितेश कुमारने पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात भारताच्याच प्रमोद भगतचा २१-१८, २१-१६ असा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. प्रमोद भगतने यापूर्वी २०१८ आणि २०२२ च्या स्पर्धांमध्ये सुवर्णपदक पटकावले होते. दोन पॅरालिम्पिक विजेत्यांमधील या लढतीत नितेशने दमदार खेळ करत बाजी मारली.भारताच्या नित्या श्री सुमति सिवनने महिला एकेरी एसएच-६ गटात रौप्यपदक जिंकले. अंतिम सामन्यात चीनच्या ली फेंगमेईने तिचा २१-१२, २१-१३ असा पराभव केला.२०२३ मध्ये चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताने ऐतिहासिक कामगिरी केली होती. त्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी २९ सुवर्ण, ३१ रौप्य आणि ५१ कांस्य अशी एकूण १११ पदके जिंकली होती. यंदाच्या स्पर्धेतही भारतीय खेळाडूंची पदकांची घोडदौड सुरू आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये मोठा बदल

दुसऱ्या कसोटीत आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियावर विजय



नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

सध्या साऊथ आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टेस्ट सिरीज सुरू आहे. पहिली टेस्ट ऑस्ट्रेलियाने जिंकली आहे. त्यानंतर आता दुसऱ्या सामन्यात साऊथ आफ्रिकेने वापसी केली आहे. साऊथ आफ्रिकेने दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियावर विजय मिळवला आहे. दुसऱ्या सामन्यात साऊथ आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा एका डाव आणि ३१ धावांनी पराभव करत तीन सामन्यांची सिरीज १-१ अशी बरोबरीत आणली आहे.

त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉईंट्स टेबलमध्ये बदल झाले आहेत. साऊथ आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर १ इनिंग आणि ३१ रन्सने पराभव केला आहे. त्यामुळे पॉईंट्स टेबलमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. या पराभवानंतरही ऑस्ट्रेलियन संघ पॉईंट्स टेबलमध्ये आघाडीवर आहे. मात्र त्यांच्या गुणांच्या टक्केवारीत मोठी घसरण झाली आहे. दक्षिण आफ्रिकेच्या या विजयामुळे चा अंतिम सामना गाठण्याच्या शर्यतीत रंगत वाढली असून, प्रत्येक संघासाठी आगामी सामने अतिशय महत्त्वाचे असणार आहेत.

सध्या गुणतालिकेत ५व्यास्थानावर संघर्ष करत असलेल्या भारतीय संघासाठी फायनलमध्ये पोहोचण्याच्या आशा अद्याप कायम आहेत. भारताला अंतिम फेरीत आपले स्थान पक्के करण्यासाठी आगामी सिरीजमध्ये जास्तीत जास्त सामने जिंकावे लागतील. आफ्रिकेने मिळवलेल्या या विजयामुळे मालिकेचा तिसरा आणि अंतिम सामना अत्यंत चुरशीचा असणार आहे. ही सिरीज कोण जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या रोमांचक टेस्ट सिरीजमध्ये रंगत वाढली आहे. पहिला कसोटी सामना जिंकून ऑस्ट्रेलियाने आपले स्थान पक्के केले होते. मात्र दुसऱ्या सामन्यात आफ्रिकेचा विजय झाल्याने हे समीकरण थोडेसे बदलले गेले आहे. ऑस्ट्रेलियन संघाचे घसरून थेट ७५% वर आले आहे. ऑस्ट्रेलियन संघ अजूनही पहिल्या स्थानावर आहे.या पराभवानंतर सिरीजमधील तिसरा आणि अंतिम सामना अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे. जर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने हा शेवटचा सामना जिंकण्यात यश मिळवले, तर ते केवळ मालिकाच जिंकणार नाहीत, तर ऑस्ट्रेलियन संघाला नंबर-१ च्या खुर्चीवरून खाली देखील खेचू शकतात. त्यामुळे आगामी सामन्यात कांगारूंना आपले वर्चस्व टिकवण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

लंडनमध्ये भारतीय क्रीडा क्षेत्राचा डंका; जागतिक क्रीडा पुरस्कार सोहळ्यात तीन आंतरराष्ट्रीय सन्मान

लंडन :दि.२३ वृत्तसंस्था

आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात भारताचा गौरव वाढवणारी कामगिरी लंडन येथे पार पडलेल्या 'डब्ल्यूएफ जागतिक क्रीडा पुरस्कार २०२६' सोहळ्यात पाहायला मिळाली. १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी आयोजित या सोहळ्यात भारतीय क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांना तीन प्रमुख आंतरराष्ट्रीय सन्मानांनी गौरविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. खोजा शिया इथना-अशरी मुस्लिम समुदायांच्या जागतिक महासंघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात जगभरातील खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते.भारतीय फुटबॉलचे माजी कर्णधार आणि अर्जुन पुरस्कार विजेते शब्बीर अली यांना या सोहळ्यात दोन महत्त्वाच्या श्रेणींमध्ये सन्मानित करण्यात आले. भारतीय पादकंदुक क्षेत्रातील त्यांचे दीर्घकालीन योगदान, खेळाडूंना घडविण्यासाठी केलेले प्रयत्न आणि मार्गदर्शनातून या खेळाचा विकास साधण्यासाठी दिलेल्या योगदानाची या पुरस्कारांच्या माध्यमातून दखल घेण्यात आली. अनेक दशकांपासून मैदानावर आणि मैदानाबाहेर त्यांनी भारतीय पादकंदुकासाठी काम केले आहे. त्यांच्या कारकिर्दीचा गौरव हा भारतीय पादकंदुक क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण मानला जात आहे.स्नूकर आणि बिलियर्ड्स या खेळप्रकारांत भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणारे दिग्गज खेळाडू यासिन मर्चंट यांनाही या सोहळ्यात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण कामगिरीतून त्यांनी या खेळांमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या प्रदीर्घ क्रीडा कारकिर्दीचा आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाचा गौरव या पुरस्काराद्वारे करण्यात आला. त्यांच्या यशामुळे स्नूकर आणि बिलियर्ड्समध्ये कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या नव्या पिढीला प्रेरणा मिळत आहे.या सोहळ्यात भारताचे प्रतिनिधित्व केवळ पुरस्कार स्वीकारण्यापुरते मर्यादित राहिले नाही. क्रीडा आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व शुजा अली यांनी पाच सदस्यीय आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळात महत्त्वाची भूमिका बजावली.

सोन्या-चांदीचे दर जाहीर

नवी दिल्ली : देशात २३ ऑक्टोबर रोजी सोन्या-चांदीचे दर जाहीर झाले असून, २२ कॅरेट सोन्याचा प्रति १० ग्रॅमचा दर १ लाख ३२ हजार ३४० रुपये, तर २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४४ हजार ३७० रुपये आहे. चांदीचा प्रति किलोग्रॅमचा भाव २ लाख २४ हजार ९०० रुपये नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे सोने-चांदी खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी आजचे दर महत्त्वाचे ठरत आहेत. देशात २३ ऑक्टोबर रोजी २४ कॅरेट सोन्याचा प्रति ग्रॅम दर १४ हजार ४३७ रुपये, २२ कॅरेट सोन्याचा दर १३ हजार २३४ रुपये, तर १८ कॅरेट सोन्याचा दर १० हजार ८२८ रुपये आहे. प्रति १० ग्रॅमचा विचार करता १८ कॅरेट सोन्याचा भाव १ लाख ८ हजार २८० रुपये आहे. चांदीचा प्रति ग्रॅम दर २२४ रुपये ९० पैसे आहे.

शहरनिहाय दरांमध्ये काही प्रमाणात फरक दिसून येत आहे. नागपूर आणि पुण्यात २२ कॅरेट सोन्याचा प्रति १० ग्रॅम दर १ लाख ३२ हजार ३४० रुपये, तर २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४४ हजार ३७० रुपये आहे. नाशिकमध्ये २२ कॅरेट सोन्याचा भाव १ लाख ३२ हजार ३७० रुपये आणि २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४४ हजार ४०० रुपये आहे.दिल्लीमध्ये २२ कॅरेट सोन्याचा प्रति १० ग्रॅम दर १ लाख ३२ हजार ४९० रुपये, तर २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४४ हजार ५२० रुपये आहे. सुरतमध्ये २२ कॅरेट सोन्याचा भाव १ लाख ३२ हजार ३९० रुपये आणि २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ४४ हजार ४२० रुपये आहे.

छोट्या ऑनलाइन विक्रेत्यांसाठी जीएसटी नोंदणी सुलभ

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

१ नोव्हेंबरपासून नवी व्यवस्था



देशातील छोटे दुकानदार तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने ई-कॉमर्स विक्रेत्यांच्या वस्तू व सेवा कर (जीएसटी) नोंदणीची प्रक्रिया सुलभ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही नवी व्यवस्था १ नोव्हेंबरपासून लागू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे ॲमेझॉन आणि फ्लिपकार्टसारख्या ई-कॉमर्स मंचांवरून व्यवसाय करणाऱ्या लहान विक्रेत्यांना अन्य राज्यांमध्ये व्यवसाय विस्तार करणे अधिक सोपे होणार आहे.५७ व्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत या प्रक्रियेला मंजुरी देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या नव्या व्यवस्थेसाठी आवश्यक तांत्रिक बदल पूर्ण झाले असून, संबंधित सुविधा जीएसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. केंद्रीय वस्तू व सेवा कर नियम, २०१७ मधील नियम १४बी अंतर्गत ही सुलभ आणि ऐच्छिक नोंदणी प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली आहे.नव्या व्यवस्थेनुसार, ई-कॉमर्स मंचांवर वस्तूंची विक्री करणाऱ्या लहान विक्रेत्यांना अन्य राज्यांमध्ये स्वतंत्र कार्यालय किंवा दुकान सुरू करण्याची आवश्यकता भासणार नाही. संबंधित ई-कॉमर्स मंचाचे गोदाम किंवा माल वितरण केंद्र हे व्यवसायाच्या ठिकाणाच्या नोंदणीसाठी वापरण्याची सुविधा मिळू शकते. त्यामुळे विक्रेत्यांना अन्य राज्यांमध्ये कार्यालय भाड्याने घेणे, भाडेकरार करणे आणि वीजबिलांसारख्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी येणारा खर्च वाचण्यास मदत होईल.यापूर्वी, अन्य राज्यांतील गोदामांमध्ये माल साठवून तेथील ग्राहकांना विक्री करण्यासाठी विक्रेत्यांना त्या राज्यातील व्यवसायाच्या ठिकाणासंबंधी आवश्यक पुरावे सादर करावे लागत होते. या प्रक्रियेमुळे लहान व्यावसायिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. नव्या सुविधेमुळे विक्रेत्यांना ई-कॉमर्स मंचांच्या माल वितरण केंद्रांमध्ये वस्तू साठवता येतील आणि ग्राहकांपर्यंत माल पोहोचविण्याची प्रक्रिया अधिक वेगवान होऊ शकेल.याशिवाय, वार्षिक उलाढाल २० लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र लहान विक्रेत्यांना जीएसटी नोंदणीच्या मर्यादेचा लाभ मिळण्याबाबतही या व्यवस्थेत महत्त्वपूर्ण तरतुदी आहेत. लागू नियम आणि अटींची पूर्तता करणाऱ्या विक्रेत्यांना स्रोतावर कर संकलनाच्या (टीसीएस) तरतुदींमधून दिलासा मिळू शकतो.



त्यामुळे पात्र छोट्या ऑनलाइन विक्रेत्यांचा खर्च कमी होऊन व्यवसायासाठी अधिक भांडवल उपलब्ध राहण्यास मदत होईल. या निर्णयामुळे लहान व्यावसायिकांना ऑनलाइन बाजारपेठेत विस्तार करण्याची संधी मिळणार असून, ई-कॉमर्स क्षेत्रातील त्यांचा सहभाग वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दिवाळीपूर्वी महागाईचा फटका; सीएनजीच्या दरात प्रतिकिलो ४.४५ रुपयांची वाढ

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था



दिवाळीचा सण जवळ आला असताना महागाईमुळे सर्वसामान्यांच्या खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. घरगुती वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे आधीच आर्थिक ताण सहन करणाऱ्या नागरिकांना आता सीएनजी दरवाढीचाही फटका बसणार आहे. अदानी टोटल गॅस लिमिटेडने (एटीजीएल) कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसच्या (सीएनजी) दरात प्रतिकिलो ४ रुपये ४५ पैशांची वाढ केल्याची माहिती समोर आली आहे. या दरवाढीचा परिणाम प्रामुख्याने गुजरातमधील अहमदाबाद परिसरातील वाहनधारकांवर होणार आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२६ मध्ये कंपनीने सीएनजीच्या दरात प्रतिकिलो चार रुपयांची वाढ केली होती. त्यावेळी दर ९८ रुपये ४७ पैशांवर पोहोचल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर आता पुन्हा दरवाढ झाल्याने वाहनचालकांच्या इंधनावरील खर्चात भर पडणार आहे. विशेषतः सीएनजीवर चालणाऱ्या रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनांचा वापर करणाऱ्यांना या दरवाढीचा आर्थिक भार सहन करावा लागू शकतो.नैसर्गिक वायूच्या खरेदी खर्चात मोठी वाढ झाल्यामुळे दरवाढीचा निर्णय घ्यावा लागल्याचे कंपनीकडून स्पष्ट करण्यात आल्याचे सांगितले जाते. देशांतर्गत नैसर्गिक वायूची मर्यादित उपलब्धता, पुरवठ्यातील कपात आणि जागतिक स्तरावरील तणाव यांमुळे गॅसच्या किमती वाढल्याचा दावा करण्यात आला आहे. या वाढलेल्या खर्चाचा काही भार ग्राहकांवर टाकण्यात आल्याचे समजते.दरम्यान, विविध शहरांतील सीएनजीचे दरही वेगवेगळे आहेत. उपलब्ध माहितीनुसार, नोएडामध्ये सीएनजीचा दर प्रतिकिलो ९५ रुपये ५९ पैसे, दिल्लीत ८६ रुपये ९८ पैसे, मुंबईत ८९ रुपये, चेन्नईत ९९ रुपये ५० पैसे, कोलकात्यात १०३ रुपये आणि जयपूरमध्ये ९९ रुपये ५० पैसे आहे.

पीएम किसानचा २४ वा हप्ता ३० ऑक्टोबरला मिळणार?; दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना दिलासा

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेच्या २४ व्या हप्त्याची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. उपलब्ध माहितीनुसार, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात हप्त्याचे पैसे जमा केले जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या तारखेची अधिकृत पुष्टी स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक आहे.पीएम किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी सहा हजार रुपयांची आर्थिक मदत तीन समान हप्त्यांत दिली जाते. प्रत्येक हप्ता दोन हजार रुपयांचा असतो. त्यामुळे आगामी हप्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या खर्चासाठी तसेच सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे.

शेतकऱ्यांना आपल्या हप्त्याची सद्यस्थिती तपासण्यासाठी पीएम किसानच्या अधिकृत संकेतस्थळालाभेट देता येईल. पर्यायावर क्लिक करून आवश्यक नोंदणी क्रमांक आणि सुरक्षा संकेतांक भरावा. त्यानंतर मागितलेला ओटीपी प्रविष्ट केल्यास हप्त्याची स्थिती आणि उपलब्ध पेमेंटविषयक माहिती पाहता येते.

दरम्यान, हप्ता मिळण्यात अडचण येऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी आपले ई-केवायसी पूर्ण आहे की नाही, आधार क्रमांक बँक खात्याशी जोडलेला आहे की नाही आणि जमिनीच्या नोंदी अद्ययावत आहेत की नाही, याची खात्री करून घ्यावी. यापैकी कोणतीही प्रक्रिया अपूर्ण असल्यास हप्ता मिळण्यास विलंब होऊ शकतो. हप्त्याची रक्कम खात्यात जमा झाली नसल्यास अधिकृत संकेतस्थळावरील पेमेंटची स्थिती तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी.

अजिंक्य भारत
आपलं जालना

जालना, शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ www.ajinkyabharat.com

थोडक्यात

आज काँग्रेसची मोटरसायकल रॅली

जालना : काँग्रेस पक्षाच्यावतीने यावर्षी पडलेल्या भीषण दुष्काळाच्या अनुषंगाने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच भारतीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी घेतलेल्या बेकायदेशीर, पक्षपाती व संविधान विरोधी निर्णयामुळे त्यांच्या राजीनामा मागणी करता तसेच त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाईसाठी काँग्रेसच्यावतीने ठिकठिकाणी जनजागृती व शासनाच्या निषेधार्थ वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. याच अनुषंगाने उद्या दिनांक २४ आक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता वाटुर फाटा ते परतुर या ठिकाणी मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव तथा सहप्रभारी (महाराष्ट्र) श्रीमती रेहना रियाज चिश्ती यांच्यासह खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण दळे, माजी आमदार राजेश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, जालना महानगर जिल्हाध्यक्ष डॉ.विशाल धानुरे, प्रदेश अल्पसंख्यांक विभागाचे उपाध्यक्ष बदर चाऊस, राजाभाऊ देशमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या रॅलीत काँग्रेस पक्षाच्या आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंठा तालुकाध्यक्ष विवेक घारे व परतुर तालुकाध्यक्ष बालासाहेब आकात यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.


हप्ता थकल्याने शिवीगाळ व दमदाटी

अंबड : ऑनलाइन घेतलेल्या कर्जाचा हप्ता थकल्याच्या कारणावरून फोनवर शिवीगाळ करून घरी कर्मचारी पाठवून वसुली करू, अशी धमकी दिल्याप्रकरणी एका फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्याविरोधात अंबड पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. राम गोरखनाथ पारवे (६०,चिंचखेड, ता.अंबड) यांनी दोन वर्षांपूर्वी एका फायनान्स कंपनीकडून ५० हजार रुपयांचे ऑनलाइन कर्ज घेतले होते. त्यापोटी दरमहा २२७५ रुपयांप्रमाणे आतापर्यंत ३२ हप्ते भरले असून केवळ ४ हप्ते बाकी आहेत. बुधवारी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास ते घरी असताना फायनान्स कंपनीच्या मोबाइलवरून त्यांना शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली.

निधन

ॲड. बाबासाहेब चिखले

परतूर : येथील ज्येष्ठ विधिज्ञ



बाबासाहेब चिखले यांचे मंगळवारी वयाच्या ७८ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. ॲड. चिखले यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत विधी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी बार कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली होती. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि डोलारा गावचे सरपंच म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. माजी सरपंच विजय राजे चिखले यांचे ते वडील होते. ॲड. बाबासाहेब चिखले यांच्या पार्थिवावर परतूर शहरातील वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचा : मुख्याधिकारी सूरज बिस्किटे

बांधकाम, वाहन धुण्यासाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

जाफराबाद, दि. २३ : तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती आणि पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता उपलब्ध पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करा, नासाडी रोखा आणि प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर वाढवा, असे निर्देश मुख्याधिकारी सुरज बिस्कीटे यांनी दिले आहेत.



सन २०२६ च्या खरीप हंगामात 'ट्रिगर-१' लागू असलेल्या तालुक्यांमध्ये या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

तालुक्यात काही भागांत अपुरा व अनियमित पाऊस, घटती भूजल पातळी आणि जलसाठ्यांवरील वाढता ताण यामुळे पाण्याचे योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे ठरले आहे. पिणे, स्वयंपाक, स्वच्छता, आरोग्यसेवा, अग्निशमन आणि पशुधनासाठी पाण्याला प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. बांधकाम, वाहन धुणे, रस्ते स्वच्छता आणि धूळ नियंत्रणासाठी पिण्याचे पाणी न वापरण्याचे किंवा पुनर्वापरित पाणी वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तालुक्यात आरओ वॉटर सेंटर आणि पाणी शुद्धीकरण केंद्रांनी प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या 'रिजेक्ट वॉटर'चा अपव्यय टाळावा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा बांधकाम, उद्याने, रस्त्यांवरील धूळ नियंत्रण आणि अन्य योग्य कामांसाठी वापर करावा. पुनर्वापरासाठीच्या पाण्याची गुणवत्ता व सुरक्षितता तांत्रिक निकषांनुसार तपासण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. पूर्णा नदित या महिण्यात भरपूर पाणी राहते, आज मात्र कुठेच पाणी दिसत नाही, त्यामुळे पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाइन, नळ आणि टाक्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करावी, गळती किंवा पाणी सांडणार नाही याची दक्षता घ्यावी. निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. अशी माहिती मुख्याधिकारी सूरज बिस्किटे यांनी दिली.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची पदवीधर निवडणूक मतदान केंद्रास भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





जालना, दि. २३ : औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुक २०२६ करीता आज सकाळी ८ वाजेपासून मतदान प्रक्रियेस शांत वातावरणात सुरुवात झाली. त्या पार्श्वभुमीवर जिल्हाधिकारी तथा सहायक जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना जिल्ह्यातील विविध मतदान केंद्रास भेट देवून मतदान प्रक्रियेची पाहणी केली.

जिल्हाधिकारी तथा सहायक जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना शहरातील अंकुशराव टोपे महाविद्यालय, चरण पहेलवान (सी.पी.) भक्त महाविद्यालय येथे तसेच भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिपोरा बाजार आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव रेणुकाई येथील मतदान केंद्रास प्रत्यक्ष भेट देवून मतदान प्रक्रिया योग्य पध्दतीने होत असल्याची पाहणी केली तसेच मतदान केंद्रातील केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांशी संवाद साधून मतदान प्रक्रियेची माहिती जाणून घेतली. यावेळी पोलिस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, जालन्याचे तहसिलदार धैर्यशिल गवळी, भोकरदनचे तहसिलदार ज्ञानेश्वर काकडे यांची उपस्थिती होती.

जालन्यात 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' प्रदर्शन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

जालना, दि. २३ : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार वस्तू थेट उत्पादकांकडून खरेदी करता याव्यात, यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने जालन्यात 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रदर्शन २ व ३ नोव्हेंबर २०२६ रोजी जुना जालना येथील उड्डाणपुलाजवळील स्वयंवर मंगल कार्यालयात सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकलेच्या वस्तू, कपडे, दागिने तसेच दैनंदिन वापरातील विविध वस्तूंचे स्टॉल्स असणार आहेत. अमृतच्या लक्षित गटातील स्थानिक महिला उद्योजिका, लघुउद्योजक आणि नवउद्योजकांना त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन व थेट विक्री करण्यासाठी या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे, उद्योजकांच्या विक्रीत वाढ करणे आणि ग्राहक व उत्पादक यांच्यात थेट संपर्क निर्माण करणे, हा प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश आहे. सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य दिल्यास उद्योजकांना आर्थिक बळ मिळण्यास मदत होणार आहे.तरी जालना शहरासह परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन स्थानिक उद्योजकांच्या उत्पादनांची खरेदी करावी आणि त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक,अमृत संस्था यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

बिरसा मुंडा जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी रजनिकांत बंन्डलु तर सचिव माणिक तोटे



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

जालना, दि. २३ : आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त उत्सव समिती जाहिर करण्यात आली. अध्यक्षपदी रजनिकांत बंन्डलु तर सचिवपदी माणिक तोटे यांची एकमताने निवड करण्यात आली.

जालना शहरातील राजारामनगर येथील कृष्णा प्लाझा येथे आदिवासी समाज विकास मंच, यांची बैठक माणिकलाल कामतीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी ही निवड करण्यात आली. यावेळी अ.भा. महात्मा ज्योतीबा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उर्वरीत कार्यरिणीत कार्याध्यक्ष शिवलाल अक्षय, उपाध्यक्ष अंगत कापरे, सहसचिव संतोष गायकवाड यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्याचे स्वागत आदिवासी समाज विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ स्वामी यांनी केले. यावेळी किशोर स्वामी, प्रकाश बरगे, प्रा.कुमठेकर, गणेश पवार, नरेश अन्टले, बागेश्वर इंद्रोले, सचिन आनंदे, आमित स्वामी, पवन तोगडवार, दिपक गुरवे, गणेश कारडे आदिंची उपस्थिती होती. सुत्रसंचलन दिलीप जुन्नरकर यांनी केले. आभार उमेश स्वामी यांनी मानले.

जिल्ह्यात ७ लाख ४४ हजार बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याचे उद्दिष्ट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



जालना, दि. २३ : जालना जिल्ह्यात राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त २७ ऑक्टोबर रोजी बालकांना जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. या दिवशी गोळ्या घेता न आलेल्या बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ० ते १९ वर्षे वयोगटातील ४ लाख ३२ हजार ७३८ ग्रामीण भागातील बालकांना तर शहरी भागातील २ लाख ३७ हजार ३९ व मनपा जालना येथील ७४ हजार ६५३ बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन आहे.

संपूर्ण जिल्ह्यात एकूण ७ लाख ४४ हजार ४२६ बालकांना गोळ्या देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जंतनाशक गोळ्यांमुळे मुलांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. शरीरातील जंतांमुळे रक्तक्षय, कुपोषण आणि शारीरिक व मानसिक विकासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना वयानुसार जंतनाशक गोळ्या देऊन त्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील ४ हजार ८४ मनुष्यबळाच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येणार आहे. पालकांनी १ ते १९ वर्षे वयोगटातील आपल्या मुलांना जंतनाशक गोळ्या देण्याबाबत सहकार्य करावे, असे आवाहन असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी केले आहे.

CAPTION कचऱ्याच्या ढीगारात मा.फुलंब्रीकर नाट्यगृह



जालना : शहरातील सांस्कृतिक वारसा जपणारी वास्तु म्हणजे मा. कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह. आज या वास्तुची अवस्था एखाद्या केर कचऱ्याच्या ढीगाराखाली दडलेल्या समाधी स्थळासारखी झाली आहे. महापालिकेतील सदस्यांसह अधिकारी व कर्मचारी वर्गाला मात्र यात कोणताच 'इंट्रेस' नाही. हे एव्हाना सर्वांनाच लक्षात आले आहे. असे असले तरी सर्वसामान्य जनता काहीच कसं बोलत नाही, हाही प्रश्नच आहे नाही का?

पिण्याच्या पाण्याचा साठा जपून ठेवा - डॉ.कृष्णकांत कनवारिया

जलशुद्धीकरण केंद्रासह जुई व पद्मावती प्रकल्पांची पाहणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



जालना, दि. २३ : आगामी काळात उद्भवणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून पिण्याच्या पाण्याचा साठा जपून ठेवावा तसेच पिण्याच्या पाण्यासाठी राखीव असलेल्या साठ्यातून इतर वापरासाठी केला जाणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कृष्णकांत कनवारिया यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

भोकरदन शहराला खडकपूर्णा येथून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने डॉ.कनवारिया यांनी जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी पाणीपुरवठा व्यवस्थेची माहिती घेत उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यावर भर दिला. तसेच जुई मध्यम प्रकल्प आणि पद्मावती प्रकल्पालाही भेट देऊन तेथील पाणीसाठ्याची पाहणी केली. आगामी कालावधीत पाण्याची संभाव्य टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहावा, यासाठी पाण्याचा वापर नियंत्रित करणे गरजेचे आहे. पिण्यासाठी राखीव असलेल्या पाण्याचा इतर कामांसाठी वापर होणार नाही, याची दक्षता संबंधित यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश डॉ.कनवारिया यांनी दिले. जलसाठ्यांचे नियोजन करताना भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून उपलब्ध पाणी जपून वापरणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पाण्याचा अपव्यय टाळणे, पिण्याच्या पाण्याच्या साठ्याचे संरक्षण करणे आणि पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवणे, या बाबींना प्राधान्य देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. या पाहणी दौऱ्यावेळी कार्यकारी अभियंता गजानन जंजाळ, उपअभियंता नरेंद्र ठाकूर, शाखा अभियंता हर्ष सुलताने, शाखा अभियंता अभिजीत बोर्डे, ग्रामविकास अधिकारी समाधान सोनवणे, रमेश दोड, विस्तार अधिकारी अंकुश काकडे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीस दिवसीय कार्यशाळेची यशस्वी सांगता

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

जालना, दि. २३ : दीक्षाझ ड्रीम फिटनेस आणि देवगिरी इंग्लिश स्कूल जालना यांच्या संयुक्त विद्यमाने वीस दिवसाच्या कार्यशाळेची सांगता सोरटी स्पोर्ट्स टर्फ, अंबड चौफुली येथे नुकतीच झाली.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना शहराच्या प्रथम नागरिक महापौर वंदनाताई मगरे आणि प्रमुख पाहुण्या म्हणून कल्पनाताई माने (बालभारती पाठ्यपुस्तक भूगोल विषयाच्या समिती सदस्य) या उपस्थित होत्या.





यावेळी शहरातील १०० महिलांनी दक्षिण भारतीय नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच प्रत्येक महिलेने रॅम्प वॉक करून स्वत:बद्दलचा स्टेजवरील आत्मविश्वास निर्माण केला. या महिलांमध्ये बहुतांश महिला या नोकरदार असून आपल्या कामासह कौटुंबिक जबाबदारीसोबत स्वत:चा छंद जोपासत आहेत हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिलांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरित करण्यात आले. महापौर वंदनाताई मगरे तसेच कल्पनाताई माने यांनी भाव विभोर होऊन महिलांना मार्गदर्शन केले व कार्यक्रमाचा आनंद लुटला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवगिरी इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती गायत्री सोरटी यांनी केले तर आभार प्रदर्शन दीक्षाझ ड्रीम फिटनेसच्या संचालिका दीक्षा जाधव (वाठोरे) यांनी केले.

स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागरण अभियान व आशा सेविकांसाठी कार्यशाळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

जालना, दि. २३ : स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या स्तनाच्या कर्करोगाविषयी समाजात जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने लॉयन्स क्लब ऑफ जालना डायमंड आणि जालना शहर महानगर पालिकेचा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगासंबंधी जनजागरण अभियान तसेच आशा सेविकांसाठी विशेष कार्यशाळेला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या अटलबिहारी वाजपेयी सभागृहात हा कार्यक्रम झाला.

या अभियानाचा शुभारंभ महानगरपालिकेच्या उपायुक्त श्रीमती नंदा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.सौ.संगीता राजे, लॉयन्स क्लब जालना डायमंडचे मार्गदर्शक सुभाष देवीदान, अध्यक्ष शंकर सवादे, सचिव तथा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.रामकृष्ण गौल, कोषाध्यक्ष वैभव पवार, लायन्स प्रांत ३२३४ एच २ चे गॅट कॉर्डिनेटर सुनील बियाणी, जालना लॉयन्स क्लबचे अध्यक्ष डॉ.गिरीश पाकणीकर, ललित बिजावत, डायमंडचे माजी अध्यक्ष तथा ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे अध्यक्ष मोहन इंगळे, डॉ.संदीप गोरे, बालाजी बांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'जागरूक महिला-निरोगी समाज' या संकल्पनेतून स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृतीची हाक देत महिलांच्या आरोग्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. वेळीच तपासणी, लवकर निदान आणि योग्य उपचार यामुळे या आजारावर मात करता येते, यावर भर देण्यात आला. मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.रामकृष्ण गौल यांनी उपस्थित आशा सेविकांना स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे, स्वयं-तपासणीची पद्धत आणि लवकर निदानाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. आशा सेविका थेट घराघरांत पोहोचत असल्याने त्यांच्या माध्यमातून हा संदेश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात डॉ.संगीता राजे यांनी या उपक्रमाचा उद्देश विशद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील बियाणी यांनी केले तर आभार डॉ.दीपक भालेराव यांनी मानले. कार्यक्रमास लॉयन्स क्लबचे सदस्य, मनपाचे अधिकारी-कर्मचारी व मोठ्या संख्येने आशा सेविका उपस्थित होत्या.

अजिंक्य भारत आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ www.ajinkyabharat.com

व्हेईकल वॉशिंग सेंटर्स तातडीने बंद करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

अकोला:अकोला जिल्ह्यात यावर्षी झालेल्या अपुऱ्या पावसामुळे भूजल पातळीत कमालीची घट झाली आहे. आगामी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचे संकट ओढवू नये आणि मानवी जीवन तसेच पशुधनासाठी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. याच पार्श्वभूमीवर, अकोला महानगरपालिका क्षेत्रातील वाहने धुण्याचे सर्व व्हेईकल वॉशिंग सेंटर्स टंचाई कालावधी संपेपर्यंत तातडीने बंद करण्याचे कठोर आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ आणि महाराष्ट्र भूजल अधिनियम, २००९ मधील तरतुदींनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी हे प्रतिबंधात्मक आदेश २२ ऑक्टोबर २०२६ पासून लागू केले आहेत. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी प्रशासनाने उचललेले हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.या आदेशाची शहरात आणि ग्रामीण भागात काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अकोला महानगरपालिका प्रशासन, संबंधित उपविभागीय अधिकारी , उपविभागीय पोलीस अधिकारी आणि महावितरण यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

अनंतायन

ती अशी कशी गं आई?



अॅड. अनंत खेळकर

माय शेवटी मायच असते.
आईला खोटं बोललेलं मुळीच आवडत नसे. पण दुर्दीत तीन भाकरी अन् खाणारे चौघे असले तर आई म्हणायची, ''मला भूक नाही. तुम्ही खाऊन घ्या,'' मग ती का खोटं बोलायची?
आई म्हणायची, ''संकट कोणतंही असो मुळीच डगमगायचं नाही. धैर्य खचू देऊ नका. हिमतीने मुकाबला करा,'' पण कुणाच काही दुखलं, खुपलं की आई मात्र खूप अस्वस्थ व्हायची. देवाला नवस करायची. का तिचा जीव एवढा तळमळायचा? ती नेहमी म्हणायची, ''कुटुंबात पारदर्शकता असावी. एकमेकांपासून काहीही लपवून ठेवायच नाही.मग का बरं आई तिचे अश्रू लपवायचा प्रयत्न करायची? का ती तिच्या दुःख, कष्ट, यातना कुणाला दिसू देत नव्हती? आई म्हणायची, ''देवाने आपणा सर्वांची निर्मिती केली. तो कशाचीही निर्मिती करू शकतो.पण मग त्याला आईसारखी दुसरी आई का निर्माण करता आली नाही? आईचा पुनर्जन्मावर विश्वास होता, पण आपल्या आयुष्यातून ती एकदा का निघून गेली की, जन्मभर कितीही शोध घेतला तरी का कुठेच दिसत नाही? दुनियाँ से जानेवाले जानें चले जाते हैं कहाँ? कैसे ढूँढ़ें कोई उनको नहीं कदमों के भी निशाँ।

शिक्षक मतदारसंघ निवडणूक

जिल्ह्यात ९२.१२ टक्के मतदान!

१३ मतदान केंद्रांवर ५,४७४ मतदारांनी बजाविला हक्क; बंडखोरीमुळे उमेदवारांची धाकधूक वाढली

अजिंक्य भारत। प्रतिनिधी





अकोला, दि. २३ : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी (२३ ऑक्टोबर) अकोला जिल्ह्यात उत्साहात व शांततेत मतदान पार पडले. जिल्ह्यात एकूण ९२.१२ टक्के इतके विक्रमी मतदान नोंदवले गेले आहे. जिल्ह्यातील निश्चित करण्यात आलेल्या १३ मतदान केंद्रांवर एकूण ५,९४२ पात्र मतदारांपैकी ५,४७४ शिक्षकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. महायुती आणि महाविकास आघाडीतील बंडखोरी तसेच रिंगणात उतरलेल्या प्रमुख शिक्षक संघटनांमुळे निवडणूक अत्यंत चुरशीची झाली असून, या लढतीत द्वितीय पसंतीची मते निर्णायक ठरणार असल्याचा अंदाज राजकीय जाणकारांनी व्यक्त केला आहे.
शुक्रवारी सकाळी ८ वाजेपासून जिल्ह्यातील सर्व १३ केंद्रांवर मतदानास सुरुवात झाली. अकोला शहरातील सीताबाई कला महाविद्यालय आणि आरडीजी कॉलेज येथील मतदान केंद्रांवर मतदारांची उपस्थिती उल्लेखनीय होती. अनुचित प्रकार टाळण्यासाठी सर्वत्र कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी शहरातील राधादेवी गोयनका महाविद्यालय आणि सीताबाई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. तसेच त्यांनी तेल्हारा/पातुर तहसील कार्यालयातील केंद्रालाही भेट देऊन पोलीस बंदोबस्त व आवश्यक सुविधांचा आढावा घेतला. या पाहणी प्रसंगी तहसीलदार कुणाल झाल्टे, तहसीलदार राहुल वानखडे आदी उपस्थित होते.
केंद्राबाहेर रसदी आणि रणनीतीचीच चर्चा! साहित्याची चर्चा: दरवेळप्रमाणे या वेळीही मतदान केंद्रांच्या परिसरात 'रसदी'ची जोरदार चर्चा रंगली होती. साडीसह इतर भेटवस्तू कोणी व किती वाटल्या, यावर राजकीय वर्तुळात गुफ्तगू सुरू होते.
कन्व्हेंट मतदारांची ओढाताण: मतदान केंद्राबाहेर राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांच्या समर्थकांनी मंडप उभारले होते. कन्व्हेंट शाळांमधील पात्र मतदारांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी उमेदवारांनी लावलेली ताकद आणि आखलेली रणनीती यावरच मंडपात प्रमुख गप्पा रंगल्या होत्या.

२७ ऑक्टोबरला अमरावतीत मतमोजणी

या निवडणुकीत मतपत्रिकेसोबत दिलेल्या जांभळ्या शाईच्या स्केच पेनचाच वापर करून १, २, ३ असा पसंतीक्रम नोंदवणे बंधनकारक होते. अन्य पेन किंवा पेन्सिलचा वापर केल्यास अथवा पसंतीक्रमात चूक झाल्यास मत बाद ठरण्याची शक्यता असते. या निवडणुकीची बहुप्रतिक्षित मतमोजणी मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अमरावती येथील लोकशाही भवन येथे पार पडणार आहे. २७ तारखेच्या निकालातच किती मते वैध ठरली आणि अवैध ठरलेल्या मतांचा कौल कोणाच्या पथ्यावर पडला, याचे चित्र स्पष्ट होईल.

डाबकी रोड रुंदीकरणातील आणखी एक अडथळा हटविला

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अकोला, दि. २३ :गेल्या अनेक वर्षांपासून रेंगाळलेल्या डाबकी रोड रुंदीकरणाच्या कामाने आता वेग घेतला असून, महानगरपालिकेने या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमित बांधकामे पाडण्याची मोहीम तीव्र केली आहे. गुरुवारी कारवाई केल्यानंतर शुक्रवारी पुन्हा एक मोठे अतिक्रमित बांधकाम पाडण्यात आले. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम झोन अंतर्गत डाबकी रोड मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणात अडचण ठरणाऱ्या निखिल श्रीनगर येथील वाणिज्य वापराच्या अनधिकृत व अतिक्रमित बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. डाबकी रोड रुंदीकरणाच्या कामात येणारे अनधिकृत अतिक्रमणे संबंधितांनी स्वतःहून काढून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मनपा प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे.
या कारवाईदरम्यान सहायक आयुक्त गजानन घोंगे, सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता समीर मालवे, रवींद्र जाधव यांच्यासह अतिक्रमण निर्मूलन पथकातील प्रतीक मांडवे, सागर जुनगडे, सोनू गायकवाड, स्वप्नील पवार, धम्मनंद वानखेडे, जावेद खान आदी उपस्थित होते.

२८ ऑक्टोबरला मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात मुंबईत मोर्चा-ॲड. प्रकाश आंबेडकर

महाराष्ट्रातील ७६ लाख मतवाढीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ :महाराष्ट्रातील २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील सुमारे ७६ लाख वाढलेल्या मतदानाचा डेटा निवडणूक आयोगाने जाहीर करावा आणि निवडणूक आयोगाच्या कथित गैरकारभाराला अटकाव घालावा, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने येत्या २८ ऑक्टोबर रोजी मुंबईत भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अकोला येथील पत्रकार परिषदेत केली.
हा मोर्चा मुंबईतील भायखळा येथील राजमाता जिजाऊ उद्यान ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान काढला जाणार असून, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी राष्ट्रपतींनी परवानगी द्यावी, अशी मुख्य मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, जितरत्न पटाईत, अकोला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, मिलिंद इंगळे आणि विकास सदांशिव यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

विरोधी पक्षांच्या भूमिकेवर टीका

या मोर्चाच्या निमंत्रणाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, वंचित बहुजन आघाडीने या आंदोलनासाठी डावे पक्ष, समाजवादी पक्ष, विद्यार्थी संघटना आणि आदिवासी संघटनांना आमंत्रित केले आहे. तसेच काँग्रेसवर टीका करताना ते म्हणाले, ''आमचा हा मोर्चा काँग्रेस पक्षासारखा नसेल, जे इतर पक्षांना न बोलवता नंतर मदतीचा आरोप करतात. काँग्रेसला वंचित, दलित, ओबीसी आणि आदिवासी नेत्यांनी त्यांच्या मागे फरफटत यावे असे वाटते, तर भाजपने मुस्लिमांच्या संदर्भात जी भूमिका घेतली तीच काँग्रेस वापरत आहे.

फॉर्म ६ आणि प्रतिज्ञापत्रावर गंभीर आरोप

पत्रकार परिषदेत बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक आयोगाच्या धोरणांवर तीव्र आक्षेप नोंदवला. मतदार यादीतून ज्या नागरिकांची नावे चुकीने वगळली गेली आहेत, त्यांना पुन्हा नाव समाविष्ट करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर तरतूद नसल्याने आयोग फॉर्म क्र. ६ भरून घेत आहे. या फॉर्मसोबत अर्जदाराला मी यापूर्वी मतदार नव्हतो असे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. आधीच मतदार असलेल्या व्यक्तीने असे प्रतिज्ञापत्र दिल्यास त्यावर खोटे प्रतिज्ञापत्र दिल्याच्या आरोपाखाली फौजदारी कारवाई होऊ शकते. आयोग नागरिकांना अशा प्रकारे गुन्हेगारी कृत्य करण्यास प्रवृत्त करत आहे.



मोबाईल हिसकाविणारा आरोपी जेरबंद

अकोला:अकोला रेल्वे स्थानकावरील बुकिंग हॉलमधून प्रवाशाचा मोबाईल हिसकावून पळ काढणाऱ्या चोरट्याला रेल्वे पोलिसांनी क्यूआर कोड आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या काही तासांत जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी १६ हजार रुपयांचा चोरीचा मोबाईल व गुन्ह्यात वापरलेला मोबाईल हस्तगत केला आहे.पुसद येथील एसटी बसचालक निलेश कराळे हे अकोला रेल्वे स्थानकाच्या बुकिंग हॉलमध्ये मोबाईलवर चित्रफीत पाहत असताना एका अज्ञात व्यक्तीने त्यांचा मोबाईल हिसकावून पळ काढला. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दरम्यान, मोबाईल परत मिळवण्यासाठी आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधत ऑनलाइन पैशांसाठी क्यूआर कोड पाठवला. आरोपीने मोबाईलमधील सिमकार्ड काढून स्वतःच्या फोनमध्ये टाकले होते.या तांत्रिक पुराव्याचा धाव घेत रेल्वे पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने सापळा रचला. आरोपीने पाठवलेल्या चार वेगवेगळ्या क्यूआर कोडचे तांत्रिक विश्लेषण केले असता, त्यातील एक कोड अकोल्यातील मोहतामिल परिसरातील एका मोबाईल दुकानाशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. जगजीवन रामनगर, टेलिफोन कॉलनी परिसरातील दुबे वाडी येथे मनोज रमेश दीक्षित हा आपल्या घराशेजारील टिनाच्या शेडमध्ये घरगुती गॅस सिलिंडरमधून ऑटोमध्ये गॅस भरत आहे. या माहितीच्या आधारे पथकाने घटनास्थळी जाऊन खात्री केली असता, प्रत्यक्ष गॅस भरण्याचे काम सुरू असल्याचे आढळले. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकून मनोज रमेश दीक्षित (वय ३६, रा. जगजीवन रामनगर, अकोला) आणि ऑटोचालक विनोद नारायण गेडाम (वय ४६, रा. अशोक नगर, अकोट फाईल, अकोला) यांना ताब्यात घेतले.या कारवाईत भारत गॅसचे पाच रिकामे व्यावसायिक सिलिंडर, चार भरलेले व सहा रिकामे घरगुती सिलिंडर, एचपी गॅसचा एक भरलेला सिलिंडर, गॅस भरण्याचे यंत्र, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि एमएच ३० एए ६८८७ क्रमांकाचा बजाज ऑटो असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपी आणि जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. याप्रकरणी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर व त्यांच्या पथकाने केली.

घरगुती गॅसच्या अवैध रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश

दोन आरोपी ताब्यात, १६ सिलिंडर व ऑटोसह १२.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अकोला, दि. २३ : घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरमधून ऑटोमध्ये अवैधरीत्या गॅस भरण्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, १६ गॅस सिलिंडर, गॅस भरण्याचे यंत्र, वजनकाटा आणि ऑटोसह एकूण १२ लाख ३५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला २२ ऑक्टोबर रोजी गुप्त माहिती मिळाली की, सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीतील

अवैध उत्खननाविरोधात खाण-क्रशर असोसिएशन आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशीचे आदेश

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३: जिल्ह्यात गौणखनिज उत्खनन आणि खदान व्यवसायातील कथित अनियमिततेविरोधात अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघानेच थेट प्रशासनाकडे तक्रार केली आहे. संघटनेच्या या पावलामुळे बेकायदा कामकाज करणाऱ्या खदानधारकांचे धाबे दणाणले आहेत. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना संबंधित खदानींची तातडीने तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.
संघटनेचे अध्यक्ष नवीनचंद्र खोसला यांनी दिलेल्या निवेदनानुसार, तात्पुरत्या परवान्यांवर सुरू असलेल्या खदानींमध्ये नियम डावलून ६ मीटरऐवजी तब्बल ३० मीटरपर्यंत खोल खोदकाम केले गेले आहे. ही अनियमितता उघड करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन या आधुनिक तंत्रज्ञानाने प्रत्यक्ष स्थळपाहणी व मोजणी करण्याची मागणी संघटनेने केली आहे. नियमभंग आढळणाऱ्या खदानी तत्काळ बंद करण्याची मागणीही करण्यात आली आहे.असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात केवळ ४ ते ५ खदानधारकांकडेच खाण सुरक्षा महासंचालनालयाची अधिकृत परवानगी आहे. तरीही अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे ब्लास्टिंग सुरू आहे. याशिवाय, शासनाचे स्वामित्वधन (रॉयल्टी) न भरता आणि आवश्यक वाहतूक पासशिवाय गौणखनिजाची वाहतूक केली जात असल्याने शासनाचा मोठा महसूल बुडत असल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जिल्हा खनिकर्म विभागाच्या १२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार, महसूल व खनिकर्म विभागाची भरारी पथके, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्यामार्फत प्रत्यक्ष क्षेत्रीय तपासणी केली जाणार आहे.

> सहा मीटरच्या मर्यादेचे उल्लंघन, परवानगीविना ब्लास्टिंग आणि विनापास वाहतूक यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर महसूल प्रशासन काय भूमिका घेते, दोषींवर प्रत्यक्ष दंडात्मक कारवाई होऊन खदानी बंद होणार की केवळ कागदोपत्री नोटिसा पाठवल्या जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

अकोल्यात २४ व २५ ऑक्टोबरला आठवे वऱ्हाडी बोलीभाषा साहित्य संमेलन



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : वऱ्हाडी बोलीभाषेचा प्रसार आणि संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचातर्फे यंदाचे आठवे वऱ्हाडी बोलीभाषा साहित्य संमेलन २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी अकोला येथे आयोजित करण्यात आले आहे. वऱ्हाडी साहित्याचा गोडवा जपणाऱ्या या संमेलनात विविध साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे.

संमेलनाचे खास आकर्षण..

माजघर (जुन्या जमान्यातील संसारोपयोगी भांडेकुंडे – शैला नंदकुमार चेडे..
विदर्भाचे माहिती ,वऱ्हाडी म्हणी, वऱ्हाडी उखाणे, वऱ्हाडी शब्दकुंभ, वऱ्हाडी लेखकांची चित्रमय माहिती, वऱ्हाडी खानपान
डॉ. साधना काळबांडे.. ,प्रेमापत्राची दुनिया गोपाल खाडे, कारंजा लाड ,शेतीमातीची दुनिया – विनायक काळे, शेगांव ,सायबर जनजागृती–अकोला सायबर पोलीस स्टेशन.

संमेलनाचे पदाधिकारी आणि मान्यवर

संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ वऱ्हाडी साहित्यिक विठ्ठल कुलट यांची निवड करण्यात आली आहे, तर स्वागताध्यक्ष म्हणून ख्यातनाम उद्योजक डॉ. सुगत वाघमारे जबाबदारी सांभाळणार आहेत. संमेलनाचे उद्घाटन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता आणि पदव्युत्तर मराठी विभागाप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे यांच्या हस्ते होईल. याशिवाय माजी संमेलनाध्यक्ष डॉ. साधनाताई काळबांडे आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी सदस्य पुष्पराज गावंडे संमेलनात विशेष उपस्थित राहतील.

संस्थेचे कार्याचा संक्षिप्त आढावा

बार्शीटाकळी येथील वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्थेमार्फत २०१५ पासून सातत्याने संवर्धनाचे कार्य सुरू आहे. आतापर्यंत सात यशस्वी संमेलने पार पडली असून, अस्सल वऱ्हाडी भाषेतील चिरांगन या दिवाळी अंकाचा नववा अंक यंदा प्रकाशित होत आहे. तसेच वऱ्हाडधन नावाचे मोबाईल ॲप सुद्धा तयार करण्यात आले आहे. दरवर्षी २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगेबाबा जयंतीचा दिवस वऱ्हाडी बोलीभाषा दिवस म्हणून साजरा करण्याची परंपरा या मंचाने सुरू केली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्याम ठक यांनी वऱ्हाडी बोलीभाषेवर प्रेम करणाऱ्या सर्व रसिकांनी या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार जाहीर

वऱ्हाडात आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षीप्रमाणे यंदाही गौरविण्यात येणार आहे. जाहीर झालेली पुरस्कार यादी खालीलप्रमाणे आहे:
जीवनगौरव पुरस्कार: हिम्मत ढाळे (अकोला) – साहित्य क्षेत्र
यलाई पुष्पराज गावंडे पुरस्कार: सौ. लता बहाकर (अकोट) – युवा वऱ्हाडी साहित्यिका
महिला वऱ्हाड रत्न पुरस्कार: सौ. शैला चेडे – स्व. सौ. सुमनबाई ठक स्मृतीप्रित्यर्थ
साहित्यसेवा पुरस्कार: श्रीराम वाघ (शेगाव)
पत्रकारिता पुरस्कार: उमेश अलोने
सामाजिक कार्य पुरस्कार: चंद्रकांत झटाले

मोठ्या प्रमाणात पुस्तकांचे प्रकाशन

अस्सल वऱ्हाडी कादंबरी भवरा – श्याम ठक,आंधळा राजा (नाटक) साधना काळबांडे ,मोर्णाकाठ (वऱ्हाडी ललित लेखसंग्रह) विद्या राणे ,तितिक्षा (काव्यसंग्रह) निलेश कवडे ,मनप्रवासी (प्रवास वर्णन) डॉ. मीना सोसे ,कुकाचं डाबलं (वऱ्हाडी कथासंग्रह) उषा भोपळे ,हार्ट टू हार्ट (वऱ्हाडी संवादकथा) निलेश देवकर ,चिरांगन (वऱ्हाडी दिवाई अंक) वानीचा हुरडा (संमेलन ईशेषांक)

जिल्हाधिकाऱ्यांची मोर्णा प्रकल्पाला भेट



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : मानवी जीवन आणि पशुधनासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. मोर्णा प्रकल्पाचा जलसाठा प्रामुख्याने पिण्यासाठी राखीव असून, पाण्याचा एकही थेंब वाया जाता कामा नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. शुक्रवारी (दि. २३) जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी पातूर नजिक असलेल्या मोर्णा प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन प्रकल्पातील उपलब्ध जलसाठा, पाण्याची गरज आणि भविष्यातील नियोजनाचा आढावा घेतला. या वेळी त्यांनी प्रकल्पाच्या परिसरातील स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणीही जाणून घेतल्या. बाळापूरचे उपविभागीय अधिकारी , उपविभागीय पोलीस अधिकारी, महावितरण आणि संबंधित प्रशासनाने पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात. तसेच पेयजलासाठी नदीतून पाईपलाईनद्वारे किंवा इतर पर्यायाने पाणी कसे पुरवायचे, याबाबतचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा, असे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

महत्त्वाचे

दिव्यांग निधी वाटपाची प्रक्रिया स्पष्ट करण्याची गरज

शेलूबाजार : स्थानिक स्वराज्य संस्थांकडून दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव असलेल्या पाच टक्के निधीच्या वाटपाबाबत सध्या संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. प्रशासनाने या प्रक्रियेसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असली, तरी प्रत्यक्ष लाभाबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने लाभार्थ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण आहे.दिव्यांग व्यक्तींना आर्थिक आधार देऊन स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने ही तरतूद करण्यात आली आहे. मात्र, पात्र लाभार्थ्यांची निवड, आवश्यक कागदपत्रे आणि वितरण प्रक्रियेची माहिती वेळेत मिळणे गरजेचे आहे. केवळ नियुक्त्या न करता पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत मदत पोहोचणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.संबंधित प्रशासनाने या निधी वाटपाची प्रक्रिया तातडीने जाहीर करावी, निवड प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी आणि कोणताही गरजू घटक या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा मंगरूळपीर पंचायत समितीचे माजी सभापती विलास लांभाडे यांनी व्यक्त केली आहे.

उंबर्डा बाजार येथे भक्तिमय वातावरणात दुर्गादेवीला निरोप

उंबर्डा बाजार : येथे नवरात्रोत्सवाचा समारोप आणि दुर्गादेवी विसर्जन सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात शांततेत पार पडला. मागील नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या या उत्सवात भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला. फटाक्यांची आतिषबाजी, डीजे आणि ढोल-ताशांच्या निनादात निघालेल्या विसर्जन मिरवणुकीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. गुलालाची उधळण करत निघालेली ही मिरवणूक शांततेत संपन्न झाली.

उंबर्डा बाजार येथे नवरात्रोत्सव साजरा करण्याची परंपरा यावर्षीही मोठ्या भक्तीभावाने जोपासण्यात आली. नऊ दिवसांच्या कालावधीत घटस्थापनेसह भजन, कीर्तन, पूजन, हवन आणि महाप्रसाद वितरण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विसर्जन मिरवणुकीत युवकांसोबतच महिलांनीही पारंपरिक गरबा खेळत उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यानंतर विधिवत पूजा आणि महाआरती करून दुर्गादेवीच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. मिरवणुकीदरम्यान भाजप नेते देवव्रत डहाके, अक्षय बापू देशमुख आणि राजू पाटील राऊत उपस्थित होते.

सोयाबीनची दुप्पट आवक होऊनही दर टिकून; तुरीच्या भावात किंचित चढ-उतार

सोयाबीन ७ हजार पार, तर तूर ९६०० रुपयांवर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



वाशिम: दि. २३ : स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत गेल्या आठवड्याभरात शेतमालाच्या आवकेत आणि दरांमध्ये महत्त्वपूर्ण बदल पाहायला मिळत आहेत. विशेषतः जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीन आणि तुरीच्या बाजारात मोठी हालचाल दिसून येत आहे. बाजार समितीतील आकडेवारीनुसार, सोयाबीनची आवक दुप्पट होऊनही दराने चांगली पातळी टिकवून ठेवली आहे, तर तुरीच्या कमाल दरात किंचित नरमाई आली असली तरी सरासरी दर नऊ हजार रुपयांच्या वर कायम आहेत.

सोयाबीन आवकेत दुप्पट वाढ, दर टिकून

बाजार समितीत १५ ऑक्टोबर रोजी सोयाबीनची आवक सुमारे ३५०० क्विंटल नोंदवली गेली होती. त्यानंतर २१ ऑक्टोबरला ४१०० क्विंटल, २२ ऑक्टोबरला ६५०० क्विंटल आणि २३ ऑक्टोबर रोजी ही आवक थेट ६८०० क्विंटलवर पोहोचली. आवक मोठ्या प्रमाणात वाढूनही दरात फार मोठी घसरण झालेली नाही. १५ ऑक्टोबर रोजी सर्वसाधारण सोयाबीनचे दर प्रति क्विंटल ६३२५ ते ७००० रुपये होते, ते २३ ऑक्टोबर रोजी ६५१० ते ७०६५ रुपयांपर्यंत नोंदवले गेले.

तसेच विविध वाणांच्या सोयाबीनलाही बाजारात चांगली पसंती मिळत आहे. ११३५ वाणाचे दर १५ ऑक्टोबरला कमाल ७८०१ रुपयांपर्यंत पोहोचले होते, ते २३ ऑक्टोबरला ६९३० ते ७४०० रुपयांच्या घरात राहिले. ९३०५ वाणाचे दरही ६८०० ते ७२०० रुपयांच्या दरम्यान स्थिरावले आहेत. आवक वाढल्यानंतरही सोयाबीनचे दर स्थिर राहिल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे.

तुरीच्या कमाल दरात किंचित नरमाई

तुरीच्या बाजारात गेल्या काही दिवसांत मर्यादित आवक पाहायला मिळाली. १५ ऑक्टोबर रोजी ३०० क्विंटल आवक असताना कमाल दर १०३७५ रुपयांपर्यंत पोहोचला होता. २१ ऑक्टोबर रोजी २५० क्विंटल आवक होऊन कमाल दर १००४१ रुपये राहिला. त्यानंतर २२ ऑक्टोबर रोजी ९३०० ते ९८५० रुपये आणि २३ ऑक्टोबर रोजी ३५० क्विंटल आवक असताना ९२०० ते ९६०० रुपये प्रति क्विंटल असा भाव मिळाला. कमाल दरात काही प्रमाणात घट झाली असली, तरी किमान दर नऊ हजार दोनशे रुपयांवर टिकून असल्याने तुरीचा बाजार अजूनही चांगल्या स्थितीत असल्याचे दिसून येत आहे.

इतर शेतमालाची स्थिती

बाजार समितीत इतर शेतमालाचीही आवक सुरळीत सुरू आहे. चण्याचे दर ६००० ते ७००० रुपयांच्या दरम्यान स्थिरावले आहेत. गव्हाच्या दरात हलकी सुधारणा पाहायला मिळाली असून २३ ऑक्टोबरला दर २४६० ते ३१५० रुपयांपर्यंत नोंदवले गेले. मुगाचे दर ७०१० ते ७७२५ रुपये, उडदाचे दर ७७५० ते ८७०० रुपये तर ज्वारीचे व्यवहार २००० ते २३५० रुपयांच्या पट्ट्यात झाले. बाजार समितीचे निरीक्षक उमेश मापारी यांनी या कालावधीतील अधिकृत बाजारभाव जाहीर केले आहेत.

खर्चही निघेना : आठ एकरांतील सोयाबीनवर फिरविला रोटावेटर



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा: दि. २३ :तालुक्यातील बेलोरा येथील महिला शेतकरी नीता मुंगशीराम उपाध्ये यांनी भुली शेतशिवारातील आठ एकर शेतातील उभ्या सोयाबीन पिकावर ट्रॅक्टरचलित रोटावेटर फिरवून पीक जमिनीत गाडले. पावसाअभावी पिकाला शेंगाच न लागल्याने आणि झालेला उत्पादन खर्चही भरून निघण्याची शक्यता नसल्याने त्यांनी हा निर्णय घेतला. तालुक्यात यंदा पावसाने मोठा खंड दिला. सुरुवातीला पेरणीयोग्य पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली होती. बेलोरा येथील नीता उपाध्ये यांनीही भुली शिवारातील आपल्या आठ एकर शेतात सोयाबीनची लागवड केली होती. बियाणे, खते, कीटकनाशक फवारणी आणि मजुरी असा मिळून त्यांनी आतापर्यंत सुमारे एक ते दीड लाख रुपयांहून अधिक खर्च केला होता. मात्र, पीक ऐन फुलोऱ्यात आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना पावसाने दीर्घ ओढ दिली. परिणामी झाडांना अपेक्षित शेंगा लागल्या नाहीत आणि ज्या लागल्या त्याही पोकळ राहिल्याने दाणे भरलेच नाहीत.

काढणीचा खर्च करूनही हाती काही पडणार नाही याची खात्री पटल्यानंतर उपाध्ये यांनी संपूर्ण आठ एकरांतील उभ्या पिकावर रोटावेटर फिरवला. पिकातून एक दाणाही पदरात पडला नाही. या भागातील पावसाच्या लहरीपणामुळे इतरही अनेक शेतकऱ्यांसमोर अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. महसूल व कृषी विभागाने या भागातील नुकसानीचे तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य व पीक विम्याची रक्कम मिळवून द्यावी, अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

काजळेश्वर येथे खातेदारांना किराणा किटचे मोफत वाटप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



काजळेश्वर : दि. २३ :कारंजा तालुक्यातील काजळेश्वर येथे दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एयू स्मॉल फायनान्स बँक आणि एयू फाऊंडेशनच्या वतीने खातेदारांना मोफत किराणा किटचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम २२ ऑक्टोबर रोजी स्थानिक अण्णाभाऊ साठे सभागृहात सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या उद्देशाने बँकेने आपल्या सीएसआर फंडातून खातेदारांना ही मदत उपलब्ध करून दिली. या उपक्रमाचे कौतुक करताना सरपंच नितीन पाटील उपाध्ये म्हणाले की, बँक केवळ आर्थिक व्यवहारांपुरती मर्यादित न राहता खातेदारांप्रती सामाजिक जाणीव जपत आहे, ही बाब कौतुकास्पद आहे. या स्वरूपातील सहकार्यामुळे बँक आणि खातेदार यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक सुदृढ होण्यास मदत होते. हा उपक्रम बँकेचे डिव्हिजनल मॅनेजर चंदू लेंगुरे, रिजनल मॅनेजर देवेंद्र उपाध्ये आणि ब्रांच मॅनेजर उमेश परमार यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत बँकेकडून मिळालेल्या या आधारामुळे खातेदारांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाला उपसरपंच तैसीम भाई मुल्लाजी, ग्रामपंचायत सदस्य देवीदास सावळे, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सुभाष उपाध्ये, गजानन गावंडे, बंटी पाटील उपाध्ये यांच्यासह बँकेचे खातेदार आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिजनल मॅनेजर देवेंद्र उपाध्ये यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ब्रांच मॅनेजर उमेश परमार यांनी केले.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त वाशिममध्ये दम्याच्या रुग्णांसाठी मोफत औषध वाटप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



वाशिम: दि. २३ : कोजागिरी पौर्णिमेनिमित्त शहरातील रिसोड रोडवरील पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्समधील ओंकार आयुर्वेद पंचकर्म चिकित्सालयाच्या वतीने दम्याच्या रुग्णांसाठी मोफत आयुर्वेदिक औषध वाटप करण्यात येणार आहे. आयुर्वेदाचार्य दिवंगत चंद्रलालजी कलंत्री यांच्या प्रेरणेतून गेल्या ७५ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही कायम राखण्यात आली आहे. तज्ज्ञ डॉक्टर पूजा निलेश राठी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जाणार असून रुग्णांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.ता. २५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या शिबिरासाठी तपासणीची वेळ सकाळी ११ ते दुपारी २ आणि संध्याकाळी ५ ते ७ अशी ठेवण्यात आली आहे. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास चिकित्सालयात दुधातून औषध दिले जाईल, तर औषध सेवनाची मुख्य वेळ रात्री १२:०० वाजताची राहील. औषधोपचाराचा पूर्ण लाभ मिळण्यासाठी रुग्णांनी या दिवशी कडक उपवास करावा. ज्यांना उपवास शक्य नाही, अशा वयोवृद्ध नागरिकांनी दुपारनंतर जेवण न करता केवळ चहा-पाणी अथवा फलाहार घ्यावा, तसेच रात्री औषध घेतल्यानंतर किमान दोन तास झोप घेऊ नये, असे नियम सांगण्यात आले आहेत.हे शिबिर १ ला मजला, सी विंग, इंडियन बँकेच्या वर, पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्स, रिसोड रोड, वाशिम येथे होणार असून गरजू नागरिकांनी अधिक माहितीसाठी ९९७५९४२६६४ किंवा ९८५०३८००८२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

मंचनपूरच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्याचे बुद्धिबळ स्पर्धेत घवघवीत यश!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



सावरा: दि. २३ : अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील मंचनपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी पियुष मारुती चव्हाण याने बुद्धिबळ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या यशाबद्दल मंचनपूर येथे शाळेच्या वतीने आणि ग्रामस्थांकडून त्याचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासोबतच इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.दि. २२ ऑक्टोबर रोजी वरुडजऊळका येथे आयोजित झोनस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत पियुषने यश मिळविले. या कामगिरीच्या जोरावर त्याची तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने मिळविलेल्या या यशामुळे मंचनपूर गावात आनंदाचे वातावरण आहे.पियुषच्या यशाचे कौतुक करण्यासाठी शाळेत सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही प्रगती करावी आणि पियुषच्या यशातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन उपस्थितांनी केले.यावेळी पवन चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करता येते, असे सांगितले. शाळेतील शिक्षक खडसे सर यांनीही पियुषच्या यशाचे कौतुक केले. शाळेतील विद्यार्थ्यांने बुद्धिबळ स्पर्धेत पुढील स्तरावर मजल मारल्याचा अभिमान व्यक्त करत इतर विद्यार्थ्यांनीही विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले.शाळेचे मुख्याध्यापक कळंबे सर यांनी पियुषचे अभिनंदन करून त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी श्रीयस चौधरी, संतोष चव्हाण, मनोहर धांडे, पवन चौधरी आणि पत्रकार निलेश वानखडे यांच्या उपस्थितीत पियुषचा सत्कार करण्यात आला.

लाचखोर पोलीस उपनिरीक्षकास तीन वर्षे सक्तमजुरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मंगरुळपीर: दि. २३ : ताब्यात असलेल्या मित्राला सोडण्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी करून ती स्वीकारल्याच्या प्रकरणात मंगरुळपीर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने निकाल दिला आहे. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक (वर्ग-२) वैभव दामोदर पराते (वय ४० वर्षे, रा. त्रिशरण नगर, सोमलवार हायस्कूल समोर, नागपूर) यास भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये तीन वर्षे सक्तमजुरी आणि २५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती पी. एस. काळे यांनी २२ ऑक्टोबर २०२६ रोजी हा आदेश दिला.या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, १२ एप्रिल २०१६ रोजी तक्रारदार ज्ञानू तुळशीराम भदांगे यांच्या मित्रावर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्याला मंगरुळपीर पोलीस ठाण्यात ताब्यात घेण्यात आले होते. त्याला सोडण्यासाठी तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक वैभव पराते यांनी तक्रारदाराकडे १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ही रक्कम ५ हजार रुपये ठरली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. पडताळणी दरम्यान आरोपीने ३ हजार रुपये स्वीकारले व उर्वरित २ हजार रुपयांची मागणी केली. त्यानंतर २५ एप्रिल २०१६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून आरोपी वैभव पराते यास पोलीस ठाण्यातील दालनात उर्वरित २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले होते. या प्रकरणी मंगरुळपीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते.प्रकरणाचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे तत्कालीन तपास अधिकारी राहुल विष्णू गांगुर्डे यांनी केला.

खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता (एपीपी) एस. के. गिमेकर यांनी बाजू मांडली, . सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाच्या वतीने एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये तक्रारदार , पंच साक्षीदार , तपास अधिकारी राहुल गांगुर्डे तसेच तांत्रिक पुरावे हाताळणारे पोलीस साक्षीदार आतिश काळमुंदळे आणि गजानन अवगळे यांची साक्ष महत्त्वाची ठरली. पडताळणी व कारवाईच्या वेळी उपस्थित असलेले मुख्य पंच साक्षीदार अविनाश चव्हाण यांचे निधन झाल्याने त्यांची साक्ष नोंदवता आली नाही; मात्र इतर साक्षीदार आणि फॉरेन्सिक अहवालांच्या आधारे सरकारी पक्षाने आरोप सिद्ध केले.न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि अभिलेखावरील पुरावे ग्राह्य धरून वैभव पराते यास दोषी ठरवले. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ अंतर्गत तीन वर्षे सक्तमजुरी व २० हजार रुपये दंड, तसेच कलम १३(२) सह १३(१)(ड) अंतर्गत एक वर्ष सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दोन्ही शिक्षा एकाच वेळी भोगावयाच्या असून, दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त साध्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

हालचालींना वेग | ठिय्या आंदोलनाला सर्वपक्षीय पाठिंबा!

मूर्तिजापूर बायपासवरील पथदिव्यांचा प्रश्न मार्गी लागण्याच्या आशा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



मूर्तिजापूर : दि. २३ : मूर्तिजापूर-कारंजा राष्ट्रीय महामार्गावरील बायपासवर बंद असलेले पथदिवे सुरू करण्याच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेल्या ठिय्या आंदोलनाला सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली असून, संबंधित विभागांच्या कार्यालयांत तातडीच्या बैठका सुरू झाल्या आहेत. त्यामुळे बायपासवरील पथदिव्यांचा प्रश्न मार्गी लागण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत.मूर्तिजापूर बायपासवरील पथदिवे सुरू झाल्यास रात्रीच्या वेळी वाहनचालक आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या पथदिवे बंद असल्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेता बायपासवरील सर्व पथदिवे तातडीने सुरू करावेत, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

बायपासवरील पथदिव्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अमरावती कार्यालयासह मूर्तिजापूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, हातगाव ग्रामपंचायत कार्यालय आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मूर्तिजापूर येथील उपविभागीय अभियंता कार्यालयात तातडीच्या बैठका सुरू झाल्याचे आंदोलकांनी सांगितले.विविध विभागांमध्ये सुरू झालेल्या या हालचालींमुळे पथदिव्यांचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दिवाळीपूर्वी पथदिवे सुरू झाल्यास बायपासवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसह स्थानिक रहिवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.बायपासवरील पथदिव्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सुरू झालेल्या आंदोलनाला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी पाठिंबा दिला आहे.

यामध्ये माजी सैनिक सुरेश जोगळे, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू पाटील तिडके, शेतकरी संघटनेचे समन्वयक अरविंद तायडे, ज्येष्ठ नागरिक तथा बायपास रहिवासी सुभाष टाले, संभाजी ब्रिगेडचे विभागीय कार्याध्यक्ष संजय गुप्ता, शिवसेनेचे सुधाकर गोपकर, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे प्रदीप डांगे, विशाल तायडे, माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे, समाजसेवक कैलास महाजन आणि बाळासाहेब खांडेकर यांच्यासह अनेक सहकारी व ग्रामस्थांचा समावेश आहे. विविध पक्ष आणि संघटनांनी एकत्र येत नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची भूमिका घेतल्याने या आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे.दिवाळीपूर्वी बायपासवरील पथदिवे सुरू करण्याबाबतचे लेखी आदेश मिळावेत, अशी आंदोलकांची मागणी आहे. यासंदर्भात ठोस निर्णय होऊन प्रत्यक्ष कार्यवाही झाल्यानंतरच आंदोलनाबाबत पुढील भूमिका घेतली जाईल, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.बायपासवरील पथदिवे सुरू झाल्यास रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्ता स्पष्ट दिसण्यास मदत होईल. तसेच स्थानिक नागरिक आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे.

नागरिकांच्या मागणीला मिळतोय सकारात्मक प्रतिसाद

मूर्तिजापूर बायपासवरील पथदिव्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वपक्षीय संघटना आणि नागरिकांनी एकजुटीने पुढाकार घेतला आहे. आंदोलनाची प्रशासनाने दखल घेऊन विविध विभागांत बैठका सुरू केल्याने प्रश्नाच्या निराकरणाच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.दिवाळीपूर्वी बायपासवरील पथदिवे सुरू होऊन नागरिकांना प्रकाशाचा दिलासा मिळावा, हीच आंदोलकांसह मूर्तिजापूरकरांची अपेक्षा आहे. आता संबंधित विभागांच्या बैठकीतून कोणता निर्णय होतो आणि प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला : दि. २३ : स्थानिक बिर्ला कॉलनी येथील स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये भारताचे माजी राष्ट्रपती तथा 'भारतरत्न' डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाचे महत्त्व रुजविणे आणि त्यांच्यात पुस्तकांविषयी आवड निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. श्वेता दीक्षित होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून मेघा कुळकर्णी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याचे आणि त्यांच्या वाचनप्रेमाचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले.वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे वाचन करून वाचनाचा आनंद घेतला. तसेच, डॉ. कलाम यांचे विचार आणि वाचनाचे महत्त्व याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. 'पुस्तके ही माणसाची खरी मित्र असतात,' हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका डॉ. श्वेता दीक्षित म्हणाल्या की, वाचनामुळे कल्पनाशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि दूरचित्रवाणीच्या अतिवापरापासून दूर राहून नियमित वाचनाची सवय अंगीकारावी.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या ग्रंथपाल सोनाली यदू यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे पालकांनी कौतुक केले.

महत्त्वाचे

प्रसिद्ध हास्यकवी हिंमत ढाळे यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर



अकोला : अंकुर साहित्य संघाचे राज्याध्यक्ष, प्रसिद्ध हास्यकवी आणि जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, पैसाळी येथील सहायक शिक्षक हिंमत किसनराव ढाळे यांना त्यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. वऱ्हाडी साहित्य मंचाच्या वतीने दिला जाणारा हा पुरस्कार साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठेचा सन्मान मानला जातो. हिंमत ढाळे यांनी शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ते अंकुर साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. आपल्या विनोदी शैलीतून रसिकांना खळखळून हसविणारे त्यांचे 'येऊन बसा अन् खदखद हसा' हे दोन तासांचे विनोदी सादरीकरण विशेष लोकप्रिय आहे. या कार्यक्रमाचे आतापर्यंत एक हजारांहून अधिक प्रयोग झाले आहेत. वऱ्हाडी भाषेचा गोडवा, विनोदाची अनोखी शैली आणि प्रभावी सादरीकरणाच्या माध्यमातून त्यांनी रसिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. साहित्य, हास्यविनोद आणि सामाजिक प्रबोधनाच्या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आठव्या अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते हिंमत ढाळे यांना हा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

मूर्तिजापूर मतदान केंद्रावर ९५.७३ टक्के मतदान

मूर्तिजापूर : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर रोजी मूर्तिजापूर येथील मतदान केंद्रावर शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पडले. सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या मतदान प्रक्रियेत शिक्षक मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याने प्रक्रिया सुरळीत पार पडली. मूर्तिजापूर येथील तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार यांच्या दालनात उभारण्यात आलेल्या मतदान केंद्र क्रमांक ३७ वर एकूण ४४५ मतदारांपैकी ९५.७३ टक्के मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे, महिला मतदारांचा सहभाग ९६.६४ टक्के इतका नोंदविण्यात आला. महिला शिक्षकांनीही मोठ्या संख्येने मतदानात सहभाग घेतला. सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

वंचित बहुजन आघाडीत संघटनात्मक फेरबदलाचे संकेत; अकोला जिल्ह्यात नव्या नेतृत्वाला संधी मिळण्याची अपेक्षा!

युवक आघाडी बरखास्तीनंतर जिल्हा कार्यकारणीच्या पुनर्रचनेची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



अकोट, दि. २३ : वंचित बहुजन आघाडीने अकोला जिल्ह्यातील युवक आघाडी २२ ऑक्टोबर रोजी बरखास्त केल्यानंतर आता जिल्ह्यात संघटनात्मक फेरबदलाच्या चर्चेला वेग आला आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची जिल्हा कार्यकारणी आणि तालुकास्तरीय समित्यांची पुनर्रचना करून नव्या, उत्साही आणि सक्रिय कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी मागणी पक्षातील काही पदाधिकाऱ्यांकडून होत आहे. या संभाव्य बदलांमुळे जिल्ह्यात पक्षसंघटनेला नवी दिशा आणि ऊर्जा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.वंचित बहुजन आघाडीसाठी अकोला जिल्हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या दृष्टीने संघटन अधिक मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि जनसामान्यांपर्यंत पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचविणे आवश्यक असल्याचे मत पक्षातील काही पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



अकोट शहरात नव्या कार्यकारणीची अपेक्षा : अकोट शहरातील वंचित बहुजन आघाडीची कार्यकारणी गेल्या पाच ते सात वर्षांपासून पुनर्गठित करण्यात आलेली नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे नव्या कार्यकर्त्यांना संघटनेत जबाबदारी देऊन त्यांना काम करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संघटनेत नियमित बदल आणि नव्या नेतृत्वाला संधी मिळाल्यास कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढण्यास मदत होऊ शकते. तसेच युवक, महिला आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांना संघटनात्मक जबाबदाऱ्या दिल्यास पक्षाचा जनसंपर्क अधिक व्यापक होऊ शकतो. अकोट शहरासह संपूर्ण जिल्ह्यात संघटनात्मक पुनर्रचना झाल्यास पक्षाच्या कामकाजाला होत आहे.

जिल्हा परिषद निवडणुकांसाठी संघटन बळकटीकरणावर भर

आगामी जिल्हा परिषद निवडणुका लक्षात घेता वंचित बहुजन आघाडीने आतापासूनच संघटनात्मक तयारीला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील प्रश्न समजून घेणारे, जनतेशी सातत्याने संपर्क ठेवणारे आणि स्थानिक पातळीवर सक्रिय असणारे कार्यकर्ते संघटनेत पुढे आल्यास पक्षाला निवडणुकीच्या दृष्टीने फायदा होऊ शकतो. यासाठी जिल्हा कार्यकारणी, तालुका समित्या आणि शहर कार्यकारण्यांचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल करावेत. नव्या कार्यकर्त्यांना संधी देतानाच अनुभवी पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन संघटनेत समन्वय निर्माण करावा, अशी भूमिका काही पदाधिकाऱ्यांकडून मांडली जात आहे.

अधिक गती मिळण्याची शक्यता आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेऊन आगामी निवडणुकांसाठी नव्याने रणनीती आखण्याची संधी पक्षासमोर आहे. या प्रक्रियेत कार्यकर्त्यांच्या सूचना, स्थानिक प्रश्न आणि जनतेच्या अपेक्षा विचारात घेतल्यास संघटनेला अधिक सक्षम करण्यास मदत होऊ शकते. अकोला जिल्ह्यातील युवक आघाडी बरखास्त झाल्यानंतर आता मुख्य जिल्हा कार्यकारणीच्या पुनर्रचनेबाबत पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व काय भूमिका घेते, याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील संघटनात्मक रचना अधिक प्रभावी करण्यासाठी फेरबदल केले जाणार का, अकोटसह इतर तालुक्यांमध्ये नव्या पदाधिकाऱ्यांना संधी मिळणार का आणि आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या तयारीसाठी कोणती रणनीती आखली जाणार, याबाबत उत्सुकता आहे. संघटनात्मक बदल ही पक्षासाठी नव्या संधीची सुरुवात ठरू शकते. अनुभवी नेतृत्वाचा अनुभव आणि नव्या कार्यकर्त्यांचा उत्साह यांची सांगड घातल्यास वंचित बहुजन आघाडीला अकोला जिल्ह्यात संघटनात्मक बळ वाढविण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे आगामी काळात पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व कोणते निर्णय घेते आणि त्यातून जिल्ह्यातील संघटनेला कोणती नवी दिशा मिळते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

फ्रीडम स्कूलचा शिवम कतोरे योगासन क्रीडा स्पर्धेत राज्यस्तरावर



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : स्थानिक गजानन नगर येथील फ्रीडम इंग्लिश हायस्कूलमधील इयत्ता सहावीचा विद्यार्थी शिवम मोहन कतोरे याने योगासन क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. यवतमाळ येथे पार पडलेल्या विभागीय योगासन क्रीडा स्पर्धेत शिवमने सुवर्णपदक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ येथील अमोलचंद महाविद्यालयात विभागीय योगासन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत फ्रीडम इंग्लिश हायस्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.या स्पर्धेत १४ वर्षांखालील वयोगटात शिवम मोहन कतोरे याने सुवर्णपदक, तर १९ वर्षांखालील वयोगटात कृष्णाल कुणाल कुलट याने रौप्यपदक पटकावले. शिवमने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर राज्यस्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेत स्थान मिळवले आहे. आगामी राज्यस्तरीय स्पर्धेत तो फ्रीडम इंग्लिश हायस्कूलसह अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. शिवम हा शारीरिक शिक्षण शिक्षक दीपक ससाने, योग प्रशिक्षक विक्रांत चंदनशिव आणि क्रीडा प्रशिक्षक आशुतोष पोहरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करीत आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिवमने ही यशस्वी कामगिरी केली.

शिवमच्या या यशाबद्दल फ्रीडम संस्थेचे अध्यक्ष मनोज झाडे, शाळा समितीचे अध्यक्ष प्रवीण झाडे, संचालिका अश्विनी झाडे, मुख्याध्यापिका अरुणा टाले यांनी त्याचे अभिनंदन केले.

सुरक्षित बालपण अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणात बैठक संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि २३ : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'सुरक्षित बालपण अभियान' अंतर्गत २६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने २२ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश दीनानाथ दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली




ही बैठक पार पडली. बैठकीत सुरक्षित बालपण अभियानाची उद्दिष्टे, बालकांचे संरक्षण व हक्क, बालकांवरील अत्याचार आणि शोषण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, तसेच शाळांमध्ये अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये बालहक्क, बालसुरक्षा आणि बालकांवरील अन्याय व अत्याचार यांविषयी जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच, बालकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या विविध यंत्रणांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे, याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीला बाल कल्याण समिती, महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत विविध यंत्रणांचे अधिकारी व प्रतिनिधी, शिक्षण विभागाचे प्रतिनिधी तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करून हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

२६ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान जनजागृती

२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये बालकांच्या सुरक्षिततेसंदर्भात जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. बालकांना सुरक्षित, भयमुक्त आणि बालस्नेही वातावरण मिळावे, तसेच त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.
- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला

मुंडगाव येथील मरीमातेच्या मंदिरात महाप्रसादाचे आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



मुंडगाव, दि २३ : अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील मरीमातेच्या मंदिरात आयोजित महाप्रसादाचा अनेक भाविकांनी लाभ घेतला. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात नऊ दिवस दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत होती. भाविकांना मरीमातेचे सुलभतेने दर्शन घेता यावे, यासाठी मंदिराचे अध्यक्ष रमेश गाढे यांनी विशेष व्यवस्था केली होती. त्यामुळे नऊही दिवस भाविकांना मरीमातेचे दर्शन घेता आले.मरीमातेच्या महाप्रसादाचे आयोजन २२ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार होते. मात्र, त्या दिवशी बारस असल्याने तसेच भाविकांच्या आग्रहास्तव मंदिराचे अध्यक्ष आणि व्यवस्थापन मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन २३ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. शुक्रवारी, २३ रोजी सकाळी ११ वाजता महाप्रसाद वितरणाला सुरुवात झाली. अनेक भाविकांनी सहभागी होत महाप्रसादाचा लाभ घेतला.यावेळी मंदिराचे अध्यक्ष रमेश गाढे, उपसरपंच अनिल गाढे, रमेश सोनटक्के, सुपिनाथ महाराज संस्थानचे अध्यक्ष गजानन वारकरी, रमेश आखरे, गोमासे, रमेश भेले, श्रीकृष्ण सुलताने, माणिक बहाकार, दीपक रोठे, नरेश दहिभात, दीपक राठी, चारुदत्त पाचकोर, शेख अफसर, जुगलकिशोर मल्ल, शिवदास सरकटे, दादू गणोरकर यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

सेंट पॉल्स अॅकडमी येथे व्यक्तिमत्त्व विकास व करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



अकोट, दि २३ : स्थानिक सेंट पॉल्स अॅकडमी येथे इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांसाठी 'व्यक्तिमत्त्व विकास व करिअर मार्गदर्शन' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, जिज्ञासू वृत्ती आणि आध्यात्मिकता या गुणांचा अंगीकार करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे, असे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष लूनकरणजी डागा, सचिव प्रमोदजी चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटिया, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, सीए नीरज राठी, अॅड. करुणा राठी आणि ओजस राठी उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, रामेश्वर पातोंड, मुख्याध्यापिका ममता श्रावगी आणि रिंकू अग्रवाल यांचीही मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांचे कुमकुम तिलक लावून स्वागत, दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली.

उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी सीए नीरज राठी यांचा संस्थाध्यक्षांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. ओजस राठी यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सतीश ठोकळ यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला आणि सीए नीरज राठी यांचा परिचय करून दिला.

चान्नी पोलिसांची अवैध दारूविरोधात मोठी कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



दिग्रस बु., दि २३ : चान्नी पोलिसांनी अवैध हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सडव्याविरोधात दोन स्वतंत्र कारवाया करत एकूण ७२ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २२ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस स्टेशन चान्नीच्या हद्दीत करण्यात आली. या प्रकरणी दोघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पंचांसमक्ष छापे टाकण्यात आले. या कारवाईदरम्यान अवैधरीत्या गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेला सडवा मोहा आणि तयार दारू असा मोठ्या प्रमाणात मुद्देमाल आढळून आला.पहिल्या कारवाईत शेख अमीर शेख जमीर (वय ३८, व्यवसाय मजुरी, रा. सस्ती, ता. पातूर, जि. अकोला) याच्या ताब्यातून २५ पत्र्यांच्या डब्यांमध्ये प्रत्येकी १० लिटरप्रमाणे एकूण २५० लिटर सडवा मोहा आढळून आला. त्याची अंदाजे किंमत ३७ हजार ५०० रुपये आहे. याशिवाय १५ लिटर गावठी हातभट्टीची दारू, किंमत तीन हजार रुपये, असा एकूण ४० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत शेख जाहीर शेख जमीर (वय ४०, व्यवसाय मजुरी, रा. सस्ती, ता. पातूर, जि. अकोला) याच्या ताब्यातून २० पत्र्यांच्या डब्यांमध्ये प्रत्येकी १० लिटरप्रमाणे एकूण २०० लिटर सडवा मोहा आढळून आला. त्याची किंमत ३० हजार रुपये आहे. तसेच १० लिटर गावठी हातभट्टीची दारू, किंमत दोन हजार रुपये, असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ४५० लिटर सडवा मोहा आणि २५ लिटर गावठी हातभट्टीची दारू असा एकूण ७२ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पंचांसमक्ष मुद्देमालाचे नमुने घेण्यात आले. त्यानंतर उर्वरित सडवा मोहा व इतर नाशवंत मुद्देमालाचा नियमानुसार नाश करण्यात आला.या दोन्ही प्रकरणांत संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५ (क), ६५ (ड) आणि ६५ (फ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत प्रभारी ठाणेदार, पोलीस उपनिरीक्षक धनराज देवर्जनकर, पोलीस हवालदार रवी घुगे, पोलीस अंमलदार राहुल महाजन आणि शिवाजी कालवे यांनी सहभाग घेतला.

गैरसोय

पेट्रोल पंप बंद तरीही संबंधित यंत्रणा गप्प का?

पिंजरमध्ये दोन पेट्रोल पंप, तरीही इंधनासाठी ग्राहकांची वणवण!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पिंजर, दि २३ : पिंजर गावात दोन पेट्रोल पंप असतानाही वाहनधारकांना पेट्रोल आणि डिझेलसाठी इतरत्र भटकंती करावी लागत असेल, तर या सुविधांचा उपयोग काय? पिंजर येथील जयस्वाल यांच्या मालकीचे असल्याचे समजले जाणारे दोन्ही पेट्रोल पंप वारंवार बंद राहत असल्याची तक्रार समोर येत आहे. त्यामुळे वाहनधारकांची मोठी गैरसोय होत असून, अधूनमधून उद्भवणारी ही समस्या आता ग्राहकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. गरजेच्या वेळी पेट्रोल पंप बंद आढळत असल्याने नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत. गावात दोन पेट्रोल पंप असतानाही इंधन मिळण्याची खात्री नसेल, तर ग्राहकांनी जायचे तरी कुठे, असा सवाल उपस्थित होत आहे.

पिंजर हे परिसरातील महत्त्वाचे गाव असून, आजूबाजूच्या गावांतील नागरिकांचीही येथे मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. शेतकरी, शेतमजूर, नोकरदार, व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात दुचाकी व चारचाकी वाहनांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे पेट्रोल पंप ही अत्यावश्यक सुविधा ठरते. मात्र, गावातील दोन्ही पेट्रोल पंप वारंवार बंद राहत असल्याने ग्राहकांना ऐनवेळी पर्यायी व्यवस्था शोधावी लागत आहे.

पेट्रोल भरण्यासाठी पंपावर पोहोचल्यानंतर तो बंद असल्याचे समजणे, त्यानंतर दुसऱ्या पंपावर जाणे आणि तेथेही इंधन उपलब्ध नसल्यास पुन्हा अन्यत्र धाव घेणे, असा त्रासदायक प्रकार ग्राहकांना सहन करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. एकाच गावात दोन पेट्रोल पंप असतानाही ग्राहकांना वारंवार अशा गैरसोयीचा सामना का करावा लागतो, याचे उत्तर संबंधित व्यवस्थापनाने देणे आवश्यक आहे. दोन्ही पेट्रोल पंप अधूनमधून बंद राहत असल्यामागील नेमके कारण काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इंधनाचा पुरवठा वेळेवर होत नाही का? इंधनसाठ्याचे नियोजन योग्य प्रकारे केले जात नाही का? तांत्रिक अडचणी आहेत की व्यवस्थापनातील काही त्रुटी? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप समोर आलेली नसल्याने



नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे.पेट्रोल पंप बंद राहण्यामागे विविध कारणे असू शकतात. मात्र, वारंवार अशी परिस्थिती निर्माण होत असेल, तर संबंधित व्यवस्थापनाने वस्तुस्थिती स्पष्ट करणे आणि समस्या दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित आहे. ग्राहकांना गरजेच्या वेळी इंधन उपलब्ध होणे ही त्यांची रास्त अपेक्षा आहे. त्यासाठी नियमित इंधनपुरवठा आणि योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे.इंधनाअभावी वाहन थांबणे म्हणजे केवळ काही मिनिटांचा विलंब नव्हे. कामावर जाणारे कर्मचारी, शेतात जाणारे शेतकरी, विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जाणारे पालक तसेच तातडीच्या कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही याचा फटका बसू शकतो. विशेषतः आपत्कालीन परिस्थितीत इंधन उपलब्ध नसल्यास अडचणी अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.पेट्रोल पंप सुरू असल्याची खात्री नसल्याने ग्राहकांना आपल्या दैनंदिन कामांचे नियोजन बदलावे लागत असेल, तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. पेट्रोल पंप ग्राहकांच्या सोयीसाठी आहेत की ग्राहकांनीच पंपांच्या उपलब्धतेनुसार आपले नियोजन बदलावे, असा सवाल या परिस्थितीमुळे उपस्थित होत आहे.

मात्र, पेट्रोल पंप बंद राहण्यामागील नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नसल्याने कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यवस्थापनाला दोषी ठरवणे योग्य ठरणार नाही. संबंधित पंपचालकांची बाजू समोर येणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून ग्राहकांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. एकाच गावात दोन पेट्रोल पंप असूनही वाहनधारकांना इंधनासाठी भटकंती करावी लागत असेल, तर ही बाब संबंधित व्यवस्थापन आणि तेल कंपन्यांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. ग्राहकांना नियमितपणे इंधन उपलब्ध व्हावे, पंप बंद असल्यास त्याची स्पष्ट माहिती मिळावी आणि वारंवार उद्भवणाऱ्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा, हीच वाहनधारकांची अपेक्षा आहे.

तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे!

पिंजर येथील दोन्ही पेट्रोल पंप वारंवार बंद राहत असल्याच्या तक्रारींची संबंधित तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी दखल घेणे आवश्यक आहे. पंप बंद राहण्याची कारणे, इंधनपुरवठ्याची स्थिती आणि ग्राहकांना सेवा देण्याच्या व्यवस्थेची वस्तुस्थिती तपासली जावी. आवश्यक असल्यास संबंधित यंत्रणेने प्रत्यक्ष पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
बुलडाणा, शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६

उभी पिके वाचविण्यासाठी किमान दोन वेळा पाणी द्या

रविकांत तुपकरांचे जिल्हाधिकारी कार्यालयापुढे आक्रमक आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि. २३ : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतातील उभी तूर, हळद आणि अन्य पिके वाचवण्यासाठी ७० टक्क्यांपेक्षा अधिक पाणीसाठा असलेल्या धरणांच्या परिसरातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन किंवा स्प्रिंकलरद्वारे किमान दोन वेळा पाणी देण्याची परवानगी द्यावी, अशी आक्रमक मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली.

२२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांसह निदर्शने केल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. दुष्काळामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून आगामी रब्बी हंगामही संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतात उभी असलेली तूर, हळद आणि अन्य पिके वाचवण्यासाठी मर्यादित पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. धरणातील संपूर्ण पाणी शेतीसाठी सोडण्याची मागणी नसून उपलब्ध पाण्याचे नियोजन करून किमान दोन वेळा ठिबक किंवा स्प्रिंकलरद्वारे सिंचनाची संधी द्यावी. तसेच जनावरांसाठी चारा पिकविण्यासही परवानगी द्यावी, असे तुपकर यांनी स्पष्ट



केले. या मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले. वीज कनेक्शन तोडण्याची कारवाई थांबवा! दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरसकट वीज कनेक्शन तोडण्याची कारवाई करू नये. जळालेले रोहित्र तातडीने दुरुस्त करून बसवावेत, अशी मागणीही त्यांनी केली. कर्जमाफीच्या प्रक्रियेतील गोंधळामुळे नवीन पीककर्ज मिळण्यात अडचणी येत असून सीबिलच्या कारणावरून शेतकऱ्यांना कर्ज नाकारू नये, असे त्यांनी सांगितले. पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, २०१९ पूर्वीच्या कर्जाशी संबंधित पात्र शेतकऱ्यांसह पुनर्गठित व रूपांतरित कर्ज घेतलेल्यांचाही समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली. शेतमजुरांना एक लाखांची मदत द्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे अनुदान द्यावे, भूमिहीन शेतमजुरांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत करावी, तसेच ठोक्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या प्रत्यक्ष पीक उत्पादकांनाही नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी तुपकर यांनी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम वेळेत मिळावी, यासाठी प्रशासनाने पाठपुरावा करावा, असेही त्यांनी नमूद केले. याशिवाय दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांवरील मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी पतसंस्थांच्या वसुलीचा ताण कमी करावा, व्याजाबाबत सवलत द्यावी आणि थकबाकीमुळे सीबिल खराब होऊ नये, यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. यावेळी देविदास कनखर, विनायक सरनाईक, एकनाथ पाटील, अमोल मोरे, हरिदास उबरहंडे, राजू थुट्टे, मधुकर थुट्टे, अवचित थुट्टे, कडुबा मोरे, रामेश्वर परिहार, रवीराज टाले, राजेश थुट्टे, नरहरी थुट्टे, नामदेवराव थुट्टे, एकनाथ बंगाळे, शंकर पैठणे, अंकुश थुट्टे, भानुदास थुट्टे, विलास बंगाळे, सुभाष घूबे, भागवत थुट्टे, विष्णू थुट्टे, रामेश्वर मुंढे, संतोष डोईफोडे यांच्यासह

महत्त्वाचे

अल्पवयीन मुलीचा विनयभंग पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

संग्रामपूर : अल्पवयीन मुलीला प्रेम करण्यासाठी दबाव टाकून जीवे मारण्याची धमकी दिल्याची तसेच तिचा विनयभंग केल्याची घटना २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी तामगाव पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध पॉक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस कडून मिळालेल्या माहितीनुसार १५ वर्षीय मुलगी शाळेतून मैत्रिणीसोबत घरी जात असताना आरोपी मोटारसायकलवरून आला. त्याने मुलीला थांबवून प्रेम करण्याबाबत दबाव टाकला. प्रेमास होकार न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तसेच मुलीचा हात वाईट उद्देशाने पकडून विनयभंग केला आणि मोटारसायकलवर बसण्याची जबरदस्ती केली. मुलीने हात सोडवून तेथून घरी जाणे पसंत केले. या प्रकरणी तामगाव पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ३८३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ७५, ३५१(२) तसेच पॉक्सो कायद्यातील कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बोपटे तपास करीत आहे.

पेट्रोल पंपावरील युवकावर लोखंडी रॉडने हल्ला

खामगाव : पंपावर पेट्रोल भरण्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून २० ते २५ अनोळखी इसमांच्या टोळक्याने एका २५ वर्षीय युवकाला लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना अमडापूर ते उदयनगर रस्त्यावरील पेट्रोल पंपावर घडली आहे. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून अमडापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगरूळ नवघरे येथील रहिवासी व सध्या छत्रपती संभाजीनगर येथे राहणारा तरुण स्वप्निल गजानन लहाने (२५) हा २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:३० वाजताच्या सुमारास अमरापूर-उदयनगर रोडवरील पेट्रोल पंपावर आपल्या दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी गेला होता. त्यावेळी पेट्रोल भरण्याच्या क्षुल्लक कारणावरून तेथे उपस्थित असलेल्या काही जणांसोबत स्वप्निलचा वाद झाला. पाहता पाहता तेथे २० ते २५ अनोळखी इसमांचे टोळके बेकायदेशीरपणे एकत्र जमले. हातात लोखंडी रॉड घेऊन आलेल्या या टोळक्याने स्वप्निलवर तुटून पडत त्याला अश्लील शिवीगाळ केली आणि लोखंडी रॉडने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे पेट्रोल पंपावर एकच पळापळ व भीतीचे वातावरण पसरले होते. घटनेनंतर जखमी स्वप्निल लहाने याने अमडापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्याच्या तक्रारीवरून अमडापूर पोलिसांनी २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी उपरोक्त आरोपीविरुध्द कलम ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३), १९१, ११५(२), ३५२, १५१ (३) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे २० ते २५ अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एएसआय सुमेरसिंग ठाकूर करीत आहे.

आईसह दोन चिमुकले बेपत्ता; परिसरात खळबळ

खामगाव : शहरातील गोपाळनगर परिसरातून एक २३ वर्षीय तरुण विवाहित महिला आपल्या अवघ्या चार वर्षांच्या मुलीसह आणि बारा महिन्यांच्या चिमुकल्या मुलासह अचानक निघून गेल्याची आणि घरी परत न आल्याची घटना समोर आली आहे. मुलांची कटिंग करण्यासाठी जाते असे सांगून घराबाहेर पडलेली ही मायलेकरे बेपत्ता झाल्याने परिसरात मोठी चिंता व्यक्त होत असून, अज्ञात व्यक्तीने त्यांचे अपहरण केल्याच्या संशयावरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खामगावमर्धाल गोपाळनगर येथील रहिवासी सौ. रेखा गजानन कापडे (५०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची मुलगी सौ. दिपाली नरेंद्र मुळे (वय अंदाजे २३) ही २२ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास मुलगी कु. शीवन्या नरेंद्र मुळे (४) व शीवांश नरेंद्र मुळे (१२ महिने) यांची कटिंग करून लगेच परत येते असे घरी सांगून आपल्या दोन चिमुकल्या मुलांसह बाहेर पडली होती. मात्र, बराच वेळ उलटूनही ती व तिची दोन्ही मुले घरी परतली नाही. कुटुंबीयांनी नातेवाईकांकडे व परिसरामध्ये त्यांचा इकडेतिकडे कसून शोध घेतला, परंतु त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही. आपली मुलगी आणि दोन लहान नातवंडांना कुणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याचा संशय असल्यामुळे आजी सौ. रेखा कापडे यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

डीजे-ढोलताशांना फाटा; टाळ-मृदंगाच्या गजरात दुर्गा विसर्जन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

मेहकर दि. २३ : सण-उत्सवांच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्याची परंपरा जपत आदिशक्ती नवदुर्गा उत्सव मंडळ, मेहकर यांच्या वतीने यंदा दुर्गा विसर्जन सोहळा अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. विसर्जन मिरवणुकीतील डीजे, ढोल-ताशांच्या गजराला फाटा देत टाळ-मृदंगाच्या भक्तिमय नादात मिरवणूक काढून मंडळाने समाजासमोर वेगळा आदर्श ठेवण्याचा प्रयत केला.

या उपक्रमाची मेहकर शहरात चर्चा सुरू आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत मंडळाच्या वतीने नारीशक्तीचे महत्व अधोरेखित करणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. महिलांची क्षमता, आत्मविश्वास, स्वावलंबन आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान याविषयी जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून समाजाच्या प्रगतीची महत्वपूर्ण शक्ती आहे, हा विचार विविध उपक्रमांच्या माध्यमातून मांडण्यात आला. नवरात्रोत्सव म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नसून तो स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याची आणि समाजात सकारात्मक विचार रुजविण्याची संधी आहे, ही भूमिका मंडळाने आपल्या उपक्रमातून अधोरेखित केली. देवीच्या आराधनेसह महिलांच्या सन्मानाचा आणि सक्षमीकरणाचा संदेश देण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. विशेष म्हणजे, दुर्गा विसर्जनाच्या वेळी मोठ्या आवाजातील डीजे आणि ढोल-ताशांचा वापर टाळून टाळ-मृदंगाच्या गजरात भक्तिमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक भक्तिसंगीताच्या माध्यमातून धार्मिक उत्सव साजरा करत सामाजिक जाणीव जपण्याचा मंडळाचा हा प्रयत्न लक्षवेधी ठरला. भक्ती, संस्कृती आणि सामाजिक प्रबोधनाचा संगम आजच्या काळात सण-उत्सव साजरे करताना



सामाजिक जबाबदारीचे भान राखणे आवश्यक आहे. आदिशक्ती नवदुर्गा उत्सव मंडळाने नऊ दिवस नारीशक्तीचा जागर आणि विसर्जनाच्या वेळी पारंपरिक भक्तिमय वातावरणाला प्राधान्य देत धार्मिक उत्सवाला सामाजिक संदेशाची जोड दिली. त्यामुळे उत्सवाच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न या मंडळाने केला आहे. नारीशक्तीचा सन्मान, पारंपरिक संस्कृतीचे जतन आणि सामाजिक प्रबोधन या त्रिसूत्रीवर आधारित मंडळाच्या उपक्रमांची मेहकर शहरात चर्चा होते.

स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मार्गावर पूल उभारा; गणेश नागरे यांची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



देउळगाव मही दि. २३ : महत्वाची बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या देऊळगाव मही गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मार्गावर पूल उभारण्यात यावा, अशी मागणी भाजप कार्यकर्ते गणेश नागरे यांनी केली आहे. परिसरातील सुमारे २० ते २५ गावांतील नागरिकांची विविध कामांसाठी देऊळगाव मही येथे ये-जा असते. त्यामुळे या गावाचे परिसरातील दळणवळण आणि व्यापाराच्या दृष्टीने महत्व आहे. देऊळगाव मही येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने अंत्यविधीसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. या मार्गावर पूल उभारल्यास नागरिकांची गैरसोय दूर होण्यास मदत होईल. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या प्रश्नाकडे लक्ष देऊन पुलाच्या बांधकामासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे नागरे यांनी म्हटले आहे. देऊळगाव मही हे परिसरातील गावांसाठी व्यापार आणि खरेदी-विक्रीचे महत्वाचे केंद्र आहे. गावात १७ सदस्यांची ग्रामपंचायत असून, सध्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून स्थानिक प्रशासनाचा कारभार चालतो.

गावाची वाढती व्याप्ती आणि बाजारपेठेचे महत्व लक्षात घेता, देऊळगाव महीला भविष्यात नगरपंचायतीचा दर्जा मिळण्याच्या दृष्टीनेही महत्व प्राप्त झाले आहे. स्मशानभूमीकडे जाणारा हा रस्ता केवळ अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत जाण्या-येण्यासाठी वापरला जातो. त्यामुळे या मार्गावरील अरुंद रस्त्याची समस्या दूर करून आवश्यक ठिकाणी पुलाची उभारणी करणे गरजेचे आहे. यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि संबंधित प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, तसेच पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी गणेश नागरे यांनी केली आहे. देऊळगाव मही येथील कृषी उत्पन्न बाजार समिती ही परिसरातील शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी महत्वाची संस्था आहे. गावाची बाजारपेठ आणि परिसरातील गावांशी असलेला संपर्क लक्षात घेता, मूलभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे.

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेची हत्या; पती पोलिसांच्या ताब्यात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



सिंदखेड राजा दि. २३ : २३ वर्षाच्या विवाहितेचा तिच्याच राहत्या घरात दोरीने गळा आवळून खून झाल्याची संतापजनक घटना सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा येथे उघडकीस आली आहे. संजीवनी विजय दाभाडे असे मृत विवाहितेचे नाव असून, तिच्या हत्येप्रकरणी पती विजय संजय दाभाडे (३१) याला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, विजय दाभाडे याला दारूचे व्यसन होते. पत्नी संजीवनी कोणाशी तरी फोनवर बोलते, या संशयातून तो तिला वारंवार मारहाण करीत होता. २० ऑक्टोबर रोजी मारहाण झाल्यानंतर संजीवनीचे वडील सुधाकर वाघमारे कुटुंबीयांसह किनगाव राजा येथे पोहोचले. यावेळी विजयने पुन्हा दारू पिणार नाही आणि पत्नीशी भांडणार नाही, असे आश्वासन दिले होते. मात्र, अवघ्या दोन दिवसांतच होत्याचे नव्हते झाले. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी घरमालकाचा फोन आल्यानंतर संजीवनीचे आई-वडील आणि भाऊ घटनास्थळी पोहोचले. घराचा दरवाजा आतून बंद होता. विजयने दरवाजा उघडल्यानंतर संजीवनी पलंगावर चादर पांघरलेल्या अवस्थेत आढळली. अंगावरील चादर काढताच तिच्या गळ्यावर दोरीचे वळ दिसले. फिर्यादीनुसार, विचारणा केली असता विजयने गळा आवळून मारल्याचे सांगितले. २०२१ मध्ये विवाह झालेल्या संजीवनीला आदित्य आणि अंतरा अशी दोन लहान मुले आहेत. आईच्या मृत्यूमुळे या दोन्ही चिमुकल्यांचे मातृछत्र हरपले आहे. किनगाव राजा पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय मातोंडकर यांच्या पथकाने आरोपीला अटक केली.

देऊळगाव साकरशात गरबा-दांडिया महोत्सवाला उस्फुर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




देऊळगाव सा. दि. २३: नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नारी शक्ती दुर्गा उत्सव महिला मंडळ, देऊळगाव साकरशा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'गरबा-दांडिया महोत्सव २०२६' नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या महोत्सवात जवळपास चार हजार नागरिकांनी सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे, सुमारे अडीच हजार महिलांनी गरबा-दांडियामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला, तर दीड ते दोन हजार पुरुषांनी उपस्थित राहून महिलांचा उत्साह वाढविला.

महिलांच्या सन्मानासोबतच सामाजिक एकोपा, स्त्री-पुरुष समानता आणि गावाच्या एकजुटीचा संदेश देणारा हा महोत्सव देऊळगाव साकरशाच्या सांस्कृतिक इतिहासातील एक उल्लेखनीय उपक्रम ठरला. मान्यवरांच्या उपस्थितीत महोत्सवाची रंगत वाढली या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवर मा. राजश्री प्रताप जायभाये, मा. सौ. रजनी राजेंद्र शिंगणे, मा. पूजा संजय गायकवाड आणि मा. रंजना संजय रायमुलकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून मा. मयुरी ऋषिकेश जायभाये, मा. सौ. वंदनाताई पृथ्वीराज गायकवाड आणि मा. सौ. शाल्मली निलेश रायमुलकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आधारस्तंभ म्हणून श्रीमती सुमन शंकर गायकवाड यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले. या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्व प्राप्त झाले. महिलांचा प्रचंड सहभाग; पुरुषांनीही दिली उत्स्फूर्त साथ या महोत्सवाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा प्रचंड सहभाग आणि पुरुषांनी दिलेली सकारात्मक साथ. जवळपास अडीच हजार महिलांनी पारंपरिक वेशभूषेत गरबा-दांडियाचा आनंद घेत कार्यक्रमात उत्साहाची रंगत आणली. महिलांच्या आनंदात सहभागी होत गावातील पुरुष मंडळींनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली आणि महिलांना प्रोत्साहन दिले. महिलांच्या कार्यक्रमाला पुरुषांनी दिलेली ही साथ म्हणजे केवळ उपस्थिती नव्हे, तर महिलांच्या आनंदाचा, त्यांच्या स्वातंत्र्याचा आणि सामाजिक सहभागाचा सन्मान असल्याची भावना यावेळी दिसून आली. स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन सांस्कृतिक उत्सव साजरा केल्याने गावातील सामाजिक सलोखा आणि एकतेचे सुंदर चित्र पाहायला मिळाले.

तक्रार शासकीय विभागांचा फक्त कागदी घोडा, प्रत्यक्ष कारवाई शून्य! नागरिकांमधून तीव्र संताप


अवैध वीज कनेक्शनमुळे शेंदुर्जनचा पाणीपुरवठा विस्कळीत

अजिंक्य भारत/प्रतिनिधी



सिंदखेड राजा दि. २३ : तालुक्यातील ग्रामपंचायत शेंदुर्जन येथे सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या डी.पी. वरून खाजगी व्यक्तींनी अवैधपणे वीज जोडणी (कट आऊटमधून वायर जोडून) घेतल्यामुळे पाणीपुरवठा योजनेच्या मोटारला कमी दाबाने वीजपुरवठा होत आहे. यामुळे योजनेची मोटार चालत नसून गावात भीषण कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

यासंदर्भात एमएसईबी (महावितरण), जलसंधारण, व संबंधित विभागांकडून केवळ कागदोपत्री पत्रव्यवहार सुरू असून, प्रत्यक्षात प्रत्यक्ष स्थळावर जाऊन अवैध वीज जोडण्यांवर कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. काय आहे नेमका प्रकार? शेंदुर्जन ग्रामपंचायतीची पाणीपुरवठा योजनेची विहीर ही राजेगाव रोडवर धरणाला लागून आहे, या ठिकाणी योजनेसाठी स्वतंत्र डी.पी. बसवण्यात आलेली आहे. मात्र, या डी.पी. वरून काही खाजगी व्यक्तींनी अवैधपणे वायर जोडून आपल्या विहिरींवरील मोटारपंपांना वीजपुरवठा घेतला आहे. या अवैध जोडणीमुळे मूळ सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेला पुरेसा वीजपुरवठा मिळत नाही. परिणामी, शेंदुर्जन, बाळसमुद्र, राजेगाव, या भागांतील पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. कारवाई ऐवजी पत्रांचा खेळ! ग्रामपंचायत प्रशासक व ग्रामपंचायत अधिकारी यांनी कनिष्ठ अभियंता (म.रा. वीज वितरण कंपनी, साखरखेर्डा), कार्यकारी अभियंता (बुलडाणा), उपकार्यकारी अभियंता (सिंदखेड राजा), तहसीलदार व गटविकास अधिकारी (पंचायत समिती, सिंदखेड राजा) यांना वारंवार निवेदने व पत्रे देऊन या प्रकाराची माहिती दिली आहे. परंतु, अधिकारी व कर्मचारी केवळ पत्रांची देवाणघेवाण करण्यात व्यस्त असून, प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन अवैध जोडण्या खंडित करण्याची हिम्मत कोणीही दाखवलेली नाही. ग्रामस्थांचा इशारा: शासकीय विभागांच्या या उदासीन आणि फक्त पत्रव्यवहार करण्याच्या कारभारामुळे ग्राम स्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. जर महावितरण आणि प्रशासनाने तात्काळ प्रत्यक्ष कारवाई करून अवैध वीज जोडण्या खंडित केल्या नाहीत आणि वीजपुरवठा सुरळीत केला नाही, तर तीव्र पाणीटंचाई सामना करावा लागेल. याबाबत ग्रामपंचायतने वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्याला पत्र व्यवहार केल्याचे सांगितले. तरी समजते कार्याने याचे दखल घेऊन त्वरित पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा शासनाच्या जबाबदार राहील.



अजिंक्य भारत
आपलं खामगाव

खामगाव, शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ www.ajinkyabharat.com

महत्त्वाचे

समता क्रीडा मंडळाच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

खामगाव : स्थानिक शंकर नगर भागातील समता क्रीडा मंडळाच्या वतीने २० ऑक्टोबर २६ रोजी सकाळी ९ वाजता प्रबुध्द विहार येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन व सम्राट अशोक विजयादशमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मंडळाचे अध्यक्ष गजानन सावदेकर यांनी तथागत गौतम बुध्द व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर पूज्य भंते बुध्दकिर्तीजी यांनी उपासक-उपासिका यांना त्रिशरण व पंचशिल ग्रहण करविले. तसेच सामुहिक बुध्द पुजापाठ करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाबाबत मनोगत व्यक्त केले. शेवटी गजानन सावदेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हरीओम जगदंबा उत्सव मंडळाची कार्यकारिणी गठीत

खामगाव : स्थानिक जगदंबा रोड भागातील हरी ओम जगदंबा उत्सव मंडळाची बैठक अध्यक्ष रवी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच संपन्न झाली. यावेळी सर्वानुमते कार्यकारिणी गठीत करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी योगेश वानखेडे, उपाध्यक्षपदी दिनेश उखळकर, कोषाध्यक्षपदी डॉ. मनोज गणवानी, सहकोषाध्यक्षपदी अनिल जामोदे, सचिवपदी राम जोशी, सहसचिवपदी योगेश गांधी, प्रसिध्दी प्रमुखपदी सुनिल गुळवे, आकाश चिखलकर तर सदस्यपदी श्रीकांत भोसले, ऋतीक चिखलकर, सार्थक लामधाडे, मनोज गवात्रे (राठोड), तुषार सुलताने, सुरज मुळतकर, मयुर देवगिरीकर, आतिष सिरसाट, पवन गुळवे, रूपेश गांधी, पियुष जाधव, राम कुटे, वैभव नेमाडे, मनोज तायडे, रामेश्वर देशमुख, मोहन माकोडे, चोन बनसोड, विशाल सोनोने, गणेश सुलताने, विजय मदारीवाले, प्रभाकर सुलताने, सुरज सुरेका, विशाल बनसोड, शिवाजीराव वडे, प्रशांत कुटे, सागर काकडे, करण सुलताने, शुभम कलचिडे, दिपक वानखेडे, स्पेश काकडे, विकास केनेकर, तर सल्लागार समितीमध्ये दिलीप गांधी, अमोल सिरसाट, प्रमोद देशमुख, मुरलीधर वानखेडे, त्र्यंबक हेलोडे, भरत काकडे, सुनिल फंदाट, सुरेश काकडे यांचा समावेश आहे.

टिप्परची दुचाकीला धडक; एक ठार, दोघे जखमी

खामगाव : नांदुरा रोडवरील पारखेड फाट्याजवळ काल २२ ऑक्टोबर २६ रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास टिप्पर क्र. एमएच-३०-९२३७च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन दुचाकी क्र. एमएच-३०-बीवाय ७५३० ला समोरून धडक दिली. धडकेत प्रज्वल संजय माहुलकर (वय २४, रा. मोठी उमरी अकोला) याचा जागीच मृत्यू झाला. तर आशुतोष प्रभाकर काकड (वय २४, रा. येऊलखेड ता.जि. अकोला) व अक्षय देवेंद्र राऊत (वय २३, रा. मोठी उमरी अकोला) हे दोघे जखमी झाले. याप्रकरणी आशुतोष प्रभाकर काकड यांनी खामगाव ग्रामिण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त टिप्पर चालकाविरूध्द कलम १०६ (१), २८१, १२५ (अ), ३२४ (४) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहकॉ. विजय गोलाईत करीत आहेत.

२० हजाराचे सोयाबीन चोरीला; कुंपण तोडून चार पोती लंपास

देऊळगाव राजा : शिवारातील शेतातून चोरट्याने अंदाजे २५० किलो सोयाबीन चोरून नेल्याची घटना १९ ऑक्टोबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी शेतकरी रामदास पाटीलबा शिंगणे (रा. देऊळगाव माही) यांच्या तक्रारीवरून देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शिंगणे यांच्या देऊळगाव माही येथील गटातील शेतात २०२६-२७च्या खरीप हंगामात सोयाबीनची पेरणी करण्यात आली होती. सोयाबीनमध्ये आंतरपीक म्हणून तूरही पेरण्यात आली होती. १९ ऑक्टोबर रोजी शेतात सोयाबीनची मळणी करण्यात आली. त्यानंतर शेताच्या मध्यभागी सोयाबीनची पाच पोती ठेवण्यात आली होती. रात्री ८ ते ९ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने शेताच्या पूर्वेकडील लोखंडी जाळीचे कुंपण तोडून त्यापैकी चार पोती सोयाबीन चोरून नेले. चोरीस गेलेल्या सोयाबीनचे वजन अंदाजे २५० किलो असून त्याची किंमत २० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. रात्री ९ वाजल्यानंतर सोयाबीन घरी नेण्यासाठी वाहन घेऊन आल्यानंतर चार पोती चोरीला गेल्याचे शिंगणे यांच्या लक्षात आले. परिसरात शोध घेऊनही सोयाबीन किंवा चोरट्याचा शोध लागला नाही.

भूजल पातळी सरासरी २.५ मीटरने घटली

रब्बीत करडई, हरभरा, रब्बी ज्वारीला प्राधान्य देण्याचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



बुलडाणा दि.२३ : जिल्ह्यात परतीचा पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून, भूजल पातळीत सरासरी २.५ मीटरने घट झाली आहे. आगामी रब्बी हंगामात संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी ऊस, गहू, मका आणि चिया यांसारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड टाळावी.

त्याऐवजी जमिनीचा प्रकार, उपलब्ध ओलावा आणि सिंचनासाठी उपलब्ध असलेले पाणी यांचा विचार करून करडई, हरभरा आणि रब्बी ज्वारी या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालकांनी केले आहे. संभाव्य एल निनोचा प्रभाव, पावसातील अनिश्चितता आणि पाण्याची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता शेतकऱ्यांनी केवळ हवामानाच्या अंदाजांवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष पर्जन्यमान व उपलब्ध जलसाठ्याचे मूल्यमापन करावे. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास पेरणीची घाई करू नये. तसेच कोरडवाहू शेतीसाठी शिफारस केलेल्या वाणांचीच निवड करावी, असेही सांगितले. करडई, ज्वारीच्या सुधारित वाणांची निवड करा जिल्ह्यात कमी पाण्यात घेता येणाऱ्या करडई पिकासाठी परभणी सुवर्णा, परभणी कुसुम आणि विद्यापीठाच्या अधिकृत शिफारशीनुसार या वाणांचा विचार करावा. खोल काळ्या जमिनीत चांगला अवशिष्ट ओलावा उपलब्ध असल्यास रब्बी ज्वारीची लागवड करावी. त्यासाठी परभणी सुपर मोती, परभणी मोती आणि पीकेव्ही क्रांती या वाणांची स्थानिक शिफारशीनुसार निवड करावी. तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असलेल्या क्षेत्रात हरभरा हे महत्वाचे कडधान्य पीक ठरू शकते. हरभऱ्यासाठी विजय, दिग्विजय, आकाश आणि जाकी-९२१८ या वाणांपैकी स्थानिक हवामान, पीक कालावधी, कोरडवाहू लागवडीची उपयुक्तता आणि विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन योग्य वाण निवडावा, असे कळविण्यात आले आहे. रब्बी हंगामातील संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करावा. जमिनीचा प्रकार, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता यांचा विचार करूनच पीक नियोजन करावे. पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना अधिक पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड केल्यास संभाव्य जोखीम कमी करण्यास मदत होईल, असे आवाहन केले आहे.

'चला, दुर्ग बनवूया!'; अमृत दुर्गोत्सव २०२६ मध्ये सहभागी व्हा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि. २३ : महाराष्ट्राच्या समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि दुर्गपरंपरेचे जतन व संवर्धन करण्यासह नव्या पिढीमध्ये गड-दुर्गांविषयी अभिमान निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृत दुर्गोत्सव २०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

'आपला दुर्ग, आपली मानवंदना चला, दुर्ग बनवूया!' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात सहभागी होण्यासाठी ५ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-दुर्गांचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, दुर्गसंवर्धनाबाबत जनजागृती करणे आणि ऐतिहासिक वारशाविषयी आदर व अभिमानाची भावना निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दिवाळीच्या कालावधीत लहान मुले, युवक, कुटुंबे, शाळा, महाविद्यालये आणि विविध सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन दुर्गांच्या प्रतिकृती तयार करण्याच्या परंपरेला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दूरदृष्टी, नियोजन आणि कुशल नेतृत्वाच्या बळावर महाराष्ट्रातील गड-दुर्गांचा उपयोग स्वराज्याच्या संरक्षणासाठी केला. हे दुर्ग म्हणजे शौर्य, स्वाभिमान, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेची प्रतीके आहेत. त्यामुळे दुर्गांच्या प्रतिकृती तयार करून त्यांना मानवंदना देणे, ही केवळ सांस्कृतिक परंपरा नसून ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी लोकसहभाग वाढविण्याची संधी असल्याचे अमृतच्या वतीने सांगण्यात आले.सन २०२५ मध्ये या नावाने मराठा लष्करी भूदृश्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातील १२ दुर्गांना जागतिक वारशाचा दर्जा मिळाल्याचा गौरव अधोरेखित करत दुर्गसंस्कृतीविषयी व्यापक जनजागृती करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांतील नागरिकांसह देश-विदेशातील व्यक्ती आणि विविध गटांनाही या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

उधना अमरावती सुपरफास्ट स्पेशल एक्स्प्रेसला मंजुरी


अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

मलकापूर दि. २३ : आ. चेनसुख संचेतीयांच्या प्रयताने व मलकापूर प्रवासी सेवा संघाच्या पाठपुराव्याने उधनाअमरावती सुपरफास्ट स्पेशल एक्स्प्रेस सुरू करण्याच्या मागणीला यश मिळाले आहे. गाडी क्रमांक ०९०१३/०९०१४ ला मंजुरी मिळाली असून, २६ ऑक्टोबर २०२६ पासून ही गाडी साप्ताहिक स्वरूपात सुरू होणार आहे. या मागणीसाठी मलकापूर जिल्हा प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष व मध्य रेल्वेचे सदस्य अॅड. महेंद्र कुमार बुराड यांनी सातत्याने पाठपुरावा केला. प्राप्ती सेक्शन, खान्देश आणि विदर्भातील प्रवाशांची गरज लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाकडे निवेदने सादर केली तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन हा विषय सातत्याने पुढे नेला.

उधनाअमरावती सुपरफास्ट स्पेशल सुरू करण्यासाठी २२ जून २०२६ रोजी प्रथम निवेदन देण्यात आले. त्यानंतर २३ सप्टेंबर २०२६ रोजी पुन्हा निवेदन देण्यात आले. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक, मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक आणि वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांची भेट घेऊन गाडी लवकर सुरू करण्याची मागणी करण्यात आली. रेक उपलब्ध नसल्यामुळे सुरुवातीला ही गाडी आठवड्यातून एक दिवस चालवण्यात येणार आहे. मलकापूर प्रवासी सेवा संघाने सोमवार, बुधवार आणि शनिवार असे तीन दिवस गाडी चालवण्याचा प्रस्ताव दिला असून, रेक उपलब्ध झाल्यानंतर आणखी दोन दिवस सेवा सुरू करण्यासाठी पाठपुरावा सुरू राहील.

खंडणी गुन्हा प्रकरणी सागर वेरूळकर यांना अटकपूर्व जामीन मंजूर; स्वतः युक्तिवाद करून मांडली बाजू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



नांदुरा दि. २३ : नांदुरा पोलीस स्टेशन येथे दाखल खंडणी गुन्हा प्रकरणामध्ये सागर कुशकुमार वेरूळकर यांना अप्पर जिल्हा सत्र न्यायाधीश, मलकापूर यांनी १९ ऑक्टोबरला अटकपूर्व जामीन मंजूर केला.

या प्रकरणात अर्जदाराने स्वतःची बाजू मांडली तर सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक अधिवक्ता विवेक बापट यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने दोन्ही पक्षाचा युक्तिवाद व सादर लेखी टिपण्या आणि प्रकरणातील परिस्थितीचा विचार करुन अर्जदाराचा युक्तिवाद ग्राह्य धरुन अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायालयाने तिस हजार रुपयांच्या बंध पत्रावर आणि जामिनपत्रावर अटी शर्ती वर जामिन मंजूर केला. तपासात सहकार्य करणे आणि दर सोम वार व गुरुवारी सकाळी ९ ते १० या वेळेत नांदुरा पोलीस स्टेशनमध्ये हजर राहणे, तपास अधिकाऱ्यांना पूर्व सूचना दिल्याशिवाय आपले निवासस्थान बदलू नये. इत्यादी अटींचा समावेश आहे.

जळगाव जामोदसह १४० गावांचा पाणीपुरवठा तीन दिवस बंद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

संग्रामपूर दि. २३ : मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीमुळे जळगाव जामोद शहरासह १४० गावांचा पाणीपुरवठा सलग तीन दिवस बंद राहणार आहे. दि. २६ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मुख्य गुरुत्ववाहिनी आणि एअर व्हॉल्व्हच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याने नागरिकांनी पाण्याचे नियोजन करून आवश्यक साठा करून ठेवावा, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपविभागीय अधिकारी इंदल राठोड यांनी केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग जळगाव जामोद यांच्याकडून दि. २३ ऑक्टोबर रोजी यासंदर्भात पत्र जारी करण्यात आले आहे. दैनंदिन देखभाल व दुरुस्तीअंतर्गत मुख्य गुरुत्ववाहिनीची दुरुस्ती तसेच एअर व्हॉल्व्ह दुरुस्ती करण्यात येणार असल्याने निर्धारित कालावधीत पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा पाणीपुरवठा तीन दिवस बंद राहणार असल्याने नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापरासाठी आवश्यक पाणीसाठा आधीच करून ठेवावा. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून संभाव्य गैरसोय टाळावी. संबंधित ग्रामपंचायतींनीही गावातील नागरिकांपर्यंत ही सूचना पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

आरोग्य सेवकांची कमतरता आणि सफाई कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



रायपूर दि. २३ : रायपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी रायपूर ग्रामीण पत्रकार संघाने केली आहे. या मागणीची दखल घेत जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) रणजीत मंडले यांनी दूरध्वनीवरून चर्चा करत रिक्त पदे लवकरच भरण्यात येतील, अशी माहिती दिली. सुमारे १५ हजार लोकसंख्या असलेल्या रायपूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या केवळ एक आरोग्य सेवक कार्यरत आहे. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी, जनजागृती आणि शासकीय आरोग्य योजनांची अंमलबजावणी करताना मनुष्यबळाची कमतरता भासत आहे.

आरोग्य केंद्रात कायमस्वरूपी सफाई कर्मचारी नसल्याने स्वच्छतेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.रुग्णांना स्वच्छ वातावरणात उपचार मिळण्यासाठी सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती किंवा कायमस्वरूपी स्वच्छता व्यवस्था करण्याची मागणीही करण्यात आली आहे. रायपूर हे परिसरातील महत्वाचे गाव असून येथे शासकीय कार्यालये, बाजारपेठ आणि शैक्षणिक संस्था आहेत. सैलानी बाबा दर्ग्यामुळे भाविकांचीही मोठी वर्दळ असते. त्यामुळे नागरिकांसह भाविकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सक्षम असणे आवश्यक आहे. ग्रामीण पत्रकार संघाने हा प्रश्न प्रशासनासमोर मांडल्यानंतर डीएचओंनी रिक्त पदे लवकर भरण्याचे आश्वासन दिले आहे. आता नियुक्ती प्रक्रिया आणि स्वच्छतेच्या प्रश्नावर प्रशासनाकडून कोणती कार्यवाही होते, याकडे रायपूरवासीयांचे लक्ष लागले आहे.

नवदुर्गा विसर्जन मिरवणूकीत; दुष्काळ, शेतकरी आत्महत्यांच्या देखाव्यांनी वेधले लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



साखरखेर्डा दि. २३ : धार्मिक उत्साह, पारंपरिक संस्कृतीचे दर्शन आणि सामाजिक प्रश्नांचे भान अशा त्रिवेणी संगमातून साखरखेर्डा येथे २२ सप्टेंबर रोजी नवदुर्गा विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली. महिलांनी सादर केलेल्या गरबा नृत्याने मिरवणुकीत रंगत आणली, तर दुष्काळ, शेतकरी आत्महत्या आणि पाणी बचतीचे महत्व अधोरेखित करणाऱ्या देखाव्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. एका बाजूला उत्सवाचा जल्लोष, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या वेदना आणि पाण्याच्या प्रश्नाचे गांभीर्य मांडणाऱ्या या मिरवणुकीने सामाजिक जाणिवेचा संदेश दिला.

दुपारी एक वाजताच्या सुमारास जामा मशिदीजवळ परदेशी नवदुर्गा मंडळ, अनुसया माता नवदुर्गा मंडळ, जगदंबा माता (माळावरील) नवदुर्गा मंडळ, महात्मा फुले नवदुर्गा मंडळ, राजमाता अहिल्यादेवी होळकर नवदुर्गा मंडळ आणि वीर लहुजी नवदुर्गा मंडळ एकत्र आले. विविध मंडळांच्या सहभागामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महिलांनी तालबद्ध पद्धतीने गरबा नृत्य सादर करून उपस्थित रसिकांची वाहवा मिळवली जगदंबा माळारची देवी मंडळाच्या देखाव्यांतून दुष्काळ, शेतकरी आत्महत्या आणि पाणी बचतीचा संदेश देणाऱ्या या देखाव्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून वाचा फोडण्याचा प्रयत्न या मंडळाने केला. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्वाचा असून त्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शेतकरी संकटात असताना समाजाने त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे आणि जलसंधारण व पाणी बचतीसाठी सामूहिक प्रयत्न करावेत, याची जाणीव या देखाव्यांनी करून दिली. धार्मिक उत्सव केवळ मनोरंजन आणि जल्लोषापुरता मर्यादित न ठेवता समाजातील ज्वलंत प्रश्न मांडण्यासाठीही त्याचा उपयोग होऊ शकतो, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

दिलासा मायक्रो फायनान्सची सक्तीची कर्ज वसुली थांबवा - राम थारकर

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शिवसेना आक्रमक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



शेगाव दि. २३ : दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि आर्थिक संकटामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास दिला जात असेल, तर शिवसेना गप्प बसणार नाही, असा इशारा शिवसेनेचे शेगाव तालुकाप्रमुख रामा पाटील थारकर यांनी मायक्रो फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिला. तसेच शेगाव तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शिवसेनेशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

पहूरजीरा येथे मायक्रो फायनान्स कंपनीचे अधिकारी कर्जवसुलीसाठी आले असताना शेख अफरोज यांनी ही बाब रामा पाटील थारकर यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर थारकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत वसुलीच्या नावाखाली शेतकरी आणि सामान्य नागरिकांना नाहक त्रास देण्याबाबत नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन माणुसकीच्या दृष्टिकोनातून वागावे, असे आवाहन त्यांनी केले. एकीकडे पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि वाढता शेतीखर्च, तर दुसरीकडे कर्जाचा बोजा अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. अशा परिस्थितीत वसुलीसाठी अनुचित दबाव किंवा धमकीचा वापर सहन केला जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, शेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषी विभाग, पंचायत समिती, तहसील कार्यालय, महावितरण, तलाठी कार्यालय, भूमिअभिलेख विभाग, ग्रामपंचायत तसेच बँक व फायनान्स कंपन्यांशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे थारकर यांनी सांगितले. पीक नुकसान भरपाई, पीक विमा, ई-पीक पाहणी, कृषी योजनांचे अनुदान, वीजपुरवठा, नवीन कृषी वीजजोडणी, सातबारा, फेरफार, शेतरस्ते आणि इतर शासकीय कामांबाबत अडचणी असल्यास संबंधितांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय कार्यालयांत वारंवार हेलपाटे मारूनही काम होत नसेल, अर्ज प्रलंबित असेल किंवा अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ होत असेल, तर संबंधित प्रश्नांची माहिती द्यावी. तसेच कामासाठी लाचेची मागणी होत असल्यास त्याबाबतही कळवावे. संबंधित विभागांकडे नियमानुसार पाठपुरावा करून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्याचे भूमिपत्र तथा खासदार प्रताप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना कटिबद्ध असल्याचे सांगत, 'शेतकऱ्यांचा प्रश्न म्हणजे आमचा प्रश्न आणि त्यांचा संघर्ष म्हणजे आमचा संघर्ष,' असे रामा पाटील थारकर यांनी नमूद केले.

पुस्तकी ज्ञानाला व्यावहारिक अनुभवाची जोड; अर्थशास्त्र विभागाची औद्योगिक अभ्यासभेट



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि. २३ : स्थानिक गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची औद्योगिक अभ्यासभेट बाबूजी गोल्ड ऑइल इंडस्ट्री, औद्योगिक वसाहत, खामगाव येथे आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धतीची माहिती मिळावी आणि अर्थशास्त्रातील सैद्धांतिक ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग समजावा, हा या अभ्यासभेटीचा प्रमुख उद्देश होता.

या अभ्यासभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी खाद्यतेल उद्योगाची उत्पादन प्रक्रिया, कच्च्या मालाचे व्यवस्थापन, यंत्रसामग्रीचा वापर, उत्पादन खर्च, भांडवलाची गुंतवणूक, विपणन व्यवस्था आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या महत्वपूर्ण बाबींची माहिती घेतली. तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये औद्योगिक क्षेत्राची भूमिका आणि उद्योगांच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक संधी समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमातील उत्पादन, खर्च, भांडवल, बाजारपेठ आणि औद्योगिक विकास या संकल्पनांचा प्रत्यक्ष औद्योगिक व्यवहारांशी संबंध जोडण्यासाठी ही अभ्यासभेट उपयुक्त ठरली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडण्याबरोबरच त्यांच्यामध्ये निरीक्षणक्षमता, विश्लेषणात्मक दृष्टिकोन आणि उद्योजकतेविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होते. या औद्योगिक अभ्यासभेटीच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष, सचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी वराडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.आर. गव्हाळे , सहलीचे समन्वयक डॉ. हनुमंत भोसले, प्रा. उमेश खंदारे , डॉ. प्रदीप शिरसाठ यांनी यशस्वी नियोजन केले तसेच बाबूजी गोल्ड ऑइल इंडस्ट्रीचे व्यवस्थापक पुरोहित साहेब व त्यांच्या संपूर्ण टीमचे मोलाचे सहकार्य लाभले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी दिली आहे.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ www.ajinkyabharat.com

थोडक्यात



जोशी शाळेत गरबा, दांडियाची रंगली धमाल

अमरावती : श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत नवरात्रोत्सवानिमित्त रास-गरबा व दांडिया उत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. महिला पालक भगिनी, विद्यार्थी आणि कर्मचारी वृंद यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शालेय परिसर आनंदमय वातावरणाने न्हाऊन निघाला. संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य आणि शालेय समितीच्या अध्यक्षा डॉ. सौ. माधुरीताई चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध अभिनव शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासोबतच त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा आणि शाळा-पालक यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ व्हावेत, हा या उपक्रमांमागील उद्देश आहे.

साडेसात हजार गावांमध्ये पंचनामे पूर्ण


अमरावती : मदतीची प्रतीक्षा पाच हजारांची शासन मदत; प्रति शेतकरी की हेक्टरी, याबाबत संभ्रम कायम. विभागात दुष्काळाचे दोन्ही ट्रिगर लागलेल्या ५६ तालुक्यांतील ७,४६१ गावांमध्ये बाधित पिकांचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. यामुळे २१.८६ लाख शेतकऱ्यांचे ३१.१६ लाख हेक्टरमधील खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

जलसाठा ५५ टक्क्यांवर; पाणी जपून वापरण्याचे आवाहन

अमरावती, दि. २३ : जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने उपाययोजनांना गती दिली आहे. जिल्ह्यातील जलाशयांमध्ये सरासरी ५५.०२ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि शेतीसाठी अखंडित वीजपुरवठा यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.



जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी ही माहिती देत प्रशासनाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा मांडला. जिल्ह्यातील अपर वर्धा धरणात ४८.११ टक्के, सात मध्यम प्रकल्पांमध्ये ५६.७९ टक्के, तर ४९ लघु प्रकल्पांमध्ये ६७.१२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. उपलब्ध पाणीसाठ्यातील १० टक्के पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले असून, १० टक्के पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटर अंतरापर्यंत बोअरवेल घेण्यास प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. रब्बी हंगामात शेतकऱ्यांना वीजपुरवठ्याची अडचण भासू नये, यासाठी महावितरणला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. शेतीचे फिडर बंद पडल्यास ४८ तासांत दुरुस्ती करण्यासह शेतीसाठी दररोज १२ तास अखंडित वीजपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये दिरंगाई झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्व १४ तालुक्यांतील विभागप्रमुखांच्या आढावा बैठका घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. गावपातळीवरील उपाययोजनांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष ॲपद्वारे स्थळभेटींचे छायाचित्र आणि अहवाल अपलोड केले जात आहेत. दरम्यान, बी-व्हीजी रामजी योजनेअंतर्गत २३ हजार १४४ कामांचे नियोजन करण्यात आले असून, त्यात आणखी वाढ करण्यात येणार आहे. तसेच पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी १,७०० पेक्षा अधिक शाफ्ट तयार करण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सांगितले.

इंद्रधनुष्य, राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या कलावंतांची निवड

२७ ऑक्टोबरपासून प्रशिक्षण वर्ग; उपस्थित राहण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील स्पर्धक, कलावंत व साथीदारांची महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य महोत्सव, मध्य विभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सव आणि अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या चमूचा प्रशिक्षण वर्ग २७ ऑक्टोबरपासून स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सुरू होणार आहे. सर्व निवड झालेल्या स्पर्धक, कलावंत व साथीदारांनी प्रशिक्षण वर्गाला उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य-२०२६ महोत्सव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे १९ ते २३ नोव्हेंबरदरम्यान आयोजित करण्यात येणार आहे.

मध्य विभाग आंतरविद्यापीठ युवा महोत्सव तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली आणि राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद स्पर्धांच्या आयोजनाच्या तारखा अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्रपणे कळविण्यात येतील, अशी माहिती विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी दिली. अधिक माहितीसाठी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा, असेही विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

पत्नीच्या हत्येनंतर काही तासांत मित्राचाही काढला काटा !

चौकशीत दुहेरी हत्याकांडाचा उलगडा, अवघ्या आठ तासांत आरोपी गजाआड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा गळा आवळून हत्या केल्यानंतर काही तासांतच मित्राचीही हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पत्नीच्या हत्येप्रकरणी अटक केल्यानंतर पोलिस चौकशीत आरोपीने दुसऱ्या हत्येची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी परसोडा येथील जंगलातून मित्राचा मृतदेह ताब्यात घेतला.

संशयातून पत्नीचा बळी

रफीउल्लाह खान हाफिजुल्लाह खान पठाण (४८, रा. अबूबकर कॉलनी) असे आरोपीचे नाव असून, नसरीन बानो रफीउल्लाह खान पठाण



(४८) ही त्याची मृत पत्नी आहे. मन्नान उर्फ चाऊस असे मृत मित्राचे नाव आहे. मृत महिलेचा भाऊ सय्यद साजिद अली (अचलपूर) यांच्या तक्रारीनुसार, आरोपी पत्नीचा सतत छळ करीत होता. तिच्या नावावरील भूखंड विकून तो स्वतःच्या नावावर हस्तांतरित करीत असे. चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करण्यासह घर सोडल्यास जीवे मारण्याची धमकीही तो देत होता. २१ ऑक्टोबर रोजी घरात नसरीन बानो पलंगावर मृतावस्थेत आढळली. त्यानंतर मारेकरी मित्राकडे गेला आणि त्याला परसोड्याच्या जंगलात नेऊन त्याचा गळा आवळत त्याचीही हत्या के ल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले. माहिती मिळताच पोलिसांनी पर सोडा जंगलात पोहचून चाऊस याचा मृतदेह ताब्यात घेतला. प्रथमदर्शनी दोन्ही हत्येचा एकमेकांशी संबध दिसत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

अमरावती तीन महिन्यात आढळले ९५९ टीबी रुग्ण

अमरावती व अचलपूर तालुक्यात सर्वाधिक रुग्ण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती , दि. २३ : जिल्हा क्षयरोग टीबी कार्यालयाकडून वर्षभर रुग्ण शोध मोहीम राबवली जाते मात्र शासनाच्या शंभर दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात नुकताच सक्रिय रुग्णाची विशेष शोध मोहीम पूर्ण करण्यात आली. या मोहिमेंतर्गत अवघ्या तीन महिन्यात जिल्हाभरात एकूण ९५९ रुग्ण आढळून आले. त्यामुळे या आजाराची गांभीर्य वाढली असून शहर रोगाची लक्षणे आढळणाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी याबाबत तातडीने तपासणी औषधोपचार करून घेण्याचे आवाहन आरोग्य यंत्रणे कडून करण्यात येत आहे.

दरवर्षी २४ मार्चला जागतिक क्षयरोग दिन साजरा केला जातो. यावर्षी राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार राज्यभरात डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ पर्यंत राष्ट्रीय शै रोग दुरीकरण मोहीम राबविण्यात आली. यावर्षीच्या जागतिक क्षयरोग दिनाची संकल्पना होय. आपण क्षयरोग निश्चित संपू शकतो, प्रतिज्ञा करा, तरतूद करा, अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा क्षयरोग कार्यालय महापालिका नगरपरिषद जिल्हा परिषद आधी सर्वच यंत्रणांकडून सक्रिय क्षयरोग मोहीम राबविण्यात आली. विशेष म्हणजे अमरावती व अचलपूर तालुक्यात सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत. शेरो हा संसर्गजन्य असल्याने एका बाधित रुग्णांमुळे अन्य रुग्णाची संख्या झपाट्याने वाढण्याची भीती असते. त्यामुळे झोपडपट्टी वीट भट्टी भटक्या जमाती खाणी मधील कामगार वृद्धाश्रम आश्रम शाळा आधी ठिकाणी प्राधान्याने जनजागृती आणि चाचण्या करण्यात आल्या. यामध्ये आढळलेल्या रुग्णाच्या बेडक्यांच्या नमुन्याची तपासणी व ज छय किरण तपासणी करण्यात आली. लहान मुले एच आय व्ही बाधित रुग्ण आधी संशयित रुग्णांचे रुग्णांची नेट तपासणी करण्यात आली.

तालुका निहाय क्षयरोग रुग्ण

अमरावती येथे ४३०, अचलपूर १०८, अंजनगाव १६, भातपुरी १५, चांदूरबाजार २१, चांदुर रेल्वे १७, धामणगाव रेल्वे पंचवीस, धारणी ५९, मोर्शी ४८, नांदगाव खंडेश्वर वीस , तिवसा तेरा, वरुड ९१ यासह मेळघाट तील सेवा करा तर सादरावाडी येथे शक्तीस रुग्ण आढळून आले आहेत

प्रवेश अर्जांसाठी ६ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

अमरावती, दि. २३ : महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता पाचवी व आठवीमध्ये नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन नावनोंदणी अर्ज भरण्याची मुदत ६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ६ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज भरावेत. त्यानंतर ७ ते १३ नोव्हेंबरदरम्यान मूळ अर्ज, विहित शुल्क व आवश्यक कागदपत्रे संपर्क केंद्र शाळेत जमा करावीत. संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज व कागदपत्रे १८ नोव्हेंबरपर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करावीत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी केले आहे.

शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करा

शिक्षक समितीचे आमदार रोहित पवार यांना निवेदन; शासनाकडे पाठपुरावा करण्याचे दिले आश्वासन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : राज्यातील प्राथमिक शिक्षकांवर लादण्यात येणारी अशैक्षणिक कामे, ऑनलाइन माहिती संकलनाचा वाढता ताण आणि शिक्षणसेवकांच्या मानधनवाढीचा प्रलंबित प्रश्न याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने आमदार रोहित पवार यांना निवेदन देण्यात आले. शिक्षक नेते सुरेश पवार यांनी हे निवेदन सादर करून संबंधित प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या प्रश्नांबाबत राज्य शासनाकडे सक्षम पाठपुरावा करण्याची ग्वाही आमदार पवार यांनी दिली.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांना



बीएलओसारखी विविध अशैक्षणिक कामे सोपविण्यात येत आहेत. त्यातच ऑनलाइन माहिती भरणे आणि विविध प्रकारचा प्रशासकीय तपशील सादर करण्याच्या कामांचा व्याप वाढल्याने शिक्षकांवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमुळे शिक्षकांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होत असून, विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी आवश्यक असलेला वेळही कमी होत आहे. त्यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामांच्या अतिरिक्त भारातून मुक्त करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

आठ वर्षांपासून मानधनात वाढ नाही

शिक्षणसेवकांच्या मानधनवाढीचा प्रश्नही यावेळी ठळकपणे मांडण्यात आला. शिक्षणसेवकांच्या मानधनाचे दर चार वर्षांनी पुनर्विलोकन करण्याबाबत न्यायालयाने निर्देश दिले असल्याचे नमूद करत, मागील आठ वर्षांपासून शिक्षणसेवकांना दरमहा केवळ १६ हजार रुपये मानधन मिळत असल्याचे सुरेश पवार यांनी निदर्शनास आणून दिले. या काळात मानधनात वाढ न झाल्याने शिक्षणसेवकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. दीर्घकाळ भरती प्रक्रिया न झाल्याने डी.एड. पदविकाधारक बेरोजगार तरुणांना रोजगारासाठी प्रतीक्षा करावी लागली. त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या अनेक शिक्षणसेवकांना पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा व विभागाबाहेर नियुक्ती मिळाली आहे. ८० टक्क्यांहून अधिक शिक्षणसेवकांची नियुक्ती त्यांच्या जिल्ह्याबाहेर झाल्याने कुटुंबासह दूरच्या ठिकाणी राहून १६ हजार रुपयांच्या मानधनात उदरनिर्वाह करणे कठीण होत असल्याची बाबही मांडण्यात आली. आमदार रोहित पवार यांनी या तिन्ही प्रश्नांची सविस्तर माहिती जाणून घेत राज्य शासनाकडे सक्षम पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सुरेश पवार यांनी त्यांना 'चक्रव्यूहात शिक्षण' आणि 'लोकनायक' ही पुस्तके भेट दिली. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न समजून घेण्यासाठी 'चक्रव्यूहात शिक्षण' या पुस्तकाचा संदर्भग्रंथ म्हणून उपयोग होईल, असा विश्वास आमदार पवार यांनी व्यक्त केला.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग होणार

कृषी आयुक्तांच्या आदेशामुळे शेतकऱ्यांमध्येही वाढला संभ्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत शेतकऱ्यांना वेळेत नुकसानभरपाई मिळावी, यासाठी कृषी आयुक्तालयाने यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे पीक नष्ट झाल्यास 'मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग' करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, काही भागात पिकाचा कालावधी पूर्ण व्हायचा असताना हे प्रयोग होणार कसे, असा मोठा तांत्रिक पेच निर्माण झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्येही संभ्रम वाढला आहे.

अतिवृष्टी, दुष्काळ किंवा कीड-रोगामुळे पीक वाया गेल्यावर पार्श्वभूमीवर कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी १० सप्टेंबरला परिपत्रक काढून, पीक काढणीयोग्य नसतानाही प्रत्यक्ष पंचनामा करून मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग घेण्याच्या व गरज पडल्यास 'शून्य उत्पादन' नोंदवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. सोयाबीन दाण्यांमध्ये ओलाव्यामुळे मुदतपूर्व कापणी केल्यास वजन जास्त भरेल. त्यामुळे प्रत्यक्षात पीक हातातून गेलेले असतानाही कागदोपत्री उत्पादन जास्त आल्यास शेतकऱ्यांचेच नुकसान होण्याचा धोका आहे. मुदतपूर्व कापणी प्रयोगावेळी किंवा पंचनाम्यावेळी विमा कंपनीच्या प्रतिनिधीला लेखी कळवून उपस्थित ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे, शिवाय मोबाइल ॲपवर जिओ-टॅग फोटो व व्हिडिओ अपलोड करावे लागणार असल्याने पेच निर्माण होणार आहे.

मुदतपूर्व काढणी, 'शून्य उत्पादन' पंचनामा

चालू हंगामात 'एल निनो'च्या प्रतिकूल परिणामांमुळे उडीद, मूग, सोयाबीन यांसारख्या कमी कालावधीच्या पिकांची मुदतपूर्व काढणी करावी लागू शकते. अतिवृष्टी, पूर, अवर्षण किंवा कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे पीक पूर्णपणे वाया गेल्यास किंवा शेतकरी पीक मोडून दुसरे पीक घेण्याच्या तयारीत असल्यास, मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग आयोजित करून प्रत्यक्ष उत्पादन नोंदवावे. उत्पादन पूर्णपणे शून्य येत असल्यास ग्रामस्तरीय समितीच्या उपस्थितीत तात्काळ पंचनामा करून 'शून्य उत्पादन' नोंदवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हास्तरीय सुकाणू समिती ठेवणार लक्ष

पिकांच्या उत्पादनाची आकडेवारी अचूक व वेळेवर उपलब्ध व्हावी यासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हास्तरीय सुकाणू समिती' स्थापन करण्यात आली आहे. ही समिती पीक कापणी प्रयोगांचे नियोजन, अंमलबजावणी आणि पर्यवेक्षणावर लक्ष ठेवेल. नैसर्गिक आपत्तीच्या काळात पीक वेळापत्रकानुसार कापणी शक्य नसल्यास, विमा कंपनीस सात दिवस आधी लेखी कळवून वेळेआधी प्रयोग आयोजित केले जाणार आहेत.

बेलोरा विमानतळ महागडं, ८ हजाराच्या तिकिटावर कोण जाणार ?

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

राजकीय पुढारी झोपले का ?

अमरावती, दि. २३ : विमानाच्या तिकीट दरात शासनाकडून सवलत देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले असले तरी सध्या तिकिटांचे दर वाढलेले असल्याचे दिसून येत आहे. १८ एप्रिल पासून खऱ्या अर्थाने विमान प्रवाशांना घेऊन टेक ऑफ झाले. त्यामुळे पहिल्याच दिवसापासून प्रवासामध्ये काहीशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. विमान सेवेसाठी आतुरलेल्या प्रवाशांचा हिरमोड झाला आहे. तिकीट वाढली असतानाही राजकीय पुढारी मात्र मुंग गिळून का आहे असा प्रश्न सर्वसामान्य अमरावती करांनी उपस्थित केला आहे.

अमरावती विमानतळाचे बुधवारी उद्घाटन झाले. तेव्हापासून आठवड्यातून तीन दिवस विमानसेवा सुरू झाली आहे. सोमवार बुधवार शुक्रवार असे तीन दिवस येथून विमानाचे टेकऑफ व लँडिंग होत आहे. सदर विमानतळ उड्डाण योजनेअंतर्गत विकसित करण्यात आले असून ही एक प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजना आहे. या माध्यमातून लहान आणि मध्यम शहरांना हवाई सेवेने जोडण्याची उद्दिष्ट आहे. या योजनेचा मुख्य उद्देश विमान प्रवास सामान्य प्रवाशांसाठी परवडणारा आणि सोयीस्कर बनवणे आहे. त्यामुळे तिकीट दरावर शासनाकडून सवलत देण्यात येत असून त्यानुसार २१०० रुपयापासून ४००० रुपयांपर्यंत तिकीट दर राहतील असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी एम ए डी सी कडून उद्घाटनापूर्वी सांगण्यात आले होते. या समृद्धीमुळे विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सवलतीच्या फरकातील रक्कम शासनाकडून विमान सेवा देणाऱ्या कंपनीच्या खात्यात जमा होणार आहे. मात्र आता उद्घाटन झाल्यानंतर २१ एप्रिल पासून अलायन्स इयर च्या संकेतस्थळावर तिकीटांचे दर किमान ८६१० दाखविले जात आहे. त्यामुळे प्रवासामध्ये संभ्रम अवस्था निर्माण झाली आहे. अर्थात ही सवलत सर्व प्रवाशांना लागू नसून ५० टक्के प्रवाशांनाच मिळणार असल्याचे आता प्रशासनाकडून सांगण्यात आले. पहिले और शूट पाव असे धोरण कंपनीने घेतले असल्याचे दिसून येते. अमरावती विमानतळावरून प्रवाशांना २१०० रुपयात प्रवास मुंबई पर्यंत करण्यात येत होता. असा गवगवा राजकीय पुढाऱ्यांनी केला मात्र परिस्थिती वेगळीच आहे. एका प्रवाशाला आठ हजार रुपये मोजावे लागणार आहे. ही युवान सेवा प्रवाशासाठी आता डोकेदुखी ठरली आहे. राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या स्वार्थासाठी ही विमानसेवा आणली काय असा प्रश्न आता सर्वसामान्य अमरावतीकारांना पडला आहे. एकही राजकीय पुढारी या तिकीट दर वाढीवर बोलायला तयार नाही. फक्त उद्घाटन, नेते, व लोकांना उल्लू बनवण्याचे प्रकार सध्या अमरावती सुरू आहे. सर्वसामान्य लोकांना मुंबईपर्यंत जाण्याची विमानाने इच्छा होती परंतु आता ती ढिसळ झाली आहे. आठ हजारात सर्वसामान्य माणूस मुंबईत जाणार नाही अशी प्रतिक्रिया अनेक अमरावती करांनी दिली आहे. उद्घाटनापूर्वी राजकीय नेत्यांनी मोठा गावगावा केला. मात्र तिकिटाचे दर आठ हजाराच्या वर दाखवले असताना एकही नेता तोंड उघडायला तयार नाही. त्यामुळे ही जनतेची सर्रास फसवणूक राजकीय पुढाऱ्याकडून केली जात आहे.

> **विमान ७२ असं क्षमतेची असून त्यापैकी ५० टक्के प्रवाशांना सवलत लागू राहणार आहे. सर्वच प्रवाशांना सवलत देणे शासनाला शक्य नाही आणि कंपनीलाही एवढ्या घरात विमान सेवा देणे पाठवणारे नाही.**
> **- अमरदीप सिंग, विमानतळ संचालक.**

महात्मा फुले विचार साहित्य संमेलन २८ व २९ नोव्हेंबरला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती दि. २३ : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भाषा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सव वर्षा निमित्त महात्मा फुले विचार साहित्य संमेलनाचे आयोजन अमरावती येथे २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या साहित्य संमेलनाचे आयोजन जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद व श्री गुरुदेव सेवा श्रम ट्रस्ट राधानगर अमरावती यांच्यावतीने करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक उपक्रमाला अमरावती शहरातील मराठा सेवासंघ व त्याचे सर्व कक्ष, संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक मंडळ, महात्मा फुले द्वी शताब्दी जन्मोत्सव समिती, दि विदर्भ माळी शिक्षण संस्था, उपेक्षित समाज सेवा समिती, आदिसंपदा, बांधिलकी प्रतिष्ठान,नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य अमरावती. अशा अनेक समविचारी संस्था सहकार्य करीत आहेत. या संमेलनात उद्घाटन समारंभ, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार, पुस्तकांचे प्रकाशन, तीन परिसंवाद, दोन कवीसंमेलने, कथाकथन समारोप समारंभ इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे. या संमेलनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून अनुदान मिळणार आहे. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी डॉ सतीश तराळ, डॉ.दिलीप काळे, डॉ.काशिनाथ बऱ्हाटे, वसंतराव वंडलकर,श्रीधरराव डहाके, रामदासजी सदर, बाळासाहेब महल्ले, अनंतराव हगोने प्रफुल्ल मंदा श्रीधर इत्यादी मंडळी परिश्रम घेत आहेत.



अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ www.ajinkyabharat.com

थोडक्यात

वाल्मिकी जयंती व निधीसाठी निवेदन

अमरावती : अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील शासकीय व निमशासकीय कार्यालयांत महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्याचे निर्देश द्यावेत, अयोध्या (उत्तर प्रदेश) येथे महर्षी वाल्मिकी आश्रम उभारण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी, तसेच सामदा काशीपूर येथील महर्षी वाल्मिकी मठासाठी निधी मंजूर करून वितरित करावा, अशी मागणी विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या पाचही जिल्ह्यांत जयंतीची अंमलबजावणी, अयोध्येतील आश्रम उभारणी आणि मठाच्या विकासासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर उमेश ढोणे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले अंजनगाव सुर्जी नगरपरिषद, एकनाथ वावरे, प्रकाश दंदे, उमेश दंदे, कैलास खोबरखेडे, अजय पसारी आणि बंडू हांतोडकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

३१ ऑक्टोबर रोजी पदवीप्रदान सोहळा

अमरावती : अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता अभियंता भवन (आयई हॉल), शेगाव नाका, अमरावती येथे 'पदवीप्रदान समारंभ २०२५' आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रसिध्दी प्रमुख डॉ. के. एस. वासणकर यांनी कळविले आहे. या समारंभाला विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान (व्हिएनआयटी), नागपूर चे संचालक, प्रा. डॉ. प्रेम लाल पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती चे प्राचार्य, डॉ. आशिष एम. महल्ले हे समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. सन १९६४ मध्ये स्थापन झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती हे विदर्भातील तंत्रशिक्षण क्षेत्रातील एक प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थान आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) सन २००६-०७ मध्ये स्वायत्त दर्जा प्रदान केल्यानंतर महाविद्यालयातील बी.टेक.ची पहिली तुकडी सन २०१० मध्ये पदवीधर झाली. यंदाचा समारंभ हा महाविद्यालयाच्या बी.टेक.च्या सोळाव्या तुकडीच्या पदवीदानाचा विशेष सोहळा आहे. या समारंभाच्या माध्यमातून अभियांत्रिकी शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात येणार आहे.

रविवारी 'उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमां'तर्गत जिल्ह्यात पायाभूत चाचणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

१४ हजार १८६ असाक्षरांची होणार चाचणी

अमरावती, दि. , दि. २३ : केंद्र शासन पुरस्कृत 'उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमां'तर्गत अमरावती जिल्ह्यात रविवार, २५ ऑक्टोबर रोजी 'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यांकन चाचणी' आयोजित करण्यात आली आहे. चाचणीसाठी १४ हजार १८६ असाक्षरांनी नोंदणी केली असून, यात ११ हजार ४३९ महिला आणि २ हजार ७४७ पुरुष असाक्षरांचा समावेश आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) सतिश मुगल यांनी दिली आहे.

देशातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसित करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यात या परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, केंद्रप्रमुख, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यांकन चाचणी' करिता रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० ते सायं. ५:०० या वेळेत परीक्षा केंद्र सुरू राहतील. प्रत्यक्ष चाचणी कालावधी ३ तासांचा असेल. तद दिव्यांग व्यक्तींसाठी ३० मिनिटे अतिरीक्त वेळ दिला जाणार आहे. परीक्षा एकूण १५० गुणांची असेल. यामध्ये भाग-क (वाचन) ५० गुण, भाग-ख (लेखन) ५० गुण, आणि भाग-ग (संख्याज्ञान) ५० गुण अशी गुण विभागणी असेल. उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागात स्वतंत्रपणे ३३ टक्के (१७ गुण) मिळवणे अनिवार्य आहे, तसेच एकूण १५० गुणांपैकी किमान ३३ टक्के (५१ गुण) मिळवणे आवश्यक आहे. कोणत्याही एका भागात गुण कमी पडल्यास नियमानुसार जास्तीत जास्त ५ 'ग्रेस गुण' (वाढीव गुण) दिले जातील. मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तेलगू, तमिळ, बंगाली आदी भाषांतून ही चाचणी पूर्णपणे ऑफलाइन पद्धतीने होणार आहे.

ज्या असाक्षर व्यक्तींची 'उल्हास ॲप'वर ऑनलाइन नोंदणी झालेली नाही, त्यांना चाचणीच्या दिवशीही नोंदणी करून परीक्षा देता येईल. यू-डायस क्रमांकानुसार नोंदणी झालेली प्रत्येक शाळा हेच परीक्षा केंद्र असेल. परीक्षेस जाताना स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो नोंदणी अर्जावर लावावा तसेच मतदान ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा बँक पासबुक या पैकी एक ओळखपत्र म्हणून सोबत ठेवणे आवश्यक आहे. या मूल्यमापन चाचणीत उत्तीर्ण होणाऱ्या नवसाक्षरांना केंद्रशासनाकडून प्रमाणपत्र/ गुणपत्रक देण्यात येणार आहे. शिक्षणाधिकारी तथा नवभारत साक्षरता कार्यक्रमाचे सदस्य सचिव सतिश मुगल यांनी सर्व परीक्षार्थींना शुभेच्छा दिल्या आहेत.

७३८ कोटी तून जिल्ह्याचा विकास पालकमंत्री बावनकुळे यांचे आश्वासन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

सिंचन वाढविण्यावर भर

अमरावती , दि. २३ : जिल्हा नियोजन समितीला ७३८ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून या निधीतून संपूर्ण जिल्ह्याचा विकास केला जाणार आहे. सिंचनावर मोठ्या प्रमाणात भर दिली जाणार असून तसेच शिक्षण आरोग्य यावरही मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जाणार आहे. तसेच पानंद रस्ते पूर परिस्थिती व कायदा व सुव्यवस्था याकडे लक्ष देणार असून जिल्ह्यातील बेसिक प्रश्नावर सुद्धा भर राहणार आहे. अमरावती जिल्ह्यासाठी कुठल्याही प्रकारे निधी खर्च कमी पडू देणार नाही असे आश्वासन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत दिले.

जिल्ह्यात विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला असून या निधीतून सर्वत्र विकास केला जाणार आहे. मोर्शी तालुक्यातील मानभावांची काशी असलेले रिद्धपूर येथे बजेटमध्ये चांगल्या प्रकारे व्यवस्था करण्यात आली आहे. विदर्भाच्या खार पान पट्ट्यात जलसिंचन व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच दर्यापूर येथे अतिरिक्त सत्र न्यायालय सुद्धा केले जाणार आहे. शेतकऱ्यांना आता वर्ग दोन च्या जमिनीवर कर्ज दिले जाणार आहे. तसेच



राज्यात जिवंत सातबारा योजना राबविली जाणार आहे. यामध्ये सर्व वारसदारांची नावे नमूद करण्यात येणार आहे. राज्यभर शिवाजी महाराज महसूल योजना राबवणार असून प्रत्येक जिल्ह्यातील तालुका ठिकाणी तसेच मोठ्या गावात ४०० शिबिरे घेण्यात येणार आहे. शिक्षण आरोग्य तसेच शहरात सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा बसविण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात लोकसंख्येचा व्याप पाहता पोलीस स्टेशन ची संख्या वाढविणे गरजेचे आहे. त्याचा विचार करून तसेच पोलिसांची जुन्या घरे नवीन केली जाणार आहे. अमरावती परतवाडा हा नवीन नॅशनल हायवे आमदार प्रवीण काळे यांच्या मागणीवरून सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद नगरपालिका शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी सुद्धा प्रयत्न केले जाणार आहे. पालकमंत्री बावनकुळे यांनी जि प सीईओ, मनपा आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी केलेला कामाचा आढावा पत्रकार परिषदेत घेतला. तसेच घरकुल योजनेवर सुद्धा लक्ष दिले जाणार आहे. कोणीही घरकुला पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे. पत्रकार परिषदेला पालकमंत्री बावनकुळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, सीईओ संगीता महापात्र, मनपा आयुक्त कलंत्री, आमदार आमदार प्रताप अडसड, आमदार प्रवीण तायडे, प्रवीण पोटे, आमदार केवल राम काळे, रवी देशमुख यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होते.

३० ऑक्टोबरला जिल्हास्तरीय युवा महोत्सव

'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्पनेवर स्पर्धा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुलाच्या बहुउद्देशीय हॉलमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव पार पडणार आहे. या महोत्सवात 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' या संकल्पनेवर आधारीत स्पर्धां आयोजित करण्यात येणार आहे.

विकसित भारत युवा नेतृत्व संवाद अंतर्गत स्पर्धा घेण्यात येणार आहे. युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. जानेवारी २०२७ मध्ये दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा जिल्हास्तरीय महोत्सव आयोजित केला आहे. यात समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, पथनाट्य, चित्रकला, कविता लेखन या स्पर्धा घेण्यात येणार आहे.

यात सहभागी होणाऱ्या युवक-युवतींचे वय १७ ऑगस्ट २०२७ रोजी १५ ते २९ वर्षे असावे. इच्छुक स्पर्धकांनी माय भारत पोर्टलवर नोंदणी करणे आणि गुगल फॉर्मद्वारे प्रवेश नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेशिकेची हार्ड कॉपी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करावी. एक युवक केवळ एकाच स्पर्धा प्रकारात सहभाग घेऊ शकेल. जिल्ह्यातील रहिवासी किंवा जिल्ह्यात शिक्षण घेत असलेले तरुणच या महोत्सवात सहभागी होऊ शकतील. मागील वर्षाच्या सांस्कृतिक विभागातील सहभागी युवकांना यावर्षीच्या स्पर्धेमध्ये सहभाग घेता येणार नाही.

प्राविण्य प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना जिल्हास्तरावर रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे, युवक मंडळे, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था, एनएसएस, भारत स्काऊट अँड गाईड यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

समाजकल्याण स्थापना दिन: उपायुक्त राजेंद्र जाधवर यांचा सन्मान

नशाबंदी मंडळाच्या वतीने अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव; पत्रक वितरणासह वाचन प्रेरणा दिन साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : समाजकल्याण स्थापना दिनाचे औचित्य साधून नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, जिल्हा अमरावती यांच्या वतीने समाजकल्याण विभागाचे उपायुक्त राजेंद्र जाधवर यांना कृतज्ञता सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वागत करून त्यांच्या सामाजिक योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी समाजकल्याण कार्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आला.



नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, जिल्हा अमरावतीचे जिल्हा संघटक प्रफुल्ल मंदा श्रीधर कुकडे यांच्या आयोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांसाठी कार्य करणाऱ्या समाजकल्याण विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांप्रती आदर व्यक्त करणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. या प्रसंगी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अमरावती जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे, महिला राजसत्ता आंदोलनाच्या जिल्हा समन्वयक प्रतिभा खापरे, क्रांती मीडियाचे सचिन वासनिक आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे संजय खापरे उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत उपायुक्त राजेंद्र जाधवर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वागत करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

वाचन संस्कृती आणि व्यसनमुक्तीचा संदेश

कार्यक्रमाच्या निमित्ताने वाचन प्रेरणा दिनही साजरा करण्यात आला. वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाचा प्रसार व्हावा आणि समाजात वैचारिक जागृती घडावी, या उद्देशाने जनजागृतीपर पत्रकांचे वितरण करण्यात आले. यासोबतच व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगून व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाचन माणसाला विचार करायला शिकवते,

आ. बच्चू कडू यांच्यासह सहा जणांवर गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : वेकोलिमध्ये भूमिपुत्रांना ८० टक्के नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याच्या मागणीसाठी काढण्यात आलेल्या विनापरवानगी पदयात्रा आणि त्यानंतर झालेल्या सभेतील कथित आक्षेपार्ह वक्तव्यांप्रकरणी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्यासह सहा जणांविरुद्ध घुग्घुस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेकायदेशीरपणे गर्दी जमवणे, पोलिसांविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणे आणि धमकीवजा वक्तव्ये केल्याचे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.

आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली १८ ऑक्टोबर रोजी यवतमाळ जिल्ह्यातील साखरा येथून चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुसमधील कारगिल चौकापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. यावेळी 'त्रिशुल आंदोलन'ही करण्यात आले. या आंदोलनासाठी कोणतीही कायदेशीर पूर्वपरवानगी घेतलेली नव्हती. परवानगीशिवाय गर्दी जमवून शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही आयोजकांवर ठेवण्यात आला आहे. कारगिल चौकातील सभेला संबोधित करताना कडू यांनी पोलिस प्रशासन आणि वेकोलि व्यवस्थापनावर आरोप केले. वेकोलिने प्रशासनाला विकत घेतले आहे, असा आरोप त्यांनी केला. तसेच कर्तव्यावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध अश्लील भाषेचा वापर करत धमकी दिल्याचा आरोप आहे. तहसीलदारांना पाठवले, तर त्यांना पुलाखाली फेकून देऊ, असे वक्तव्य भाषणादरम्यान करण्यात आले. या वक्तव्यांच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

गाडगेबाबा प्राथमिक शाळेत 'समतेचा गरबा' उत्साहात

विद्यार्थी, शिक्षक व माता-पालकांचा उत्स्फूर्त सहभाग; समता, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकीचा जागर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारे संचालित श्री.गाडगेबाबा प्राथमिक शाळेत शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी 'समतेचा गरबा' हा सांस्कृतिक उपक्रम उत्साहात संपन्न झाला. शाळेतील शिक्षिका आणि माता-पालक यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षक, कर्मचारी आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पारंपरिक गरब्याच्या माध्यमातून समता, बंधुभाव, सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला.



प्रमुख उपस्थितांमध्ये ज्येष्ठ साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या आशाताई फुसे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अमरावती जिल्हा विविध उपक्रम कार्यवाह आशिष देशमुख, भाई प्रफुल्ल मंदा श्रीधर — जिल्हा कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती, विजय डवरे — जिल्हा प्रधानसचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती तसेच प्रतिभा खापरे — जिल्हा समन्वयक, महिला राजसत्ता आंदोलन, अमरावती यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने माता-पालक उपस्थित होते.

सांस्कृतिक परंपरेतून समतेचा संदेश

'समतेचा गरबा' ही संकल्पना केवळ सांस्कृतिक मनोरंजनापुरती मर्यादित न राहता समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारी ठरली. जात, धर्म, पंथ किंवा सामाजिक स्तर यांतील भेद बाजूला ठेवून परस्परांविषयी आदर, बंधुभाव आणि समानतेची भावना जोपासण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी एकत्रितपणे गरब्यात सहभाग घेतल्यामुळे शाळेतील सामूहिकता आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले.

संत गाडगेबाबांच्या विचारांचा संस्कार

संत गाडगेबाबांनी आपल्या जीवनकार्यातून स्वच्छता, समता, मानवता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि माणुसकीची मूल्ये रुजविणे महत्त्वाचे आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासोबतच त्यांच्यात सहकार्य, शिस्त, परस्परांविषयी आदर आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव विकसित होण्यास मदत होते.

शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे उपक्रम यशस्वी

शाळेतील शिक्षिका, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि माता-पालक यांच्या समन्वयातून हा उपक्रम साकार झाला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा सहभाग आणि शिक्षकांचे सहकार्य यामुळे कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक संदीप यादव यांनी शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांना दिले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे 'समतेचा गरबा' हा सांस्कृतिक उपक्रम शिक्षणासोबत सामाजिक मूल्ये आणि संस्कारांची रुजवण करणारा ठरला.

विद्यापीठात 'शी-बॉक्स पोर्टल' हाताळण्याबाबत मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

वुमेन्स स्टडीज सेंटर व अंतर्गत तक्रार समितीचे संयुक्त आयोजन

अमरावती , दि. २३ : 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' हा कायदा केवळ स्त्रियांसाठीच महत्त्वाचा नसून तो विकसित आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठीही महत्त्वपूर्ण आहे. कार्यस्थळावर लैंगिक छळापासून संरक्षण मिळाल्याने स्त्रियांना निश्चितच अधिक कार्यक्षमतेने कार्य करता येते.



त्यांच्या गुणवत्तेला सुरक्षित पर्यावरण मिळाल्याने त्याचा फायदा त्यांना स्वत:ला तर होतोच, सोबतच त्या कार्यरत असणाऱ्या संस्था, समाज आणि राष्ट्राला देखील होतो. स्त्रियांमध्ये या कायद्याविषयी जाणीवजागृती वाढत आहे, ही चांगली बाब आहे. मात्र पुरुषांमध्ये त्याबाबत अजूनही काही गैरसमज आहेत, ते दूर करण्यासाठी आणि सुरक्षित कार्यस्थळ घडवण्यासाठी पुरुषांमध्येही त्याबाबत जाणीवजागृती होणे आवश्यक आहे. म्हणूनच भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाद्वारे सुरू करण्यात आलेल्या शी-बॉक्स पोर्टलला हाताळण्याची प्रक्रिया कार्यस्थळावरील सर्व कर्मचाऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ही कार्यशाळा अतिशय महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात 'शी-बॉक्स पोर्टल : हाताळण्याबाबत मार्गदर्शन' या विषयावर ऑफलाइन व ऑनलाइन पद्धतीने आयोजित विद्यापीठस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. विचारमंचावर वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, सहसमन्वयक डॉ. वैशाली धनविजय, अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष डॉ. कल्पना जावळे, सचिव डॉ. सुलभा पाटील यांसह विषयतज्ज्ञ ॲड. ज्योती खांडपासोळे उपस्थित होत्या.

अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष डॉ. कल्पना जावळे यांनी या कायद्याची, अंतर्गत तक्रार समित्यांची सद्यस्थिती आणि शी बॉक्स पोर्टलची उपयुक्तता सांगितली. तर समितीच्या सचिव डॉ. सुलभा पाटील यांनी विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार समितीची माहिती विकास विभागाला त्वरित पाठवण्यासाठीचे आवाहन केले.

कार्यशाळेच्या मुख्य सत्रात 'शी-बॉक्स पोर्टल' हाताळण्याबाबत मार्गदर्शन' याविषयावर ॲड. ज्योती खांडपासोळे यांनी मांडणी केली. त्यांनी आपल्या मांडणीत कायद्याची पार्श्वभूमी, भूमिका, उद्देश, कायद्यातील व्याख्या स्पष्ट केल्या. सोबतच विविध प्रकरणांचा घेऊन अंतर्गत तक्रार समितीच्या कार्यपद्धतीवर संदर्भांसहित भाष्य केले. सोबत 'शी-बॉक्स पोर्टल' चे स्वरूप, स्थिती आणि आपली भूमिका याबाबत सहभागी सदस्यांना मार्गदर्शन केले. तर त्यांचे सहकारी मुकेश वानखडे यांनी शी बॉक्स पोर्टल हाताळण्याची प्रक्रिया आणि त्यातील विविध पायऱ्या याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. वैशाली गुडधे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा मागील पंधरा वर्षांमध्ये या कायद्याबाबत घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची त्यांनी माहिती दिली. तसेच कायद्याविषयी जाणीव जागृती वाढवण्यात सेंटरचा असणारा पुढाकार व भूमिका स्पष्ट केली. लैंगिक छळ थांबवण्यासाठी कायद्यासोबतच समाजात लिंगभाव संवेदनशीलता विकसित होणे आवश्यक आहे, त्यासाठी सेंटरद्वारा सातत्याने करण्यात येणाऱ्या कार्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. भगवान फाळके यांनी केले. कार्यशाळेला विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील अंतर्गत तक्रार समिती सदस्यांसह विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील शिक्षक, विद्यार्थी, संशोधक आणि प्रशासकीय अधिकारी व कमर्चारी यांची ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही प्रकारे मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महत्त्वाचे

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सूट

यवतमाळ : राज्य शासनाने दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांतील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने जिल्हा परिषद, यवतमाळच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी जिल्ह्यातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित शाळांच्या प्राचार्य आणि मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असे निर्देश दिले आहेत. राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने तसेच जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार ही कार्यवाही करण्यात येत आहे. राज्य मंडळाच्या दहावी, बारावी तसेच कोणत्याही परीक्षांसाठी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. यापूर्वी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेण्यात आले असल्यास ते संबंधित विद्यार्थ्यांना परत करावे, असेही सूचित करण्यात आले आहे. परीक्षा शुल्क भरले नाही, या कारणामुळे एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता सर्व प्राचार्य व मुख्याध्यापकांनी घ्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी केले आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी करून त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणारा आहे.

रांगोळीतून साकारली माँ दुर्गेची हुबेहूब प्रतिकृती

घाटंजी : घाटंजीपासून तीन किलोमीटर अंतरावरील मानोली येथील



कु. क्षकुली पांडुरंग सोनुले हिने नवरात्रोत्सवादरम्यान रांगोळीच्या माध्यमातून माँ दुर्गेची हुबेहूब प्रतिकृती साकारली. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत शिक्षण घेत कलेची जोपासना करणाऱ्या क्षकुलीच्या या कलाकृतीचे गावासह संपूर्ण तालुक्यात कौतुक होत आहे. केळापूर देवस्थान येथेही तिने मैत्रिणींसोबत माँ जगदंबेची प्रतिकृती साकारून कलागुण दाखविले. घाटंजी : कु. क्षकुली पांडुरंग सोनुले ही घाटंजी येथील निशा आर्ट गॅलरीची विद्यार्थिनी आहे. घरची परिस्थिती हलाखीची असतानाही तिने चित्रकलेची आवड जपली आहे. सध्या ती एम.ए. द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत आहे. नवरात्रीच्या काळात तिने रांगोळीच्या माध्यमातून माँ दुर्गेची आकर्षक आणि हुबेहूब प्रतिकृती साकारली. तिच्या कलाकृतीतील बारकावे आणि सादरीकरणाने अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मानोली गावासह घाटंजी तालुक्यात तिच्या कलेचे कौतुक होत आहे. क्षकुलीने केळापूर देवस्थान येथेही आपल्या मैत्रिणींसोबत रांगोळीतून माँ जगदंबेची प्रतिकृती साकारली. या कलाकृतीतून तिने आपली कलात्मक क्षमता पुन्हा सिद्ध केली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण आणि कला यांची सांगड घालणाऱ्या क्षकुलीच्या मेहनतीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तिच्या या यशामुळे तिच्या कलाप्रवासाला प्रोत्साहन मिळत आहे.



पीडीकेव्ही स्मार्ट व्हिलेजमधून गावाचा सर्वांगीण विकास शक्य

यवतमाळ : जिल्ह्यातील लासिना व यावली येथे १७ ऑक्टोबर रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या स्मार्ट मॉडेल व्हिलेज उपक्रमांतर्गत क्षेत्रीय भेट व मार्गदर्शन कार्यक्रम झाला. कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ-१ यांच्या आयोजनातून विविध विभागांच्या समन्वयाने आधुनिक तंत्रज्ञान, खर्चकपात आणि पूरक व्यवसायांद्वारे तीन वर्षांत गावाचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषी विज्ञान केंद्राने प्रमुख समन्वयक म्हणून गावविकासाचे नियोजन करावे, असे आवाहन केले. विद्यापीठाच्या चार सूत्रांनुसार कृषी व संलग्न विभागांनी एकत्रित काम करण्यावर त्यांनी भर दिला. विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. डी. बी. उंदिरवाडे यांनी आधुनिक तंत्रज्ञानातून उत्पादकता वाढविणे, यांत्रिकीकरणातून खर्च कमी करणे, मूल्यसाखळी विकसित करणे आणि पूरक व्यवसाय वाढविणे ही चार सूत्रे स्पष्ट केली. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. दीपक कच्छवे यांनी उपक्रमाचे महत्त्व सांगितले. अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय माने यांनी कृषी प्रक्रिया उद्योगांबाबत मार्गदर्शन केले. कृषी विभाग, आत्मा, महाबीज, नाबार्ड, पशुसंवर्धन आणि रेशीम विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासकीय योजनांची माहिती दिली. लासिना सरपंच ज्योतीताई दुधे यांनी सहकार्याचे आश्वासन दिले. मान्यवरांनी महिला बचत गटांच्या उपक्रमांची आणि यावलीतील शेतकरी दिलीप गणेशलाल जयस्वाल यांच्या शेताची पाहणी केली. कार्यक्रमाचे संचालन कृषी अभियांत्रिकी शास्त्रज्ञ राहुल चव्हाण यांनी केले. आभार शास्त्रज्ञ मयूर ढोले यांनी मानले.

आदिवासी मुलामुलींच्या वसतिगृहासाठी भाडेतत्वावर इमारतीची आवश्यकता

यवतमाळ : उमरखेड येथील आदिवासी मुलामुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी उमरखेड शहरात सर्व सोयीसुविधांनीयुक्त इमारत भाड्याने घेण्यात येणार असून, इच्छुक इमारत मालकांनी वसतिगृहाच्या गृहपालांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. इमारतीत मुलांसाठी ३००० चौ. फूट व मुलींसाठी ३००० चौ. फूट बांधलेल्या खोल्या, कार्यालयाकरिता स्वतंत्र खंली, स्वयंपाकगृह, कोठीगृह, डायनिंग हॉल व वाचनालयासाठी स्वतंत्र रुम, किमान ४ स्नानगृहे व ४ शौचालये, मुबलक पाणीपुरवठा तसेच शक्य असल्यास क्रीडांगण असणे आवश्यक आहे. इमारत भाड्याने देण्यास इच्छुकांनी संमतीपत्र व प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन गृहपाल यांनी केले आहे. तसेच अधिक माहितीसाठी ९५१८९२७९२० / ९६८९४१४२४० / ८९२८९०७८१७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पीककर्जासाठी शेतकऱ्यांची फरफट

तलाठी कार्यालयांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह, महसूल सेवांतील विलंबामुळे शेतकरी त्रस्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ अमोल कावळे



घाटंजी, दि. २३ : तालुक्यात नवीन पीककर्ज मिळविण्यासह शेतीविषयक कामांसाठी आवश्यक महसुली कागदपत्रे मिळविताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. सातबारा, आठ-अ उतारा, फेरफार नोंदी आणि बोजासंबंधीच्या कामांसाठी वारंवार कार्यालयात जावे लागत असल्याने शेतकऱ्यांचा वेळ व श्रम खर्ची पडत आहेत. तलाठी कार्यालयांच्या वेळा, कामकाजातील विलंब आणि ऑनलाइन सेवांच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी होत आहे.

पीककर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करताना शेतकऱ्यांना विविध प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. नवीन कर्जासाठी सातबारा उतारा, आठ-अ उतारा, फेरफार नोंदी, कर्जाचा बोजा कमी करण्यासंबंधीच्या नोंदी आणि नावातील तफावत दुरुस्त करून अद्ययावत कागदपत्रे मिळविणे आवश्यक असते. मात्र, या कामांसाठी वारंवार तलाठी कार्यालयात जावे लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शेतीच्या हंगामात वेळेत कर्ज उपलब्ध होणे महत्त्वाचे असताना कागदपत्रांच्या प्रक्रियेत होणारा विलंब अडचणी वाढवू शकतो. घाटंजी तालुक्यातील काही तलाठी कार्यालयांमध्ये संबंधित कर्मचारी उशिरा उपस्थित राहत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. काही ठिकाणी दुपारनंतर कामकाज सुरू होत असल्याचा आरोपही चर्चेत आहे. तसेच, अनधिकृत व्यक्तींकडे शासकीय दस्तऐवज सोपवून कामकाज केले जात असल्याची चर्चा असल्याने या बाबींची अधिकृत चौकशी होण्याची आवश्यकता आहे. तथापि, या आरोपांची स्वतंत्रपणे पडताळणी झालेली नसल्याने प्रशासनाने प्रत्यक्ष परिस्थिती तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे. महसूल विभागाच्या विविध सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. डिजिटल प्रणालीमुळे नागरिकांना आवश्यक उतारे आणि महसुली नोंदी सुलभतेने मिळणे अपेक्षित आहे. मात्र, ऑनलाइन अर्ज करूनही कार्यालयात वारंवार जावे लागत असल्यास या सुविधांच्या परिणामकारकतेचा आढावा घेणे आवश्यक ठरते. तांत्रिक अडचणी, नोंदी अद्ययावत करण्यास लागणारा वेळ किंवा कार्यालयीन स्तरावरील विलंब यांमुळे सेवा प्रभावित होत आहेत का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. तलाठी कार्यालयांचे कामकाज, कार्यालयीन वेळांचे पालन, शासकीय अभिलेखांची सुरक्षितता आणि अर्जांचा निपटारा यांची वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शेतकऱ्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागू नये, यासाठी तक्रार निवारण व्यवस्था प्रभावी करावी. संबंधित तक्रारींची निष्पक्ष पडताळणी करून अनियमितता आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पारदर्शकता कशी वाढेल?

महसूल कार्यालयांमधील कामकाज अधिक पारदर्शक करण्यासाठी कार्यालयीन वेळा स्पष्टपणे प्रदर्शित करणे, अर्ज स्वीकारल्याची पोच देणे आणि प्रकरणाच्या सद्यस्थितीची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देणे उपयुक्त ठरू शकते. प्रत्येक अर्जासाठी जबाबदार कर्मचारी निश्चित केल्यास विलंबाची कारणे शोधणे सोपे होईल. ऑनलाइन नोंदी नियमितपणे अद्ययावत करणे, तक्रारींची नोंद घेणे आणि त्यांच्या निवारणासाठी कालमर्यादा ठरविणे आवश्यक आहे. अशा उपाययोजनांमुळे नागरिकांचा वेळ वाचून प्रशासनावरील विश्वास वाढण्यास मदत होऊ शकते.

पीककर्जासाठी कागदपत्रे महत्त्वाचे?

शेतीच्या हंगामात बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी शेतकऱ्यांना भांडवलाची आवश्यकता असते. पीककर्ज मंजुरीच्या प्रक्रियेत आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाल्यास अर्जातील त्रुटी दूर करणे आणि पुढील कार्यवाही पूर्ण करणे सुलभ होऊ शकते. कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी विलंब झाल्यास कर्जप्रक्रिया लांबण्याची शक्यता असते. त्यामुळे महसुली नोंदी अद्ययावत ठेवणे, अर्जांची स्थिती स्पष्ट करणे आणि संबंधित सेवा निर्धारित वेळेत उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.

दिग्रसमध्ये शारदा देवी उत्सवाची धूम

विविध कार्यक्रमांचे आयोजन, उत्सवात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



दिग्रस, दि. २३ : येथील श्रीराम विहार परिसरातील महादेव मंदिरात शारदा देवीची स्थापना करण्यात आली असून, यानिमित्त धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी रांगोळी, संगीत खुर्ची आणि गरबा यांसारखे कार्यक्रम होत आहेत. या उपक्रमांना परिसरातील महिला आणि तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शारदा देवी उत्सवानिमित्त मंदिर परिसरात विविध उपक्रमांमुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महिलांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमांना विशेष रंगत आली आहे. दररोज सायंकाळी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा आणि गरब्यासह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या उपक्रमांमध्ये परिसरातील महिला आणि तरुणी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. उत्सवातील कार्यक्रमांच्या आयोजनासाठी अश्विनी मदने, अंजु आढाव, पुष्पा राठोड, पुष्पा आडे, ममता ठाकरे, विजया ठाकरे, सुनीता राठोड, वर्षा राठोड, माधवी निळे, नलिनी खंडारे, अर्चना राऊत, अश्विनी घाडगे, सविता डिके, संगीता अस्वार, वैशाली चिरडे, कविता लाखेकर, संगीता पवार, चंचल राऊत, पोहरेकर आणि विद्या चिरडे आदी परिश्रम घेत आहेत. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमुळे उत्सवात महिलांचा सहभाग वाढला आहे. विविध कार्यक्रमांमधून परिसरातील महिलांना एकत्र येण्याची संधी मिळत आहे.

मानगड धामला राष्ट्रीय स्मारक घोषित करा

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून स्मारकाची मागणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २३ : विदर्भ वनवासी कल्याण आश्रम, जिल्हा यवतमाळच्या वतीने राजस्थानमधील बांसवाडा जिल्ह्यातील मानगड धामला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जनजाती समाजाच्या स्वातंत्र्यलढ्यातील बलिदानाला राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळावा आणि भावी पिढ्यांना इतिहासाची प्रेरणा मिळावी, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात जनजाती समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक जनजाती बांधवांनी प्राणांचे बलिदान दिले. राजस्थानमधील मानगड धाम येथे १७ नोव्हेंबर १९१३ रोजी ब्रिटिश सैन्याने जनजाती समाजावर भीषण गोळीबार केला होता. या नरसंहारात दीड हजारांहून अधिक महिला, पुरुष आणि बालकांनी प्राण गमावल्याचे सांगितले जाते. हा नरसंहार जालियनवाला बाग हत्याकांडापेक्षाही भयानक होता, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. जनजाती समाजाचा शौर्यपूर्ण इतिहास, त्याग आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित होणे आवश्यक आहे. मानगड धामला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळाल्यास भावी पिढ्यांना या ऐतिहासिक घटनेतून प्रेरणा मिळेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी विदर्भ वनवासी कल्याण आश्रमाचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष केदारजी गलगलीकर, जिल्हा सचिव राजुभाऊ उईके, संघटन मंत्री लोढोबा, पुसदचे श्रद्धा जागरण प्रमुख दामरेजी, अंभोरेजी, विदर्भ प्रांत सहसंघटन मंत्री गोपालजी घोटी, जिल्हा कोषप्रमुख गणेशजी नागोसे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरातील सर्वच बुद्धविहारांचे परिसर स्वच्छ करू

नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके : आगामी कार्यक्रमांबाबत विशेष आढावा बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २३ : शहरात अधिन पौर्णिमेनिमित्त वर्षावास समापनाचे धार्मिक व सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. या पार्श्वभूमीवर गुरुवारी, (दि. २२) नगर परिषद समिती सभागृहात नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. बुद्धविहार परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. शहरातील सर्व बुद्धविहार परिसरांच्या स्वच्छतेला प्राधान्य देण्यात येईल, असे नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी आयोजित आढावा बैठकीत सांगितले.

बैठकीत नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी शहरातील विविध बुद्धविहार समित्यांच्या अध्यक्ष व सचिवांशी संवाद साधला. त्यांनी परिसरातील स्वच्छता, कचरा संकलन, विल्हेवाट आणि आवश्यक नागरी सुविधांबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या. कार्यक्रमांच्या काळात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. बुद्धविहार परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने नियोजनबद्ध कार्यवाही करण्यावर बैठकीत भर दिला. कचरा संकलन व विल्हेवाटीची व्यवस्था प्रभावी ठेवण्याबाबत संबंधित विभागप्रमुखांना सूचना देण्यात आल्या. तसेच आवश्यकतेनुसार घंटागाड्यांची उपलब्धता आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांची व्यवस्था सुनिश्चित करण्याचे निर्देश नगराध्यक्षांनी दिले. सर्व बुद्धविहार परिसरांत स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवावी आणि आवश्यक कामे तातडीने पूर्ण करावीत, असे त्यांनी स्पष्ट केले. समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. वर्षावास समापनाच्या कार्यक्रमांपूर्वी स्वच्छतेची कामे पूर्ण करून आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश बैठकीत देण्यात आले. स्वच्छतेच्या कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये, याची दक्षता घेण्यासही संबंधित विभागांना सांगण्यात आले. धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी बुद्धविहार परिसर स्वच्छ, सुंदर व सुस्थितीत ठेवण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने निश्चित केले आहे. नागरिकांना कार्यक्रमांच्या वेळी चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व संबंधित विभागांनी जबाबदारीने काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

प्रतीक्षा गुरनुले यांची राज्य प्रवक्तेपदी निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

मारेगाव, दि. २३ : येथील युवा वक्त्या, लेखिका, कवयित्री आणि



निवेदिका प्रतीक्षा विठ्ठलराव गुरनुले यांची मराठा सेवा संघ प्रणित वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेच्या राज्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली. परिषदेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. दिलीप चौधरी (चंद्रपूर) यांनी ही नियुक्ती केली. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेतल्याने पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

प्रतीक्षा गुरनुले या उत्तम वक्त्या आणि वादविवादपटू असून सामाजिक व राजकीय घडामोडींवर परखड भाष्य करतात. त्या शिव-फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीत सक्रिय कार्यकर्त्या म्हणून कार्यरत आहेत. मागील सात वर्षांपासून त्या व्याख्यानांच्या माध्यमातून महामानवांच्या विचारांचा समाजात सातत्याने प्रचार आणि प्रसार करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची जाण, प्रभावी वक्तृत्व आणि सामाजिक लिखाण ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये आहेत. पुरोगामी सामाजिक चळवळीतील सक्रिय सहभागामुळे त्यांची राज्य प्रवक्तेपदी निवड झाली. या नियुक्तीमुळे त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेतली गेल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी नगरपरिषदेचा कृती आराखडा

आर्णी नगरपरिषद नळगळती रोखणार, नवीन बोअरवेल आणि जलवाहिन्यांच्या कामांना प्राधान्य

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि. २३ : अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भूजलपातळीत घट झाली असून, आगामी पावसाळ्यापर्यंत उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आर्णी नगरपरिषदेत २१ ऑक्टोबर रोजी पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या निर्देशानुसार झालेल्या या बैठकीत शहरातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.



बैठकीला नगरपरिषदेचे अध्यक्ष नालंदा भरणे, उपाध्यक्ष निलेश गावंडे, मुख्याधिकारी रविंद्र राऊत तसेच नगरपरिषदेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. शहरात पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी मनुष्यबळाची उपलब्धता वाढविणे, नवीन नळजोडण्यांची कामे आवश्यकतेनुसार गतीने पूर्ण करणे आणि पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटी दूर करणे यावर भर देण्यात आला. ज्या भागांत जलवाहिनी उपलब्ध नाही, त्या परिसरातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी जवळच्या विहिरींचे आवश्यकतेनुसार अधिग्रहण करण्याचा पर्याय विचारात घेतला जाणार आहे. तसेच नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अद्याप जलवाहिनी टाकण्यात न आलेल्या भागांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. गरज भासल्यास नवीन बोअरवेलची कामेही हाती घेण्यात येतील. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी नळांना तोट्या नसलेल्या ग्राहकांचे सर्वेक्षण करून त्यांना सूचना देण्यात येणार आहेत. नियमांचे पालन न केल्यास पहिल्यांदा ५०० रुपये आणि दुसऱ्यांदा १,००० रुपये दंड आकारण्याची, तसेच आवश्यकतेनुसार नळजोडणी बंद करण्याची तरतूद करण्यात आली आहे. नव्या पाइपलाइनवरील गळती तातडीने दुरुस्त करण्यासही प्राधान्य दिले जाणार आहे. पाणी वाया जाण्याच्या प्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता पथक तयार करण्यात येणार असून, नागरिकांमध्ये पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती केली जाईल. संभाव्य टंचाईची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून पाण्याचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. उपलब्ध जलसाठा पुढील पावसाळ्यापर्यंत पुरविणे हे प्रशासनासमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. त्यामुळे ठरविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, गळती नियंत्रण आणि नागरिकांचा सहभाग यांद्वारे आर्णी शहरातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्याचा नगरपरिषदेचा प्रयत्न राहणार आहे. सहकार्य अपेक्षित आहे.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ | www.ajinkyabharat.com

यवतमाळ जिल्ह्यात शिक्षकांचे ५९.९१ टक्के मतदान

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक : जिल्ह्यात ६,९३२ पैकी ४,१५३ शिक्षकांनी बजावला मतदानाचा हक्क

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २३ : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शुक्रवारी, (दि. २३) यवतमाळ जिल्ह्यातील शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जिल्ह्यातील ६,९३२ नोंदणीकृत मतदारांपैकी ४,१५३ शिक्षकांनी मतदान केले असून, एकूण मतदानाची टक्केवारी ५९.९१ इतकी आहे. अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांत झालेल्या या मतदानातून शिक्षकांच्या प्रश्नांसाठी प्रतिनिधी निवडण्याची चुरस स्पष्ट झाली.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघासाठी अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांत मतदान घेण्यात आले. या निवडणुकीत एकूण ३५,८१० मतदारांपैकी २२,३९४ मतदारांनी मतदान केले. विभागाची एकूण मतदानाची टक्केवारी ६२.५४ इतकी नोंदवण्यात आली. विभागात महिलांचे मतदान ६३.९८ टक्के, तर पुरुषांचे मतदान ६१.८९ टक्के झाले. यवतमाळ जिल्ह्यात एकूण ४,९६३ पुरुष आणि १,९६९ महिला असे ६,९३२ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी २,९४४ पुरुष आणि १,२०९ महिलांनी मतदान केले. जिल्ह्यात पुरुषांचे मतदान ५९.३२ टक्के, तर महिलांचे मतदान ६१.४० टक्के राहिले. एकूण मतदानाची टक्केवारी ५९.९१ असल्याचे उपलब्ध आकडेवारीतून स्पष्ट होते. जिल्ह्यातील बाभूळगाव, उमरखेड आणि पुसद येथे शिक्षक मतदारांचा चांगला प्रतिसाद पाहायला मिळाला. बाभूळगाव तालुक्यात ६६ पैकी ६२ मतदारांनी मतदान करून ९३.९३ टक्के मतदान नोंदवले. उमरखेडमध्ये ६२३ पैकी ५८७ मतदारांनी मतदान केले, तर पुसद तालुक्यात १,१७३ पैकी १,०७९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. या तिन्ही ठिकाणच्या मतदानातून शिक्षकांमधील निवडणुकीची उत्सुकता दिसून आली. या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार रिंगणात असून, जुनी पेन्शन योजना, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांचे अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि रखडलेली शिक्षक भरती हे मुद्दे महत्त्वाचे ठरले. महायुतीचे विद्यमान आमदार किरण सरनाईक, महाविकास आघाडीच्या उमेदवार अदिती पोहरे-देशमुख, प्रोटान संघटनेचे प्रा. गजानन उल्हे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रा. दिलीप कडू आणि माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांच्यासह विविध उमेदवारांच्या लढतीकडे लक्ष लागले आहे. मतदानानंतर आता सर्वांचे लक्ष २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. शिक्षक मतदारांनी दिलेला कौल कोणाच्या बाजूने जाणार आणि विधान परिषदेत शिक्षकांचे प्रश्न मांडण्याची संधी कोणाला मिळणार, याचे उत्तर मतमोजणीनंतर स्पष्ट होईल.



उमरखेडमध्ये ९४.२२ टक्के मतदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

उमरखेड, दि. २३ : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत उमरखेड तालुक्यात शिक्षकांनी मोठ्या संख्येने मतदान केले. शुक्रवार, (दि. २३) उमरखेड तहसील कार्यालयातील मतदान केंद्रावर प्रक्रिया पार पडली. तालुक्यातील ६२३ मतदारांपैकी ५८७ शिक्षकांनी मतदान केले असून, एकूण मतदानाची टक्केवारी ९४.२२ इतकी नोंदवण्यात आली.

मतदानाच्या शेवटच्या वेळेतही केंद्रावर मतदारांची रांग होती. निर्धारित वेळ संपल्यानंतर रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना चिठ्ठ्या देऊन मतदानाची संधी देण्यात आली. त्यामुळे उर्वरित मतदारांनाही मतदान करता आले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आर. यु. सुरडकर यांच्या देखरेखीखाली मतदान प्रक्रिया पार पडली. मतदान शांततेत पूर्ण झाल्याने उमरखेडमधील शिक्षक मतदारांचा सहभाग ठळकपणे समोर आला. अमरावती विभागातील या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार रिंगणात आहेत. जुनी पेन्शन योजना, अनुदानित शाळांचे प्रश्न, शिक्षक भरती आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शिक्षकांचे लक्ष केंद्रित झाले होते. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाबाबत उत्सुकता वाढली आहे. आता २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीत कोणत्या उमेदवाराला शिक्षकांचा कौल मिळतो, हे स्पष्ट होणार आहे.

बाभूळगावात शिक्षकांचा विक्रमी प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



बाभूळगाव, दि. २३ : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत बाभूळगाव तालुक्यात शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शुक्रवारी, (दि.२३) झालेल्या मतदानात ६६ नोंदणीकृत मतदारांपैकी ६२ शिक्षकांनी मतदान केले. त्यामुळे तालुक्यात ९३.९३ टक्के मतदानाची नोंद झाली.

सकाळपासूनच मतदानासाठी शिक्षकांची उपस्थिती दिसून आली. केवळ चार मतदारांनी मतदान केले नसल्याने मतदानाची टक्केवारी ९४ टक्क्यांच्या जवळ पोहोचली. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी योग्य प्रतिनिधी निवडण्याच्या दृष्टीने या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले. अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांत झालेल्या या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार रिंगणात आहेत. महायुतीचे विद्यमान आमदार किरण सरनाईक, महाविकास आघाडीच्या उमेदवार अदिती पोहरे-देशमुख, प्रोटान संघटनेचे प्रा. गजानन उल्हे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रा. दिलीप कडू आणि माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांच्यासह इतर उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. जुनी पेन्शन योजना, शाळांचे अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि रखडलेली शिक्षक भरती हे प्रश्न प्रचारात महत्त्वाचे ठरले. आता २७ ऑक्टोबरच्या मतमोजणीकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

पुसदमध्ये ९१.९८ टक्के मतदान; निकालाकडे लक्ष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

पुसद, दि. २३ : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत पुसद तालुक्यात ९१.९८ टक्के मतदान झाले. शुक्रवार, (दि. २३) पुसद तहसील कार्यालयातील दोन मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. तालुक्यातील १,१७३ नोंदणीकृत मतदारांपैकी १,०७९ शिक्षकांनी मतदानाचा हक्क बजावला.

मतदान शांततेत पार पडले; मात्र निवडणुकीच्या निकालाबाबत शिक्षकांमध्ये उत्सुकता आहे. या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार रिंगणात असून, प्रत्येक उमेदवाराचे समर्थक विजयाबाबत आशावादी आहेत. २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतर कोणाच्या गळ्यात आमदारकीची माळ पडणार, हे स्पष्ट होईल. दरम्यान, पुसदमध्ये काही उमेदवारांच्या प्रचारासाठी उभारलेल्या मंडपांमध्ये मतदारांना चहा, नाश्ता देण्यासह पैशांचे वाटप होत असल्याची चर्चा होती. या संदर्भात आचारसंहितेच्या उल्लंघनाचे आरोपही करण्यात आले. एका उमेदवाराने मंडपाबाबत तक्रार केल्यानंतर सर्व उमेदवारांचे मंडप २०० मीटरच्या मर्यादेबाहेर हलवण्यात आल्याचे वृत्त आहे. या आरोपांची स्वतंत्र पुष्टी उपलब्ध नसल्याने त्यांची सत्यता तपासणे आवश्यक आहे. संबंधित ठिकाणांवरील सीसीटीव्ही चित्रण तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडणूक प्रक्रियेतील नियमांचे पालन झाले की नाही, याबाबत आता मतदारांचे लक्ष संबंधित अधिकाऱ्यांच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे.

थोडक्यात

ट्रॅक्टरच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

यवतमाळ : दारव्हा रोडवरील स्टील फॅक्टरीसमोर ट्रॅक्टरच्या धडकेत ६५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी घडली. राहुल सदाशिव घरडे असे मृताचे नाव असून, ते लोहारातील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच २९ बीएच ७९४३ क्रमांकाच्या वाहनाला जोडलेल्या ट्रॉलीच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवून वृद्धाच्या वाहनाला धडक दिली. या अपघातात राहुल घरडे गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी फिर्यादीच्या जबानीवरून लोहार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळंबमध्ये चाकूने वार

कळंब : माझ्याबद्दल माझ्या मेहुण्याला का सांगितले, असा जाब विचारत एका तरुणाने शिवीगाळ करून चाकूने वार केल्याची घटना कळंब शहरातील तहसीलदार नगर परिसरात घडली. अभिषेक बाबूजी डोंगरे (वय २३) यांच्या तक्रारीनुसार, आदित्य अजय कसारे (वय २५) याने त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर हातातील चाकूने पाठीवर वार करून जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी कळंब पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

एकास मारहाण

दारव्हा : जुन्या वादातून दोघांनी मिळून मारहाण केल्याची घटना दारव्हा तालुक्यातील राजुरा येथे घडली. धनराज उद्धव खंदारे (वय ४४, रा. राजुरा) यांच्या तक्रारीनुसार, आरोपी क्रमांक दोन याने त्यांच्याजवळ येऊन वाद घातला. त्यानंतर हातातील काठीने डाव्या हातावर मारून जखमी केल्याचा आरोप आहे. तसेच दुसऱ्या आरोपीने चापटाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेप्रकरणी दारव्हा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

'ऑपरेशन ऑल आऊट'मध्ये दोन कोटींचा गांजा जप्त

महिनाभरात गांजाविरोधात १६ कारवाया



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २३ : यवतमाळ जिल्ह्यात अमली पदार्थांची अवैध लागवड आणि विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी 'ऑपरेशन ऑल आऊट' अंतर्गत ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत १६ कारवाया केल्या. या कारवायांत सुमारे एक हजार किलो गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजित किंमत दोन कोटी रुपये आहे. दरम्यान, २२ ऑक्टोबर रोजी शिरपूर पोलिसांनी सेदाबाद शिवारातील शेतात छापा टाकून गांजाची १२७ झाडे जप्त केली. या प्रकरणी सुखदेव लेतू आत्माराम याला ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सुखदेव लेतू आत्माराम (५०) याने कायर परिसरातील स्वतःच्या शेतात तूर आणि पराटीच्या पिकांमध्ये गांजाची लागवड केली होती. काही झाडे विक्रीसाठी उपटून ठेवली होती. उर्वरित झाडे तोडण्याची तयारी सुरू असल्याची माहितीही पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तीला ताब्यात घेत पंचांच्या उपस्थितीत शेताची तपासणी केली. यावेळी गांजाची १२७ झाडे आढळली. त्यांचे एकूण वजन १८ किलो ५८० ग्रॅम असून, किंमत एक लाख ८५ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले. जिल्ह्यात गांजाची लागवड, साठवणूक आणि विक्री रोखण्यासाठी विविध ठिकाणी कारवाया सुरू आहेत. शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थांशी संबंधित अवैध व्यवहारांची माहिती नागरिकांनी द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे पोलिसांनी आवाहन केले.

शेंबाळपिंपरीत स्मशानभूमी परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी आंदोलन

चौथ्या दिवशीही आंदोलनाकडे शासनाचे दुर्लक्ष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



शेंबाळपिंपरी, दि. २३ : येथे बौद्ध स्मशानभूमीच्या जागेवरील उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी बौद्ध समाज बांधवांनी २० ऑक्टोबरपासून बेमुदत साखळी धरणे आंदोलन सुरू केले आहे. २३ ऑक्टोबर रोजी आंदोलनाचा चौथा दिवस असून, मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. महसूल अभिलेखात स्मशानभूमीसाठी ०.४८ आर जमीन नोंदविलेली असून, न्यायालयीन निर्णयही समाजाच्या बाजूने असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. मंत्री इंद्रनील नाईक यांनी हस्तक्षेप करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बौद्ध समाज बांधवांनी १५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी पुसद, उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद, तहसीलदार पुसद आणि खंडाळा पोलीस ठाण्याला निवेदन दिले होते. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी पाच दिवसांची मुदत देत आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. मात्र, शासनस्तरावर मागणीची दखल घेतली नसल्याने २० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून बेमुदत साखळी धरणे आंदोलन सुरू करण्यात आले. २३ ऑक्टोबरपर्यंत प्रशासनाकडून तलाठी किंवा पोलीस कर्मचारीही विचारपूस करण्यासाठी आले नसल्याचा दावा आंदोलकांनी केला. त्यामुळे समाज बांधवांनी शासनाच्या उदासीन धोरणाबद्दल नाराजी व्यक्त केली. शेंबाळपिंपरी परिसरातील समाज बांधवांनी आंदोलनस्थळी भेट देऊन समर्थन व्यक्त केले. हिंदू समाज बांधवांनीही आपल्या भावना व्यक्त केल्याचे सांगण्यात आले. महसूल अभिलेखात बौद्ध स्मशानभूमीसाठी ०.४८ आर जमीन नोंद असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार उपसहाय्यक निबंधकांनी मोजणी करून स्मशानभूमीची हद्द निश्चित केल्याची मोजणीपत्रिका उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. अतिक्रमणधारकांविरुद्ध न्यायालयाने निर्णय दिल्याचा दावा करण्यात आला. २१ ऑक्टोबर रोजी २०० ते ३०० बौद्ध महिला, पुरुष आणि युवकांनी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या निवासस्थानी निवेदन दिले. उर्वरित अतिक्रमणस्थळी वाद टाळण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली. मंत्र्यांनी प्रकरणात लक्ष घालून न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन समाज बांधवांनी केले.

देवीचा साज चोरणारा अखेर पोलिसांच्या जाळ्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २३ : जिल्ह्यातील झटाळा येथे नवरात्रोत्सवादरम्यान देवीच्या अंगावरील दोन ग्रॅम सोन्याचा साज चोरीला गेल्याची घटना मंगळवारी (ता. २०) सायंकाळी घडली. याप्रकरणी पारवा पोलिसांनी तपास करून शुक्रवारी (ता. २३) अंकुश रामजी कनाके (वय ३२, रा. झटाळा) याला अटक केली. आरोपीकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला.

चोरीला गेलेल्या साजामध्ये एक डोरले आणि चार मण्यांचा समावेश असून, त्याची किंमत २० हजार रुपये आहे. गावातील मंडळाने हा साज देवीला अर्पण केला होता. याप्रकरणी महेंद्र गुंडाराम मसरास (वय २९, रा. झटाळा) यांनी पारवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार हेमंत चौधरी यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान अंकुश रामजी कनाके याला निष्पन्न करून पोलिसांनी अटक केली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस उपअधीक्षक गृह तथा प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी राजेशकुमार गाठे आणि पारवा पोलीस ठाण्याचे ठाणेदार हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

शिवस्मारकाच्या अनावरणासाठी आंदोलन

'महाराज, आम्हाला माफ करा!' अशा घोषणांनी शहरातील परिसर दणाणला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



उमरखेड, दि. २३ : शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे प्रलंबित अनावरण करून ते शिवभक्तांसाठी खुले करावे, या मागणीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर रोजी शिवभक्तांनी आंदोलन केले. 'महाराज, आम्हाला माफ करा!' अशा घोषणा देत आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. आगामी १९ फेब्रुवारी २०२७ रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीपूर्वी स्मारकाचे अधिकृत अनावरण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे आणि प्रेरणेचे प्रतीक आहेत. त्यांच्या स्मारकाचे अनावरण अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने शिवभक्तांमध्ये तीव्र नाराजी आहे. स्मारक दीर्घकाळ बंदिस्त राहणे ही श्रद्धेशी संबंधित बाब असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. आंदोलनात उमरखेड शहर व तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी झाले. आंदोलकांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन स्मारकाच्या अनावरणाबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. स्मारक परिसरातील अतिक्रमण किंवा अन्य कायदेशीर अडथळे असल्यास त्यावर न्यायालयीन व प्रशासकीय पातळीवर नियमानुसार कार्यवाही करावी. मात्र, या प्रक्रियेमुळे स्मारक अनिश्चित काळासाठी बंदिस्त ठेवू नये, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. कायदेशीर अडचणींचा आढावा घेऊन स्मारक खुले करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक तोडगा काढावा. तसेच अनावरणासाठी ठोस नियोजन करून स्पष्ट वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. आगामी १९ फेब्रुवारी २०२७ रोजी होणाऱ्या शिवजयंतीपूर्वी स्मारकाचे अधिकृत आणि सन्मानपूर्वक अनावरण करण्यात यावे. त्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देऊन अडथळे दूर करावेत, असेही निवेदनात नमूद केले. स्मारकाचा प्रश्न कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधाचा किंवा समर्थनाचा विषय नाही. हा शिवभक्तांच्या श्रद्धेचा आणि जनभावनेचा प्रश्न असल्याने प्रशासनाने संवेदनशीलतेने निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी व्यक्त केली. प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे शहरासह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

उमरी (काप) ग्रामपंचायत भ्रष्टाचार प्रकरणाला नवे वळण; चौकशी अधिकाऱ्याची हकालपट्टी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि. २३ : तालुक्यातील उमरी (काप) ग्रामपंचायतीमध्ये सचिव व सरपंच यांनी सात लाखांच्यावर भ्रष्टाचार केल्याची लेखी तक्रार ग्रामपंचायत सदस्य व गावक?यांनी आर्णी पंचायत समितीच्या गटविकास अधिका?यांकडे केली होती. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पंचायत विस्तार अधिकारी श्री.इंगोले यांची प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, या अधिका?यावर निष्पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ग्रामस्थांनी त्यांना हटवण्याची मागणी केली होती. ती मागणी मान्य करत गटविकास अधिकारी, पंचायत समिती आर्णी यांनी मोठा निर्णय घेतला आहे.

ग्रामपंचायत सदस्य मनोज मेश्राम, वैशाली वानखेडे, वनमाला धुर्वे आणि समस्त ग्रामस्थांनी दिलेल्या दुस?या तक्रार अर्जात म्हटले आहे की, गेल्या दोन-तीन वर्षांपासून या ग्रामपंचायतीत सतत भ्रष्टाचार होत असताना, सचिव व सरपंच यांच्या दैनंदिन कामकाजावर, आर्थिक व्यवहारावर व हजेरीवर नियंत्रण ठेवण्याची थेट जबाबदारी विस्तार अधिकारी (पंचायत) यांची आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ नुसार त्यांनी आक्षेप नोंदवणे अपेक्षित होते, परंतु त्यांनी कोणताही आक्षेप नोंदवला नाही. त्यामुळे संबंधित अधिकारी आर्थिक हितसंबंध जोपासून जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या मागणीची दखल घेत आर्णी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दिनांक २१/१०/२०२६ रोजी आदेश काढला आहे. या आदेशानुसार, पूर्वीची चौकशी समिती बरखास्त करून सुधारित चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत श्री. बी. एन. ठाकरे (विस्तार अधिकारी पंचायत) यांची समिती प्रमुख म्हणून, तर श्री. पवन गेडाम (कनिष्ठ लेखा अधिकारी) व श्री. डुबुकवाड (शाखा अभियंता) यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन समितीने आवश्यक दस्तऐवजांची पडताळणी, तक्रारदारांचे बयान नोंदवून ७ दिवसाच्या आत चौकशी अहवाल आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा, असे आदेश गटविकास अधिकारी यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे उमरी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराची निपक्ष चौकशी होऊन सत्य बाहेर येईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.